म. ग्रं. सं. ठाणें
विषय जिवंत
सं. क्र. 37190

इथे फुलांना मरण जन्मता !





REFBK-0025057

- महादेव मोरे

SAMART

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

27 AUG 1986

1 OCT 1986

(कृ. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ कादंबरी निबंध
3760
२५०५८
उगळदे



इथे फुलांना मरण जन्मता !

लेखक

महादेव मोरे





REFBK-0025057

रौप्य महोत्सवी वर्ष

प्रकाशन क्र. ७२५

चंद्रकांत शेटचे प्रकाशन मंदिर, कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराज यांच्या
पुण्यतिथी निमित्त प्रकाशित

*

प्रथमावृत्ती
१९ मे १९८६

*

©
सौ. वत्सला महादेव मोरे
२६५३ कामगार चौक
निपाणी (जि. बेळगाव)

*

मुखपृष्ठ
सॅम आर्ट स्टुडिओ

*

प्रकाशक
चंद्रकांत शेटचे

*

प्रकाशन-स्थळ
अत्रे सभागृह
शिवदर्शन, शिवाजी मार्ग
कोल्हापूर ४१६ ००२

*

मुद्रक
मनोहर ज्ञा. खाडे B.A.
गीता प्रिंटिंग प्रेस
रेगे तिकटी, शुक्रवार,
कोल्हापूर ४१६ ००२

महादेव मोरे यांची
साहित्य संपदा

कथा

तुझी कथा माझे शब्द
बत्ताशी
ऐन बहरात कैफ कहरात
चिताक (म. रा. पुरस्कार ७५-७६)
दवना
थ्रिल्स् (अनुवादित)
इंगीत
फर्री

कादंबरी

पाव्हणा
एकोणिसावी जात
पनोती
रैत
वर आभाळ खाली धरती
बळी
वस्ती
प्रवाह
वेगळा (अनुवादित)
स्टँड
आडगार
झंगाट
लळा
लोफड
झोंबडं
व्हलम



ज्यांच्या कृपेने ' नवयुग ' आणि ' मराठा ' मध्ये
' साहित्या 'चे ' धडे ' गिरविले
त्या साहित्यसम्राट आचार्य प्र. के. अत्रे यांच्या पवित्र स्मृतीस-

अंतरंग

१	रागरंग	राजहंस	१
२	इथे फुलांना मरण जन्मता	स्त्री	५
३	विहिरी	मनोहर	२२
४	म्हाईचा दिवस	महाराष्ट्र टाइम्स्	३०
५	ड्रायव्हर लोक ; एक संशोधन	मराठा	४४
६	मरणानुभव	केसरी	५०
७	वाट	महाराष्ट्र टाइम्स्	५८
८	अशी पांखरे येती	केसरी	६८
९	जोगतिणींचे जग	माणूस	७८
१०	गोतावळा : साहित्यप्रेमाने जोडलेला	सकाळ	९७
११	ब्रुसलीचा बाप	केसरी	१०६
१२	पुस्तकांनी भेटवलेली गावं	सकाळ	११२
१३	मोटारी	मेनका	११९
१४	मी, वाचक, बक्षीस वगैरे	केसरी	१२८
१५	व्याख्यानं	पुढारी	१३५
१६	कुस्ती	सकाळ	१३९
१७	एक पाणीदार गाव : निपाणी	केसरी	१४४



रागरंग

राग हा अनेक रागांपैकी एक आहे की नाही, हे मला माहीत नाही. पण काही माणसे आपल्या रागास कशी कारणीभूत होतात, ते मात्र मला चांगलेच माहीत आहे. आता तुम्ही रस्त्याने जाताहात, ऑफिसला वेळ झाला आहे किंवा एखादी महत्त्वाची अपाईंटमेंट आहे किंवा असेच एखादे जरुरीचे काम आहे, त्यामुळे तुम्ही गडबडीने जाताहात, लगबग करताहात, अशा वेळी अचानक बाजूच्या गर्दीतून प्रश्न येतो, 'किती वाजले हो ?'

गाडीला ब्रेक लावल्यासारखे गचकन् तुम्हाला उभे राहावे लागते. आवाजाच्या दिशेने तुम्ही पाहता, प्रश्न तुम्हालाच केलेला असतो. मग तुम्हाला मनगटावरील घड्याळाकडे पाहावे लागणार, त्या थोर पृच्छकाला टाईम सांगावा लागणार–हे सर्व आलेच की नाही ? मग आता सांगा, अशा गडबडीच्या वेळी तुम्हाला राग येईना तर काय त्या माणसाबद्दल जिव्हाळा उत्पन्न होईल ?

एकदा मी सायकलवरून वेगाने जात होतो नि असेच एकाने विचारले, ' किती वाजले हो ? '

प्रश्नकर्त्याकडे, मग मनगटावरील घड्याळाकडे क्रमशः पाहत परत आणखी प्रश्नकर्त्याकडे नजर करून टाईम सांगणे हे सर्व आलेच की नाही ? मग अशा ह्या महत्त्वपूर्ण समाजसेवेमध्ये समोरच्या रस्त्याकडे कसे लक्ष जावे ? त्यामुळे माझी सायकल समोरून येणाऱ्या सायकलस्वारावर आदळली तर त्यात माझी काय चूक ?

मला एक वाटते–किती वाजले हो ? असे विचारणारे पृच्छक एखाद्याचा अवसानघात करण्यासाठी, फजिती करण्यासाठी, हसे करण्यासाठी तसे विचारीत असावेत ! मला टाईम विचारणारा तो थोर पृच्छक मी जमिनीवर आदळताच मिश्किल डोळ्यांनी हसत होता हे म्या ह्या डोळ्यांनी पाहिलंय ! बोला आता, अशा माणसाबद्दल राग का येऊ नये ?

काही माणसांना एखाद्याला रिकामा गाठून बडबडायची सवय असते. आमच्या दुर्दैवाने रामभाऊ नावाचे एक गृहस्थ आम्हा सर्वांचे मित्र आहेत. आम्ही काही मित्र चार गप्पा मारण्यास म्हणून एखाद्या ठिकाणी जमलो की नेमका त्यावेळी हा गृहस्थ ' हॉः हॉः हॉः ' करीत तेथे टपकतो अन् बोलून साऱ्यांचा पिट्टा पाडीत राहतो. विषय कोणताही असला तरी त्या दयाळू परमेश्वराने ह्याला वाचाही अशी जबर दिली आहे म्हणता–चंद्र सूर्य व ताऱ्यांखालच्या सर्व विषयांवर ह्याची जीभ एखाद्या नापिताच्या जिव्हेप्रमाणे किंवा वस्त्राप्रमाणे किंवा दोन्हींप्रमाणे चालते ! तुम्हा

सर्वांच्या फ्रेंड सर्कलमध्ये असा एकतरी रामभाऊ असतोच. आपल्या बड-बडीमुळे हे रामभाऊ लोक आपले डोके पिकवून टाकतात ! कायदा थोडा शिथिल असता तर रोज अशा एखाद्या तरी रामभाऊचा खून झाल्याचे वर्तमानपत्रात वाचायला मिळाले असते !

लिखाण करून साहित्यसेवा वगैरे करणारे माझे काही मित्र आहेत. त्यांत एक कवीही आहे. हा परगावी एका बँकेत नोकरीला आहे. अचानक त्याची-माझी केव्हा भेट झाली तर आपल्या काव्याशिवाय दुसरा कुठलाच विषय त्याच्या तोंडी नसतो. एकदा कोल्हापूरहून मी माझ्या गावी येत असताना अचानक त्याच्या तावडीत गावलो. एस. टी. फार वेगात होती म्हणून–नाहीतर त्याच्यापासून सुटका करून घेण्यासाठी मी खालीच उडी मारली असती ! स्टँडच्या स्टॉलवर मी एक चांगलेसे नियतकालिक विकत घेतले होते, तेव्हा ते डोळ्यांसमोर धरून मी बचावाचा पवित्रा घेतला. पण तो बहाद्दर खट्ट ! त्याने आपल्या बॅगमधील तीन वह्या काढल्या आणि माझ्याकडे देत म्हणाला, 'अहो, ते नंतर घरी वाचा म्हणे–हे वाचा प्रथम!' आपल्या छापून आलेल्या कविता त्याने वहीत चिकटवून टाकल्या होत्या...

'तुम्ही प्रथम वाचा–मग मी तुमचा अभिप्राय विचारतो !' तो नंतर म्हणाला,

'आता हे पाहा, मी त्या साऱ्या कविता वाचायच्या व अभिप्रायही सांगायचा–म्हणजे आहे की नाही ? मला एक वाटते=कुणाला जर फाशीची शिक्षा द्यावयाची असेल तर ह्या नवोदित लेखक व कवी लोकांच्या सहवासात चार-आठ दिवस त्या कैद्याला राहू द्यावे ... आपोआप तो कैदी एखाद्या दिवशी गळफास लावून घेतलेला आढळून येईल !

ह्या नवोदित लेखक व कवींना आपले लिखाण, ते सुचले कसे, प्रसिद्ध झाले कसे व (त्यांच्या मते) गाजले कसे इ. इ. सर्व काही आपल्याविषयी बोलण्याशिवाय दुसरा विषय नसतो .. ह्यांचा ह्याबाबत उत्साहही जबर व जबरदस्त असतो. ह्यांची बडबड ऐकायची व यांच्या पहाऱ्याखाली ह्यांचे साहित्यही वाचायचे-म्हणजे तुम्हीच सांगा, अशा वेळी राग येईल की नाही?

ज्याचे दर्शन होताच राग यावा असा आणखी एक प्राणी आहे. त्याला 'मास्तर' किंवा 'गुर्जी' या नावाचे लेबल असते. या 'गुर्जी' लोकांच्या नरडयात आवाजाचे एक स्पेशल यंत्र परमेश्वराने बसविलेले असावे ! तो प्राणी दिवसभर बडबड करीत असतो. ह्याच्या लाळेचे शितोडे शाळेत पोरांच्या नि बाहेर तुमच्या-आमच्या तोंडावर उडत असतात 'गुर्जी' ह्या प्राण्याने एखाद्या विषयाचे दळण लावले की ते संपता संपत नाही. एखादा नवरदेव अशा 'गुर्जी'च्या तडाख्यात सापडला अन् स्वतःची लग्न-घटिका गमावून बसला असे काही ऐकायला मिळाले तरी त्यात आश्चर्य असे काहीच वाटू नये !

अशाच प्रकारे अनेक व्यवसायांतील अनेक व्यक्ती असतात. काही ना काही कारणामुळे त्यांचा आपणास राग येत असतो...

पण बुजुर्ग म्हणतात-राग येताच शंभर अंक मोजावेत. खरं सांगायचं तर शंभर अंक मोजूनही अशा व्यक्तीवरील राग हा शिल्लक राहतोच.

तेव्हा शेवटी एकच उपाय उरतो-रागरंग पाहून आपला राग व्यक्त करावा...

आणि हे नच जमले तर मूठभर मूग गिळून मुकाट बसावे ! तात्पर्य वगैरे हेच, दुसरे काय ?

निपाणीच्या परिसरात विडी वळण्याचे काम करणाऱ्या स्त्रियांचे जीवन किती कष्टप्रद असते त्याची ही प्रत्यक्ष अनुभवावर आधारित कहाणी . . .

इथे फुलांना मरण जन्मता

स्त्री ही मुळात नाजूक प्रकृतीची असते. तिला पुरुषांच्या बरोबरीनं अंग मेहनतीची कामं वगैरे करता येत नाहीत. तिनं केवळ नटावं – मुरडावं, नि पुरुषाचं भोगयंत्र म्हणून रहावं, अशी काही तुमची

गोड गोड समजूत असेल, तर निपाणीतील तंबाखूच्या खळ्यातील कामगार स्त्रीचं जिणं नि जगणं बघून तुम्हाला मोठा धक्काच बसेल.

पुणे – बेंगलोर महामार्गानं आपण कोल्हापूरहून बेळगावला जायला निघालो की तासाभरातच निपाणी येतं. केवळ २२ मैलांचं अंतर. तुमची कार असेल तर अर्ध्या तासातही, नि तशी स्पीडनं गाडी मारली तर त्याहूनही कमी वेळात पोचता येत. कोल्हापूरहून १२ मैलावर कागल, नि कागलवरहेर मैल दीड मैल गेलं की वेदगंगा नदी. अथं महाराष्ट्र राज्याची हद्द संपून कर्नाटकाची हद्द सुरू होते. तरीही भाषा मराठी. कुठं अेखाद्या गावात औषधाला म्हणून कानडी माणूस गावला तर गावला. (तरी वाअीच्या अेका अती शहाण्या डॉक्टरानं गेल्या वर्षी 'अमृत' मधून दक्षिण भारताचं अेक रटाळ प्रवासवर्णन लिहिलं होतं, त्यात मात्र डॉक्टर मजकुरांनी चक्क ठोकून लिहिलं होतं की, ' निपाणीच्या आजूबाजूंच्या खेड्यांतून सरसहा कन्नड बोललं जातं. वगैरे ' आता बोला !)

वेदगंगा नदी ओलांडताच बेळगाव जिल्हा सुरू होतो, आणि बेळगाव खालोखाल जिल्ह्यातील सर्वात मोठं गाव म्हणजे निपाणी. वस्ती अर्ध्या लाखाहूनही अधिक. तरीही अजून तालुक्याचा दर्जा नाही. तालुका आहे चिक्कोडी. निपाणीच्या निम्म्यानंही नाही, असं अेक खेडेवजा गाव. ह्यामागंही गलिच्छ राजकारण. निपाणीकरांना तालुक्याच्या कामासाठी १२।१३ मैलांवरच्या चिक्कोडीला पळावं लागतं ; आणि आजरा–गडहिंग्लजच्या लोकांना निपाणी ओलांडून जिल्ह्याच्या गावी कोल्हापूरला जावं लागतं. म्हणजे घास सरळ घ्यायचा नाही, तर मानेमागून हात फिरवून घ्यायचा, असा हा उलट्या खोपडीचा न्याय !

निपाणीच्या आजूबाजूची जमीन व हवामान हे तंबाखूच्या पिकाला अत्यंत अनुकूल. त्यामुळे ह्या भागातल्यासारखा पहिल्या प्रतीचा तंबाखू भारतात अन्यत्र कोठेही पिकत नाही. तसा गुजरातेतही तंबाखू पिकतो, जयसिंगपूरच्या आजूबाजूच्या भागातही पिकतो ; पण तो दुय्यम वा तिय्यम दर्जाचा तंबाखू म्हणून ओळखला जातो. तेव्हा पहिल्या प्रतीचा तंबाखू

खरेदी करणारं गिऱ्हाअिक आपोआप निपाणीकडंच वळतं. अशा गिऱ्हाअिकाला 'बिचाअेत' असा शब्द निपाणीच्या भाषेत रूढी आहे. हे बिचाअेत लोक म्हणजे येथील तंबाखूच्या व्यापाऱ्यांची कुळं. अशी अेक – दोन कुळं राजी राखली म्हणजे त्या व्यापाऱ्याची पिढ्या न् पिढ्यांची तरतूद होअू शकते. अुदाहरण म्हणून सांगायचं तर, मंगलूरच्या अेकट्या 'नं. ३० बिडी' कारखान्याला तंबाखूचा पुरवठा करण्यासाठी म्हणून येथील पाच – सहा व्यापाऱ्यांच्या फर्मस् चालतात. – शिवाय भारतातील अितर अन्य बिडी कारखान्यानाही येथील व्यापाऱ्यांकडूनच तंबाखू पाठविला जातो. आपल्या बिचाअेत लोकांसाठी हा व्यापारी तंबाखू खरेदी करण्यापासून तो आपल्या वखारीत आणून 'तयार करवून घेण्यापर्यंत (ज्याला पांढरपेशा भाषेत 'प्रोसेसिंग करणं म्हणतात) सर्व कामं करीत असतो. आणि ह्या कामासाठी त्याला रोजगारी करणाऱ्या मजूर स्त्रियांची जरुरी असते. निपाणी शहरात नि आजूबाजूंच्या पंचक्रोशीत असणाऱ्या जवळ जवळ दोन डझन खेडेगावांतून अशा हजार मजूर स्त्रियांचे तांडे मुकादमिणींचे सांगावे पोचताच निपाणीच्या दिशेनं चालू लागतात –

सर्वसाधारणपणे गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर प्रत्येक नव्या वर्षाचा तंबाखू खरेदीचा सीझन चालू होतो. अुत्तरेस महाराष्ट्राच्या हद्दीतील कागलपासून दक्षिणेस कर्नाटकातील पाच्छापूरपर्यंत आणि पूर्वेकडील आरग शिरगुप्पी यडुर–मांजरीपासून पश्चिमेस महाराष्ट्रातील कापशी–मुरगुड-म्हाकवेपर्यंतचा विस्तीर्ण प्रदेश हा तंबाखू पिकणारा भाग. ह्या भागातील खेड्या–पाड्यांवरील धुरळा फुपाटा उडवीत व्यापाऱ्यांच्या जीप्स व अॅम्बेसिडर्स फिरू लागतात. दरात मारून शेतकऱ्यांच्या मुंड्या अेकदा मुरगाळल्या म्हणजे व्यापाऱ्यांनी पहिली लढाअी जिंकली म्हणायची. दरात कसं मारायचं, तंबाखूच्या प्रत्येक बोदाला काडीमातीची १०।१०–१२–१२ किलो सूट कशी धरायची. शेतकऱ्यानं पावसाळ्यात नडीकडीला म्हणून 'अंगावर पैसे नेले' (व्याजानं पैसे नेणं) असले म्हणजे धनकोच्या फर्मलाच त्याला तंबाखू 'लावणं' कसं भाग पडतं, मग अशा

शेतकऱ्याच्या तंबाखूचा दर धनको ठरवील त्याप्रमाणं कसा धरला जातो, नि मग ह्या अत्यंत कमी दरातून तो आपलं व्याज-मुद्दल कसं वळतं करून उरलेली चिरमिरी शेतकऱ्याच्या हातावर टिकवितो --- ही सारी 'शाळा' शिकायला बाहेरच्या माणसानं येथे तंबाखूच्या सीझनमध्ये मोसमभर राहायलाच हवं ! आणि ह्यातील सर्व तपशील सांगितला तर पी. एच्. डी. साठी अेखादा प्रबंधच होईल.

तर खेड्यापाड्यांतून अशा प्रकारे खरेदी केलेला तंबाखू बैलगाड्या व ट्रक्समधून व्यापाऱ्यांच्या वखारीत येऊन पडतो. असा अेकदा तंबाखू येऊन पडला की मग मुकादमिणीला कळवलं जातं –

" बायजाक्का, अुद्याठवनं खळं सुरू हुणार हाय. बायकास्नी सांगून ठेव ! "

येथील भाषेत वखारींना 'खळं' ही म्हणतात. प्रत्येक वखारीबाहेर वा पिछाडीस अेक सारवलेलं ' खळं ' असतं. तंबाखूचा मोसम सुरू झाला की, वखारीतल्याप्रमाणं बाहेरच्या खळ्यातही काम चालतं. खळ्याच्या कडेनं तट्ट्याची ' नामिनल ' भित (?) उभी केली की काम झालं !

मुकादमीण असलेल्या बायजाक्काच्या हाताखाली गावातल्या, त्याचप्रमाणं बाहेरच्या खेडेगावांतल्याही बायका कामाला असतात. बायजाक्का मग अेक – दोन बायकांना 'सूच' करते. त्या बायका मग गावातल्या बायकांना सांगावा सांगतात. अशाच प्रकारे खेड्यांवरील बायकांनाही सांगावा पोचविला जातो –

मग दुसरा दिवस अुगवतो तेव्हा खेड्यावर काय दृश्य दिसतं ? दिवस नुकताच अुगवलाय्. सातचा सुमार झालाय. बायका अेक-दुसरीला हाळी घालीत गावाबाहेर पडल्या आहेत. निपाणीतल्या खळ्यात पोचायला वेळ होअील, मग मुकादमीण शिव्या द्यायला लागंल, कदाचित् कामावरही घेणार नाही ; मग दुपारच्या जेवणासाठी बांधून आणलेलं गाठोड डोअीवर तसंच सांभाळीत हात हलवीत गावाकडं परत जावं लागेल ; आणि अशी परत आली, रोजगार बुडाला म्हणून सासू – सासऱ्याच्या वा नवऱ्याच्या

शिव्या खाव्या लागतील अशा धास्ताव्यांनी बायका लगालगा चाललेल्या आहेत, आणि त्या नुसत्या चाललेल्या आहेत असं नव्हे, तर जेवतही आहेत. तुम्हाला आश्चर्य वाटेल ! अेकाच वेळी चालणं जेवणं कसं शक्य आहे ? तुमच्यापुढे प्रश्न येअील; पण हे शक्य आहे खरंच !

डोअीवर दुपारच्या जेवणाचं गाठोडं ते डोकंच धरतं तोलून. त्याला हाताच्या आधाराची जरूरी नसते. डाव्या हातावर भाकरीचा तुकडा त्यावर केव्हा शेवग्याची भाजी, केव्हा पात्रीची तर केव्हा मुगाची अुसळ वा झुणका किंवा डांगर. आणि तोंडी लावायला केव्हा हिरव्या कांद्याची पात– अुजवा हात तुकडा मोडून भरभर तोंडात कोंबतो आहे ; तोंडात तो तुकडा चावल्यासारखा होअून घास गिळला जातो आहे आणि अशी सकाळची न्याहरी होत असतानाच पावलं वाटेवरून जलद पडत आहेत ; निपाणी जवळ करीत आहेत. कशासाठी ? तेही पोटासाठी. आणि ह्या रोजच्या आटचापिटचासाठी काही तक्रार नाही, अुद्वेग नाही, दुःख नाही, त्रागा नाही ! कारण बायकांचा जन्म तर ह्यासाठीच असतो.

कळत असल्यापासून राबायचं. लहानपणी आई–बापाच्या अिथे, आणि मोठेपणी लग्न झाल्यावर नवऱ्याच्या अिथे, असं हे समंजस शहाण– पण. भल्या पहाटे अुठायचं, गोठचातली श्याणघाण काढायची ; तोवर चुलवाणावरच्या पाण्याचा काटा मोडलेला असतो त्या सोमळ पाण्यानं, मग आंघोळ करायची, लुगडं नेसून मग रपारप भाकरी बडवायच्या, झुणका गरगटायचा, तांदूळ वायलावर टाकायचं; आणि अेवढं झाल्यावर आधल्या दिवशीचं सारं धुणं गुंडाळायचं नि ओढचा–पाणवठचावर जाऊन धुवून आणायचं. तोवर दिस अुमलल्याला असतो. लगालगा घरी यायचं, भाकरी बांधून घ्यायची आणि पारा उडालेल्या धुरकट आरशात कपाळावरचं कुंकू ठाकठीक आहे की नाही ते पाहायचं, अन् बाहेर पडायचं.

निपाणीच्या तंबाखूच्या खळचात मग सकाळच्या नअूपासून रात्री साडेनअूपर्यंत काम. मोसम अैन जोमात असतो तेव्हा रात्रपाळी वा पहाटपाळीही असते. रात्रपाळीची सुट्टी १२।।–१ ला

तर पहाटपाळीची सुट्टी पहाटे ५।।–६ ला करण्यात येते. मग ४।५ मैलांची तंगडचात ड करून गावी जायचं. तवंदी, शिप्पूर, गोंदकुप्पी, शेंगूर हचा डोंगरावरच्या गांवांत तर मैल–मैलभर खडा डोंगर चढून जावं लागतं. तुम्ही ताजेतवाने असलात तरी असा डोंगर चढून वर जाईपर्यंत तुम्हांला राम आठवेल. आणि हचा तर दिवसभर तंबाखूच्या धुस्काटात, धुरोळचात राबून दमगीर झालेल्या बायका हचांची काय अवस्था होत असेल, हचाची केवळ कल्पना केली तरी तुमच्या अगावर काटा येईल.

अर्जुनी, बुदलमूक, पांगीर ही निपाणीच्या पश्चिमेस तीन अेक मैलांवर घुपळचानं अेकत्र वसलेली गावं. अेका ओढचानं ही गावं तुटलेली आहेत. वळीव सुरू झाला म्हणजे हचा गावांतील बायकांचं हाल - हाल अुडायचं. सुट्टी झाल्यावर गावाकड चालावं, गांव जवळ यावं, तर ओढा आलेला, दावेदार बनून मार्गात आडवा. पाणी अुतरायची वाट पहात बायका अल्याडल्या काठावर बसून राहात ; त्यात आणखी दुर्दैवानं पुन्हा पाअूस सुरु झाला तर रात्रभर पाणी अुतरायचं नाव नको ! पल्याडल्या काठांवर आपलं गाव, घरं पोरंटारं ; आणि हचा दुर्दैवी मजूर स्त्रिया रातभर अुभ्या पावसात–भिजत-काकडत अल्याडल्या काठावर ! पण अलीकडं त्या ओढचावर कट्टी बांधण्यात आली असून ओढा येथून कट्टी पाण्याखाली गेली तर थोडं पाणी अुतरल्यावर गुडघ्या-मांडचाअेवढचा पाण्यातून पलीकडं जाता येतं –

गावी जायचं, जेवायचं, दिव्यावर फुंकर मारून 'शिवाड' म्हणून अंथरुणावर अंग टाकायचं. आता डोळचाला डोळा लागतोय, असं वाटू–पर्यंत 'नवरा' नावाचं जनावर अंथरुणात आलेलं असतं. अर्धवट झोपेत अर्धवट जागृतावस्थेत त्याचे अत्याचार सहन करायचे (आणि अशा अत्याचारांच्या खुणा म्हणून पोरांच्या लेंढरांना जन्म घालायचा अन पुन्हा त्यांच्यासाठीच खस्ता खायच्या, तारदाळचा द्यायच्या, आटापीटा करून फेसलटून जायचं !) मग असाच केव्हातरी डोळा लागायचा. न् नेहमीच्या सवयीनं पहाटे जाग यायची, आणि पुन्हा नव्या दिवसाचा भार डोक्यावर

घेण्यासाठी तयारी सुरू करायची. हेच आयुष्य ! ह्याहून काही निराळं होणंच नाही, तर मग तक्रार कसली ? दुःख कसलं ?

अंगावरची हळद निघायच्या आत अिथे आधी नव्या नवरीलाही तंबाखूच्या खळ्यात कामाला धाडल जातं. १० । ११ च्या परकरी पोरीलाही पातळ गुडाळून खळ्यात पिटाळण्यात येतं – अशा नव्या पोरीना तंबाखूची, तंबाखूच्या कामाची सवय होअूपर्यंत खूप त्रास होतो. तंबाखूचा धुसकार, धुस्काट, धुरोळा सहन होत नाही. ओकायला होतं. कुणाची अन्नावरची वासना मरते. कुणी कोरतुकडा खाल्ला तरी तो पोटात टिकत नाही. मळमळायला होअून सारख्या ओकाऱ्या काढीत राहावंसं वाटतं–नको हा स्त्रीचा जन्म. कुठंतरी हाळाहिरीत जाअून पडावं, असं होअून जातं– नुकत्याच फुललेल्या ह्या कळ्या तंबाखूच्या धुस्काटात गुदमरून कोमेजून जातात ; आणि मग 'अियं फुलांना मरण जन्मता,' हे कवी–वचन आठवून आपण आणखीन् व्यथित होअून जातो!

केवळ तीन रुपडयांच्या पगारापोटी ह्या हजारो कामगार स्त्रियांना सकाळी नअू वाजल्यापासून रात्री साडेनअूपर्यंत ढोरागत राबवून घेतलं जातं. मध्ये केवळ जेवण्यासाठी म्हणून दोन-तीनच्या दरम्यान तासाभराची सुट्टी दिली जाते, अितकंच ! रात्रपाळी असेल तर रोजगारात आणखीन दोड रुपया वाढवला जातो. नि पहाटपाळी असेल तर तीन रुपये ! म्हणजे केवळ सहा रूपये मिळवायला ह्या मजूर स्त्रीला सकाळचे नअू पासून दुसऱ्या दिवशीचे पहाटे सहापर्यंत राबल पाहिजे. दुपारच्या दोनच्या सुट्टीत वचावचा खाअून काही कोरतुकडा पाटात गेला असेल तेवढाच, त्यावर पहाटेपर्यंत राबायचं. रात्रपाळी वा पहाटपाळी असेल तर रात्रीच्या जेवणाची सुट्टी मिळत नसते. ! श्रमिक कामगार स्त्रियांची अशी क्रूर चेष्टा केवळ भारतात नव्हे, तर जगातही कुठं होत नसेल.

अेखादे दिवशी 'चाकी करायची असेल' – (म्हणजे प्रोसेसिंगचे शेवटची अवस्था.) चाकी तयार झाली म्हणजे नारळ फोडून प्रसाद वाटला जातो, व तयार झालेला तंबाखू पोत्यात तुडवून भरून, तोंड शिवून

बाहेरगावी पाठविला जातो. अर्थात् हे काम हमाललोक करतात. प्रत्येक वखारीत ४।५ पासून १०।१२ पर्यंत हमाल असतात. ट्रक वा बैलगाडीतून वखारीला आलेला तंबाखू अुतरविणं, व अशा तयार झालेल्या 'चाक्या' भरणं ; भरलेली पोती बाहेरगावी रवाना करण्यासाठी ट्रकमध्ये चढविणं आदी कामं हे हमाललोक करीत असतात. ह्या हमाललोकांना कायमचा पगार नसतो. जेव्हा काम लागेल तेव्हाच पगार. पावसाळचात काहीच काम नसतं तेव्हा ह्या हमाललोकांना त्यांचे मालकलोक असलेले हे तंबाखू व्यापारी अंगावर, अुसने म्हणून, पैसे देतात. ते मग अुन्हाळचातल्या तंबाखूच्या मोसमांत त्यांच्या कामातील पैशांतून थोडे-थोडे वळते करून घेतात. तंबाखू खळचात येअून पडल्यावर त्याची 'चाकी' तयार होअीपर्यंतच्या अनेक प्रक्रिया स्त्री मजुरांकडूनच होत असतात. अेकदा 'चाकी' तयार झाली की तिथं त्याचे काम संपून हमालांचं काम चालू होतं ! तर, अेखादे दिवशी चाकी करायची असेल तेव्हा ह्या मजूर स्त्रियांना दुपारची जेवणाची सुट्टीही दिली जात नाही ! चहाबरोबर भडंग वा भज्याची अेकेक प्लेट त्यानां मालकाकडून मोठ्या अुदार अंतःकरणाने दिली जाते !

स्त्री-कामगाराचे कुठलेच कायदे येथे लागू नाहीत ; मग सुखसोयी तर दूरची गोष्ट ! अेखादी स्त्री-मजूर गरोदर असेल तर बाळंत होण्याच्या आधल्या दिवसापर्यंत वखारीत रावतच असते ; आणि बाळंत झाल्यावरही लगेच दहाव्या दिवशी तंबाखूच्या कामाला खळचात हजर होत असते. घरात तान्ह्याला टाकून वखारीकडं जाण्यासाठी घराबाहेर पाअूल अुचलताना अशा माअुल्या रोज हजार मरणं मरत असतात ; पण घरचे दारीद्र्य व बाजारातील जीवनोपयोगी जिनसाचे भाव ह्यांची सांगड घालून घरातील कच्च्याबच्च्यांना जगविण्यासाठी ओल्या बाळंतिणीही वखारीतील तंबाखूच्या जीवघेण्या धुळीत, धुरोळचात मरमर मरत असतात.

तुम्ही कुठल्याही वखारीबाहेर केव्हाही पाहा, अेखादी तरी माअुली बळचणी वा गटारीकडेला बसून आपल्या तान्हुल्याला स्तनपान करीत

असलेली आढळून येतील बाळाला घेऊन तिची ७।८ वर्षाची पोर वा पोरगं आलेलं असतं ; हचा माअुलीच्या अंगावर, पदरावर, डोळ्यांच्या पापण्यांवर व केसांवरही तंबाखूच्या धुशीची पुटं. तंबाखूच्या त्या खाटानं मूल ठसकत असतं ; तरीही पार आगीनं तसंच दूध पीत असतं. निपाणी-करांची अशा दृश्याला नजर मेलीय्, पण तुम्ही येथे नवीन असाल तर तुमच्या काळजात कालवाकालव झाल्याशिवाय राहाणार नाही.

हचा मजूर स्त्रिया जेथे काम करतात त्या वखारी तुम्ही पाहिल्यात तर पुरातन काळातील गुहांच्या आठवणी तुम्हांला येतील. ना तेथे पुरेशी हवा खेळते, ना भरपूर प्रकाश असतो, ना तेथे मोकळेपणी श्वास घेता येतो. ना तेथे पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय असते. (अशा वखारीत पिण्यासाठी म्हणून जे काही पाणी ठेवलेलं असतं, ते तुम्ही प्याल तर तुम्हाला मळमळायला लागून ओकाऱ्या येतील. कारण त्या पाण्यालाही तंबाखूचा वास असतो !) ना तेथे लघवीसारख्या बहिर्विधीसाठी स्त्रियांना आडोसा असतो. शिक्षा झालेले गुलाम जसे पूर्वी सुलतानाच्या राजवाड्यात राबत असायचे, तशा या स्त्रिया हचा तंबाखू राजेराजवाड्यांच्या वखारीतून राबत असतात (हचा तंबाखू साम्राज्यात कुणी कुणी व्यापारी स्वत:ला राजेही म्हणवून घेतात. आणि हचा राजांच्या पदरी काही बट्टे, गुलाम व जोकरही असतात!) अनेकांच्या आया-बहिणी-पत्नी अशा ढोर मेहनतीनं क्षणाक्षणानं-कण।कणानं मरणाला जवळ करताहेत. अशा या शापित अहिल्या तेथे गल्लोगल्ली दगड होऊन पडल्या आहेत-कुण्या श्रीरामाच्या पदस्पर्शानं पुनीत होऊन 'माणसा' त येण्याची प्रतीक्षा करीत ! होय, 'माणसा' त येण्याची, कारण हचा मजूर स्त्रिया जे जिणं जगतात, ते माणसाचं आहे का ? नाही, नाही ! ते माणसाचं नाही ; माणुसकीचंही नाही-

गरीबाची मुलगी नकटी असावी, पण देखणी असू नये, असं म्हणतात अशा अनेक देखण्या मजूर पोरी वखारवाल्या मालकाच्या (म्हणजेच

तंबाखूच्या व्यापाऱ्याच्या) वा दिवाणजीच्या पापी वासनेच्या शिकार होऊन बटकीचं जिणं जगत असलेल्या आढळतात ! काही वखारीतील मुकादमिणी (अेकाद्या वखारीत ४०/५० पासून ४००/५०० पर्यंतही मजूर स्त्रिया कामावर असतात. त्यांच्याकडून काम करवून घेणाऱ्या अनुभवी स्त्रिला येथे मुकादमीण म्हणतात. मुकादमिणीला अितर मजूर स्त्रीपेक्षा आठ आणे रोजमुरा चढ असतो, अितकंच !) तर देखण्या पोरी –स्त्रिया मालकाखाली घालण्याचं पुण्यकर्म (?) करून त्याची मर्जी सांभांळून ठेवण्यात स्वत:ला धन्य धन्य समजतात. तर अशा दुर्दैवी पोरीही अहिल्याच. ह्यांना अुद्धरण्यासाठी केव्हा श्रीराम जन्माला येणार आहे ?

कुत्र्यापेक्षाही अिमानी प्राणी कुणाला पाहायचा असेल, तर त्यांनं निपाणीला यावं. अिथं ह्या प्राण्याला 'दिवाणजी' असं म्हणतात. मालकाशी अिमान राखणं व त्यासाठी वखारीतील बायकांकडून जास्तीत जास्त काम करून घेणं, हे ह्याचं ब्रीद. आणि हे खरं करून दाखविण्यासाठी तो रात्रीची 'नवाची' सुट्टी 'साडेनवाला' करील: बाराला सोडायची रात्रपाळी साडेबारा अेकला सोडेल. पहाटपाळीची सुट्टी पाचला करायची ती साडेपाच-सहाला करील. ह्याचं घडयाळ हमेशा असं अर्धा-पाअून तास मागं. आपल्या सारख्याच हचा बायकाही श्रमजीवी आहेत; त्यांना सहानुभूती दाखवायची राहो: पण दमल्या भागलेल्या त्या जिवांची वेळेवर सुटका तर करावी. पण ते नाही ! हजारो मजूर स्त्रियांकडून असं हे ओव्हारटाअिम काम करून घेतलं जातं. त्याबद्दल तीन रुपडयांच्यावर अेक नवा पैसाही जादा मिळायचा नाही ! आणि ह्याच मजूर बाअीला सकाळी वखारीत कामास नअू बाजून पाच अेक मिनिटांचा अुशीर झाला तरी तिला सरळ घराकडं पाठवून दिलं जातं. ह्या जगात ह्याला 'हजरी गोल होणं' म्हणतात. हजरी गोल म्हणजे त्यादिवशीचा पगारही गोलच होतो! ह्या वखारवालाल्यांना फॅक्टरी ॲक्ट लागू नाही. त्यामुळं वर्षानुवर्ष अेकाच वखारीत काम करणाऱ्या मजूर स्त्रीला, दिवाणजीला, हमालाला व गडयांना मालकाची मर्जी फिरली

की, लगेच सांगितलं जातं–'अुद्या पासून कामावर येअू नको!'

बाहेरगावातील पेपरवाले व पत्रकार आले की, त्यांना दोन–चार प्रशस्त वखारी दाखवून भलावण केली जाते: म्हणजे ते गुडी–गुडी लिहायला रिकामे ! दरात नाडवून शेतकऱ्याला अथं पिळलं जात असलं तरी हे लिहिणार –'यंदा तंबाखूचा भाव चांगला आहे. शेतकरीवर्ग खुषीत आहे, काडीमातीचा रिवाजही बंद झाला आहे !' गावातल्या गल्लीबोळांतील शेकडो वखारी मात्र त्यांना दाखविल्या जाणार नाहीत. काही वखारी तर अशा आहेत की, त्यांना भोवताली पत्रे वरही पत्र्याचंच छप्पर. अशा पत्र्यांच्या काहिलित, चैत्र-वैशाखातल्या रणरणत्या उन्हात आणि तंबाखूच्या जीव गुदमरणाऱ्या धुरोळ्यात मजूर स्त्रिया कशा काम करीत असतील,हयाची कल्पना केलेली बरी . . . . ! 'नरक' म्हणून जे काही आपण समजतो त्यातील जिणही ह्याहून सुखी असावं.

काही वखारीतून हल्ली तंबाखूची काडी बारीक करायचं मशिन बसविलेलं असतं. तसंच तंबाखूला वारा देण्यासाठी अेक हॉर्सपावरच्या अिलेक्ट्रिक मोटारीला पत्र्याचे फॅन जोडून अेक मशिन केलेलं असतं. आणि ही मशिनं सुरू केली की,अितका धुरोळा अुडतो म्हणता! तुम्ही तेव्हा जर वखारीत असाल तर तंबाखूच्या त्या भयंकर धुस्काटानं बेशुद्धच पडाल ! वाऱ्यावादळामध्ये धुळीचे कसे लोटच्या लोट अुडत असतात. तसे तंबाखूच्या धुशीचे लोट या मशिन्सपासून अुडत असतात; आणि वखारीना खिडक्या–झरोके अशी श्रीमंती चैन नसल्यानं ते लोट वखारीच्या दारातून बाहेर पडत असतात. धुशीच्या ह्या लोटात काम करताना मजूर स्त्रियांचा खालचा दमखाली, वरचा वर होतो. बोदाचं तोंड फाडून वखारीतल्या भुअीवर तंबाखू अेखदा घरंगळला की असं सर्वं धुरोळ्या-तीलच काम सुरू होतं.

मग तंबाखू-तंबाखूची काडी आदी मुंगल्यानं व टोण्यानं बारीक केली जाते. बारीकमोठ्या 'घरांच्या' (म्हणजे छिद्रांच्या) चाळण्या

असतात. दरवाजाच्या अेक मोठ्या चौकटीला अखंड जाळी मारल्यावर जसं दिसेल, तशा ह्या मोठ-मोठ्या चाळण्या असतात. त्या तिकाटण्यांवर तिरकस अुभ्या करायच्या, नि तंबाखू चाळायचा बिचाअेत लोकांना वा बिडी फॅक्टरीवाल्यांना कुठल्या चवीचा व दर्जाचा तंबाखू हवा असतो. त्यानुसार मग त्या हलक्या वा अुच्च प्रतीच्या तंबाखूचं मिश्रण करायचं, ह्यात 'ह्याळं' ही (तंबाखूच्या खोडाची बारीक कुटलेली वा केलली काडी, ह्याला 'ह्याळ' म्हणतात. 'ह्याळ' करायच्याहो काही खास वखारी आहेत. तसंच काही वखारीतून ह्याळाची मशिन्सही बसविलेली आहेत.) मिसळायचा. ह्या सर्व तंबाखूच्या ढिगात घागरीनं पाणी ओतून तो अरतायचा-परतायचा-

हे अितकं सारं झाल्यावर कुठं' चाकी' तयार होते.-अेक 'चाकी' तयार झाली की लगेच दुसरी चाकी तयार करण्याच्या कामास सुरवात होते. अेक-अेक मालकाच्या दोन-दोन, चार-चार वखारी असतात. त्या सर्व वखारीतून तंबाखूचं अहोरात्र काम सुरू असतं. रात्रपाळी वा पहाटपाळी असेल तर दुसऱ्या मजूर स्त्रियांच्या शिफ्टची योजना कुठंच नसते. श्रमिक वर्गांना सर्वसामान्यपणे आठ तास राबवून घेण्याची प्रथा आहे. त्यांहीपेक्षा जास्त तास त्यांना राबवून घेतलं तर ओव्हरडचूटीचे जादा पैसे देण्यात येतात पण येथे केवळ तीन रूपडयांच्या पगारावर ११।११, १२।१२ तास राबवून घेतलं जातं. पहाटपाळी असेल तर १८-१९ तास राबावं लागतं. अल्प पगारावर स्त्रियांच्याकडून अशी ढोरमेहनत करून घेणं, हे कुठल्या माणुसकीत बसतं, ते व्यापाऱ्यानाच ठाअूक !

लेबर ऑफिसर असतो चिक्कोडी वा बेळगावसारख्या वा जिल्हचाच्या गावी ; आणि हे 'लेबर' आहेत निपाणीला. म्हणजे हे अुंटावरून शेळ्या हाकण्यासारखं झालं ! तंबाखूच्या मोससात येथील वखारीतून रात्रंदिवस काम चालू असत, मग धडाधड ५-६ वखारवाल्यांवर खटले का भरले जात नाहीत ? पण अिथंही घोडं हप्त्याची पेंड खात असतं. रिकाम्या खिशानं गावात येणारे वरचे 'साहेब' लोक परततात ते भरल्या खिशानं. शिवाय

हे महाराष्ट्र-कर्नाटकाच्या बॉर्डरवरचं गाव. तेव्हा येथील कुरणात चरायला गवत फार आणि तेही गवत मारवेलाचं गुलबेदार असलं म्हणजे तर बघायलाच नको ! आणि जनावरं मारवेलावर कसा ताव मारतात हे तर तुम्हांला ठाऊकच आहे म्हणा !

निपाणी भागात लग्न करून मुली द्यायच्या म्हणजे अेक तर त्यांच्या नशिबी तंबाखूच्या वखारीतील काम किंवा बिडी फॅक्टरीतून बिड्यांची हजेरी आणून बिड्या वळायचं काम येतं. ह्या बिड्या बांधणाऱ्या मजूर स्त्रियाना हजारी (म्हणजे हजार बिड्या बांधल्यावर) सव्वा पाच रुपये मजूरी सरकारनं ठरवून दिलेली आहे. पण तीही पूर्णतः कुठं मिळत नाही. काही बिडी फॅक्टरीतून ४-४, रुपये, तर काहीतून पाच रुपये दहा पैसे अशी हजेरी. आणि जेथे ही दिली जाते, तेथे बिड्या ' खाट ' कर-ण्याचं प्रमाण भयंकर असतं.

'बिडी-बंडल' बांधून कारखान्यात हजेरी द्यायला गेलं म्हणजे तिथे बिडी-चेकर असतात. कुठल्या बिडीचे चुट्टे बरोबर मारले नाहीत. कुठली बिडी लांब झाली, कुठली धारी झाली, कुठली प्रमाणापेक्षा मोठीच दिसते. अशा चुका काढून हे चेकरलोक बंडलांतून भराभरा बिड्या अुप-सून बाहेर काढांत असतात. ह्याला 'खाट' बिडी म्हणायचं. ह्या 'खाट' झालेल्या बिड्यांची मजुरी बायकांना अर्थातच मिळत नाही. म्हणजे प्रत्यक्ष हजार बिड्या बांधून चार-सव्वा चार रुपये वा सव्वा पाच रुपयांचं स्त्रीनं काम केलं असलं, तरी तिच्या पदरी तीन-साडेतीन रुपयेच पडतात. बिडीकारखानवाले स्त्रियांची मजुरी बुडवून खाट केलेल्या ह्या बिड्यांचं काय करतात. तर त्या बाहेरच्या मार्केटला पाठवितात. निपाणी भागातील चिकित्सक बिडी-शौकिनांना असल्या बिड्या पुरविल्या तर आपलं मार्केट कमी होअील, म्हणून ह्या खाट बिड्या कोकणात, गोव्यात दावणगिरी, टुमकुर आदी दक्षिण कर्नाटकातल्या मार्केटला पाठविल्या जातात. वरील भागातील लोकांना धुम्रपानासाठी कसल्याही बिड्या

चालतात. म्हणजे 'खाट' केलेल्या बिडीवरही कारखानेवाले पैसे मिळवितात. पण त्या बिड्या बांधणाऱ्या स्त्रियांची मजूरी मात्र कापतात हा कुठला न्याय ? अेखाद्या कारखान्यातून कारणावीना कांही बायकाना काढलं जातं आणि ह्या विरुद्ध कुठं दादही मागता येत नाही. तंबाखूच्या वखारीतील धुराळ्यात काम करणाऱ्या स्त्रिया म्हातारपणी टी. बी. सारख्या रोगानं जशा मरायला टेकलेल्या दिसतात. तशाच ह्या बिडी बांधणाऱ्या बायकाही अेकजागी बारा तास बसून बिड्या बांधत राहिल्या मुळं कमरेतून अधू झालेल्या आढळतात.

मी पाहातो –ह्या तंबाखु व्यापाऱ्यांच्या व बिडी फॅक्टरीवाल्यांच्या ४-४, ५-५ गाड्या असतात. राहण्यासाठी प्रशस्त घरं-बंगले असतात. आणि अशा लोकांना आपल्या वखारीत फॅक्टरीत काम करणाऱ्या मजूर स्त्रियांना चार-आठ आणे रोजगार चढ देणं शक्य नाही का? मी पाहातो वर्षाला हे लोक लाखो रुपयांचा नफा मिळवितात, त्यासाठी खोटी बिलं ठेवतात. आणि मजूर स्त्री मात्र आजारी पडली तर औषधाला महाग होऊन बसते. सांगली कोल्हापुरातील नायकिणीच्या माड्यांना व मांड्यानही हे लोक नोटांच्या पुडक्यांनी अूब आणतील पण ज्यांच्या श्रमावर ती नोटांची पुडकी मिळतात, त्या मजूर स्त्रियांना मात्र दोन-चार सोअीसवलती देणार नाहीत.

मी दैनिकांतून, ठिकठिकाणी होणारे महिलांच्या सभा-सम्मेलनांचे व त्यांत झालेल्या ठरावांचे वृत्तान्त नित्य वाचतो. पण त्यांत सुशिक्षित स्त्रियांच्याच प्रश्नांचा अुहापोह केलेला आढळतो. पण ह्या मूठभर स्त्रियांच्या संख्येबाहेर अक्षरश : लाखोंच्या संख्येनं अशिक्षित स्त्रिया पसरलेल्या आहेत, त्या स्त्रियांचेही काही प्रश्न असू शकतील, ह्याचा विचार कुठं केल्याचं आढळत नाही. डोंबारी–मांगगारूडी–मुडीकर, गोसावी, डंबरी, बेलपत्तारी, मेडंजोशी, फांसेपारधी आदी भटक्या जमातींतील स्त्रियांच्या नशिबी कुठल्या प्रकाराचा भोग लिहिलेला असतो,

ह्याची काहीच जाणीव सुशिक्षित स्त्रियांना नसते.

गोसाव्याच्या स्त्रिया ८-८/१०-१० मैल दूर शिवारात डोंगरात वा नदी-अंढ्याकडेला जाऊन वैरणकाडी नि खेकडे आणतात. नि ते मग विकल्यावर दुसऱ्या जेवणाची चूल पेटू शकते, हे किती जणांना ठाऊक आहे? चांदी महागल्यापासून चांदीचे दागिने बनविण्यात व दुरुस्त करण्यात कुशल असणाऱ्या बेलपत्त्याऱ्यांना आता लोखंडी चिमटे व कानकोरणी तयार करून विकून पोट भरावं लागत आहे. माझ्या ओळखीची अेक बेलपत्त्याऱ्याची म्हातारी, 'म्हादा, जातो रं बाबा लेकराकडं. म्हातारपन आलं. सारखं शीक पडाय् लागलोय. त्योक दवापानी केला तर तेवढंच जिवाला जरा वरं वाटेल!' असं सांगून निरोप घेऊन गेली; तर त्या गावी तिचा त्योक नव्हता. आपली पालं गुंडाळून तो कुठल्यातरी गावी निघून गेलेला! आणि ती बिचारी त्या गावाची चार घरं भीक मागून शेवटी मेली! मांगगारूडयांच्या बायका म्हणजे चोरट्या, असा शिक्का कायमचा त्यांच्या कपाळावर त्यामुळं कुणी बाअीनं प्रामाणिकपणे राबून, रोजगार करून पोट भरावं म्हटलं तर त्यांना कुणी काम देत नाहीत.

मी पिठाच्या गिरणीत काम करीत असल्यानं समाजातील ह्या तळागाळाच्या थरातील मायमाअुल्यांच्या ओळखी होतात. दळण दळून घ्यायला त्या हमेशा गिरणीत येतात. अेकदा अशीच अेक भंग्याची वृद्धा आली. 'दादा, अेक आरज लिवून द्येता?' म्हणाली. 'देतो की', म्हटल्यावर तिनं सारं सांगायला सुरूवात केली. तिचा 'मरद' (नवरा) म्युन्सिपालिटीत कामाला. टी. बी. नं सदा शोक असतो, शिवाय म्हातारा-राही झालाय म्हणून 'सायबा' नं कामावरून काढून टाकलेलं. थोरला छरवांदा (मुलगा) शादी करून घेऊन वेगळा राहिलेला, तो ढुंकूनही ह्यांच्याकडे पाहात नाही. पदरी चार कच्चीबच्ची; कसं व्हायचं हा प्रश्न पडलेला... आपल्या मरदला पुनःश्च नोकरीवर घ्याव, म्हणून तिला अर्ज करायचा होता... नंदीबैलवाल्यांच्या पालातला अेक

माणूस आजारी पडला, नि येथील अेका अती शहाण्या डॉक्टरानं त्याला २।३ आठवडे दवाखान्यात ठेवून घेतला. पण नंदीबैलवाले येथून हालले नाहीत. दवाखान्याबाहेरच त्यांचा तळ पडला. ' केवळ आजाऱ्याची माणसं राहू द्यात, बाकीचे सर्व पुढं जा, ' डॉक्टरनं सांगून पाहिलं; पण कुणीच हाललं नाहीत. ' आमच्या माणसाला टाकून आम्ही पुढं जाणार नाही. त्येच्याबरोबर आमचं काय हाल हुतील ते हुऽद्यात! ' म्हणून सारी तळ ठोकून बसली. कडाक्याच्या थंडीत ती बायका-पोरं गटारीकडेला झोपायची; नि अुठल्यावर तिथंच तीन दगडांच्या चुलीवर स्वैपाक करून दुपारची भूक भागवायची . . ,

तर अशा ह्या स्त्रियांचेही काही प्रश्न नसतील का? प्रश्न अनेक आहेत; पण ते जाणून घेणारं संवेदनशील समाजमन कुठं आहे? केव्हा अजाणपणे पाय घसरल्यामुळं, तर केव्हा घरच्यानी यल्लम्मा, मंगेशी खंडोबा आदीच्या नावावर जागताण, भावीण, मुरळी म्हणून वाऱ्यावर सोडल्यानं अनेक मुली-स्त्रिया वाममार्गाला लागून अखेरच्या मुक्कामाला वेश्या वस्तीत येतात. ह्यांचं आयुष्य काय असतं ? पोलीसांचे हप्ते, दारुड्या न् भांडकोर गिऱ्हाअिकापासून संरक्षण म्हणून गुंड लोकांना द्यावे लागणारे हप्ते आणि ह्या दोन्ही राहू-शनीच्या मध्ये गुप्त रोग सततची टांगती तलवार मानेवर; अशा तऱ्हेनं आयुष्य राहिलेलं असतं . . . हे सारं पाहून तुमच्याही मनात सतत हे काव्य हेलकावत राहील '-अिथं फुलांना मरण जन्मता.

मोठमोठ्या शहरातील सुशिक्षित पांढरपेशा स्त्रियांचेही काही प्रश्न असतात. त्यासाठी त्या चळवळ अुभी करू शकतात, प्रश्नांची सोडवणूक वगैरेही करून घेतात . . . पण ह्या सुशिक्षित पांढरपेशा स्त्रियांच्या सुरक्षित जगाबाहेर असंख्य अडाणी, मजूर स्त्रियांचं, पतीत स्त्रियांचं जग आहे. ह्या स्त्रिया ढोरागत राबून मरमर मरून जनावरागत जिणं जगत असतात. अशी ही मजूर स्त्री तंबाखूच्या वखारीत राबून वा कंबरेचा

काटा ढिल्ला होअिपर्यंत बसून, मान मोडून बिड्या बांधून घर–प्रपंच चालवीत असते. आणि तिचा दाल्ला नावाचा प्राणी दिवसभर अुंडग्या जनावरागत गावभर तिरपाटून घरी येतो, नि राच्चं जेवण्यापूर्वी दारु हवी म्हणून त्या पैशासाठी बायकोला बकाबका लाथा घालीत सुटतो. असं हे दृश्य नेहमी पाहायला मिळतं, तेव्हा अशा क्रूर पुरुषापासून अशा स्त्रियांचं संरक्षण करायला आपण, आपला समाज किती असमर्थ आहे, हे समजून येवून काळजात आणखीन अुलघाल सुरू होते.

सामाजिक कार्यांची आवड असणाऱ्या सुशिक्षित स्त्रियांना समाज कार्यं करण्याचं हे किती मोठं क्षेत्र अुपलब्ध आहे! महिलांचीसभा-संमेलनं अधिवेशनं ह्यांत केवळ ठराव पास करून कितीशा स्त्रियांचे प्रश्न सुटणार आहेत? आणि अशा ठरावात वर अुल्लेखिलेल्या समाजगटातील स्त्रियांच्या समस्यांचा कितीसा विचार होतो, हाही अेक विचार करण्यासारखाच प्रश्न आहे. खास स्त्रियांच्यासाठी म्हणून मराठीत आता बरीच मासिकं निघत आहेत; पण त्यातूनही समाजातील ह्या तळच्या स्त्रियांच्या व्यथा वेदनांचा कुठं अभावानंच विचार केलेला आढळतो !

तर हे असंच किती दिवस चालणार आहे? मध्यमवर्गीय पातळीच्या खाली असणाऱ्या ह्या तळागांळातील स्त्रियांचा आपण विचार तरी करायला शिकणार आहोत का हा आजचा खरा प्रश्न आहे !


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. .....
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

विहिरीची किती विविध रूपे . . .
उदास, गंभीर, भिवविणाऱ्या आणि
काही मित्रांसारख्याहि . . .

विहिरी

वि हिरी म्हटल्यावर अनेक विहिरी माझ्या मनश्चक्षूंसमोर दिसू लागतात...काही बऱ्या, काही वाओट, काही सोवळ्या, काही ओवळ्या कांही

बायकांप्रमाणे काही विहिरींची नांवेदेखील बद्दु झालेली असतात– अकारण नि बऱ्याच वेळा सकारणहि. "ती मोहित्यांची हीर न्हवं ? ती मान्सं खाणारी हाय. वर्साला योक तरी बळी लागतोय् तिला!"

"हां, ती रक्ताडग्याची हीर न्हवं ? ती भुतांनी झपाटल्याली हाय. आमुश्यादिशी पलीत्यांची पालखी निघती तितं !" वगैरे प्रवाद गावकऱ्यांत पसरतात आणि अशी बदनाम होऊन अेकदा का विहिरोची अब्रू गेली की गेलीच समजावे ! येथूनतेथून बायकांची नि विहिरींची अब्रू सारखीच. अखेर जातीला जात सारवळ म्हणतात ते काही खोटं नाही !

काही विहिरी मात्र नांवाजलेल्या असतात. काहीतरी घटना घडून जाते अन् विहिरीच्या नांवाचा अुगीच दबदबा पसरतो. अशी अेखादी विहीर पाहिली की अेखाद्या रूपवान, कीर्तिमान चित्रचंद्रिकेची आठवण अपरिहार्यपणे होते. अशी विहीर त्या चित्रचंद्रिकेसारखीच मिरवीत आहे, असे वाटते–'गण्या वास्करानं दोन वर्सामागं पोलीसाच्या शेतांत ही हीर काढली नि तवापास्नं त्येची भरभराट झाली बघा ?" अेखाद्याच्या भरभराटीचा व विहिरीचा अशा प्रकारे संबंध जोडला की तिला आपोआप मोठेपण प्राप्त होते.

काही विहिरी अशा बऱ्यावाअिटाने प्रसिद्ध असतात. तर काही विहीरींची नावे घेताच आपोआप मनांत पवित्र भाव दाटून येतो. बिरोबाच्या देवळाजवळची विहीर, म्हसोबाच्या झाडाबुडली विहीर नि राम-मंदिरामागील विहीर बघितली की असं काहीसं वाटू लागतं. अशा विहीरीत नेहमी बेलाचीं पाने, हार, हाराटी फुले अित्यादि तरंगत असतात. त्यामुळे आपली भावना आणखीन गडद होते.

काही विहिरींची नांवे निघतांच आपल्या मनांत आपोआप भयाचा काळोख दाटू लागतो. पूर्वी आमच्या गावाभोवती तटबंदी होती. पुढे कालमानाप्रमाणे हळूहळू ढासळली. तिच्या दगडांची लोकांनी सोअीस्कर विल्हेवाट लावली. भेंगळून आजूबाजूस विखुरलेल्या पांढऱ्या मातीच्या विटा बांधल्या, पण ह्या वाताहातीमधून अेक बुरूज मात्र अद्याप शाबूत आहे. पूर्वी तट जेथे बुरूजाच्या पोटांत घुसला होता, त्या पडीक भागावरून

बुरजावर चढता येते. वर चढून गेले की, मध्याला अेक खोल खोल विहीर आहे. तिचा छुपा जबडा अेखादे भक्ष्य गिळायला निघल्यागत सतत पसरलेला असतो. छुपा अशासाठी म्हटले की ही विहीर अितकी चोरटी आहे म्हणतां, बुरजावर गेलेल्या माणसाला ती सहसा दिसून येत नाही. सावधपणें अेक अेक पाअूल अुचलावे तेव्हाच तिचे दर्शन होते. बेसावधपणे शोधाल तर सरळ मृत्युच्या जबड्यात जाल. त्यांतून निघणे मग केवळ अशक्य समजावे !

ही विहीर खोल तळापर्यंत पक्की बांधविलेली आहे. आत अुतरता येत नाही की आतल्याला बाहेर पडता येत नाही, अेकदा अेका माकडाचा पाठलाग करीत शेलारचे कुत्रे बुरुजावर चढले अन् झेपावत पळत असताना धप्पदिशी विहिरीत पडले, तळमळले, तळमळले नि खलास झाले ! बुरुज अुभा राहात नव्हता म्हणून अेका लेकुरवाळ्या वडारणीचा बळी दिला गेला होता, असे गावातील जुनी माणसे सांगतात. अमावास्येदिवशी ह्या विहिरीतून पाळणा झुलल्याचा कुरु कुरु आवाज येतो अन् हे पिढयान् पिढ्या मनावर ठसविले गेल्याने, अेकटादुकटा माणूस दिवसादेखील या बुरुजावरच्या विहिरीजवळ जायला भितो.

काही विहीरींनी आपल्या अनेक आंबटगोड आठवणी जपून, जतन करून ठेवलेल्या असतात. त्यांच्याजवळ जाताच त्या साऱ्याची अुजळणी होते. तालुक्याच्या गावी मी शिक्षणासाठी होतो तेव्हा गावाबाहेरच्या त्या रणदिव्यांच्या विहिरीने माझ्या पुष्कळशा आठवणी पुस्तकातील मोरपिसासारख्या जपून ठेवल्या आहेत. रोज मी त्या विहिरीवर आंघोळीसाठी जायचा. काँग्रेसशी अेकनिष्ठ राहाण्यात ज्यांचे सारे आयुष्य गेले नि ह्या नादामध्ये ज्यांचे वैयक्तिक जीवन मुठीतील वाळूप्रमाणे गळून गेले, असे मास्तर ह्या विहिरीवरच मला भेटले. पोहावयास शिकण्याकरिता येणाऱ्या तारुण्याच्या अुंबरठ्यावर रेंगाळणाऱ्या त्या दोन अल्लड मुलीनी ह्या विहिरीवरच माझ्या मनाची पाकळी न पाकळी अुमलवली नव्हती का ?

विजू व मी रोज दुपारी विहिरीवर चोरून येत नव्हतो का? दुपारी विहिरीवर माणसांची विशेष वर्दळ नसायची. त्यामुळे अगदी निर्धास्तपणे विजूच्या नितळ पोटाखाली हाताचा आधार देऊन या विहिरीतच तिला पोहायला शिकविले होते ना? अशा कितीं अेक आठवणी या विहिरीभोवती आहेत. सांगाव्यात तेवढ्या थोड्याच.

माझ्या गावाबाहेरून जितीचा ओढा वाहातो, अर्थात हा फक्त पावसाळ्यातच वाहतो. उन्हाळ्यात कोरडा. या ओढ्याच्या काठाने डोंगराकडल्या बाजूस पांच अेक मिनिटे चालत गेले की डाव्या हातालाच अेक पडीक विहीर लागते.काही बायका जशा पुरुषांबाध्याच्या,घाटाच्या असतात, तशी ही विहीर आहे. विहिरीचा नाजूक मूलायमपणा हिच्या गांवीही नाही. ही आपली खडबडीत, रखरखीत आहे. हिला आम्ही 'रायगड' हे नांव दिले आहे. हा 'रायगड' अेक काळ्या करंद काळ्याट रानात मोडत असल्यामुळे काठावरची माती घसरूनघसरून मुजत आला आहे. फक्त पावसाळ्यात ओढा दुथडी वाहू लागला की, ह्यात काही लाल गुळण्या टाकतो. तेवढच पाणी काही दिवसांनी निचरा झाला की वर्षभर ठणठणाट. काठावर अुगवलेले लिंबाऱ्याचे झाड अुंच वाढता वाढता अेकदम लहरी झाले. माणसेच तेवढी लहरी असतात असा माझा समज होता, पण या लिंबाऱ्याने लहरीपणा दाखवून तो गैरसमज ठरविला. ते अुंच वाढायचे विसरून मध्येच कमरेत वाकून 'रायगडावर' ओणवे झाले अन् आडवे वाढू लागले.

लहानपणी लोहाराचा काशीबा आमचा म्होरक्या. त्याच्या ताठ नेतृत्वाखाली आमचे टोळके ह्या 'रायगडा'वर खेळायला येअी,त्या आडव्या वाढलेल्या लिंबाऱ्यावर चढून ,विहिरीतल्या मातीत (पाण्यात नव्हे !) दणादण् अुड्या ठोकून लुटुपुटुच्या मारामारी केल्या जात. तालुक्याच्या गावी त्या वेळी नादिया, जॉन कावसच्या देमार चित्रपटानी कहर अुडविलेला. अर्थात् ते चित्रपट काहीजण पाहून आलेले. तेव्हा त्यातल्यासारखी रंगीत

तालीम होअी. अन् यात आणखीन् रंग येण्यासाठी चावडीपुढील, मारूतीचा पार कट्ट्यापुढील तसेच केसू वाण्याच्या किराणा दुकानापुढील ओढून टाकलेले बिड्यांचे कंडके आणले जात. ओठात धरून ते शिलगावले की, मारामारीला काही और रंगत चढे ! सुट्टींत गावाकडे गेलो म्हणजे आपोआप पावले ' जितीच्या ओढ्याच्या ' काठावरून पडू लागतात, अन् येथे आले की हया ' रायगडा ' ला जाग येते ! तो भरभर सगळे सांगू लागतो अन् मी त्या आठवणीत स्वतःला हरवून बसतो.

आंबा, आवळा, लिंबारा, पिवळा चाफा अित्यादि झाडांच्या साव-लीत विसावलेली अेखादी विहीर पाहिली की सुखासमाधानाने तृप्त असलेल्या अेखाद्या प्रशस्त कुटुंबांतील गुणी गृहिणीची आठवण होते. तसेच आपल्या बुचडयात अेखादे धुमसणारें लालजर्द फुलानी डवरलेले गुलमोहराचे झाड खोचून बसलेली अशीच अेखादी विहिर पाहिली की चवचाल बाअीची चटकन् आठवण होते. फुले माळून आपल्या याराची ही वाट पाहात बसली असावी, असे वाटू लागते ! वळीव झोडपून मग पावसाचे अेक अेक नक्षत्र जसजसे बरसू लागते तसतसे विहिरीचे पाणी चढू लागते. काल ही अितकी होती, आज अितकी झाली, अुद्या ही अितकी वाढेल ! तर्क, बोलणी सुरू होतात आणि मग दिवसेदिवस नवनवे विभ्रम शिकणाऱ्या नि अंगप्रत्यंगात नवीनवी व वेगळी वाढ होणाऱ्या अशा नुकत्याच तारूण्यात पदार्पण केलेल्या तरूणीची याद घोळू लागते. अुन्हाळा अेक पावलानी जवळ येअील तसे विहिरीचे पाणी खाली, खाली अुतरू लागते आणि मग विहीर प्रौढपणा टाकून म्हातारपणाकडे झुकू लागणाऱ्या बाअीसारखी दिसू लागते अशा वेळी तिच्याकडे बघणेसुद्धा होत नाही, अितकी ती कुरूप दिसू लागते.

आणि पार पाणी आटून विहीर कोरडी झाली की ती अेखाद्या म्हातारीच्या प्रेतासारखी भासू लागते. आत पडलेला पालापाचोळा, झाडाची पानेफुले ही प्रेतावरील फुलांच्या राशीसारखी वाटू लागतात आणि अशा अेखाद्या विहिरीच्या अंगाखांद्यावर खेळण्यात – बागडण्यात

माझ्या गतायुष्यातील बरीच वर्षे गेलेली असली तर आपले आप्तस्वकीय वारल्याप्रमाणे डोळे अश्रूंनी झरझरून येतात.

काही विहिरी अुथळ स्वभावाच्या असतात. आत अेक, बाहेर अेक असे त्यांचे नसते. त्या भरभर आपल्या मनातील सारे तुम्हाला सांगून टाकतील. काही विहिरी फारच बोलक्या असतात. त्या घडाघडा बोलू लागतात अन् ते अैकताना पुष्कळ वेळा आपल्याला कंटाळाहि येतो. तर काही विहिरी घुम्मन्‌घुश्शा असतात. आतल्या गाठीच्या असतात. त्या आपला काहीच थांगपत्ता लागू देणार नाहीत! माझ्या गावच्या अुगवतीला 'गुजराची विहीर' आहे. जिल्ह्याच्या गावी जाऊन खोऱ्याने पैसा ओढणाऱ्या गावातल्या अेका गुजराने ही विहीर बांधली आहे. कितीतरी बायका, सासुरवाशिणी येतात. पाणी भरून घेताघेता बोलतात किंवा बोलतबोलत काही वेळ विहिरीवर बसतात. चार सुखाच्या गोष्टी, चार दुःखाच्या गोष्टी. या विहिरीने त्या का कमी अैकल्या असतील? त्या गोष्टींना कथाबद्ध करण्यासाठी आजपर्यंत मी हिला जंगजंग पछाडले, पण ही काही ताकास तूर लागू देत नाही!

तशीच ती शेवाळचाची विहीर. शेवाळचाची न्हातीधुती, टवटवीत फुलवंता अेके दिवशी दुपारीच त्या विहिरीत पडली अन् तीन दिवसांनी तिचे मढे वर आले. का पडली ती! घरात काही जाचणूक झाली? कुणी फसविली? काहीतरी भानगड करून बसली? का सहज पाणी आणायला म्हणून गेली आणि पाय घसरून पडली? असे अनेक प्रश्न त्या शेवाळचाच्या विहिरीला मी विचारले आहेत. पण ती हाटमुऱ्यावानी तोंडाला मिठी घालून गप्पच बसली आहे. तसेच अिनामदारांच्या वाड्यात अेक विहीर आहे. अिनामदार आपली सत्ता मानत नाही असे दिसून येताच अिंग्रजांनी गावाला वेढा घातला. अिनामदारांनी गाव नेटाने लढविले. पण सूर्याजी पिसाळाची अेक अवलाद निपजली. त्याने अिंग्रजाला अिंगित सांगितले आणि मग बसवाण माळावरून अिंग्रजांनी वाड्याच्या लाख्या दरवाजावर

तोफा डागल्या. अिनामदाराना शस्त्रे खाली ठेवावी लागली. त्यावेळी अिंग्रजांच्या हाती लागू नये म्हणून वाडचातल्या या विहिरीत बराच मौलवान अैवज नि दारूगोळा, तलवारी, बंदुका टाकल्या होत्या आणि असे बरेच काही त्या विहिरीने पोटात रिचविले होते. तेव्हा या विहिरीला जर बोलके केले तर साऱ्या गावचा ज्वलंत अितिहास बाहेर येअील पण....

कुठेहि पाहुण्यारावळ्यांच्या गांवी गेलो की आजूबाजूच्या रानाशिवारातील विहीर पाहाण्याचा मला छंद आहे. अशा वेळी गावरानात मळलेल्या वाढलेल्या पाअूलवाटा मला लबूद होतात. त्यांच्यावर विश्वास टाकून चाललें की त्या अलगद् अेखाद्या सुंदर विहिरीच्या काठावर आणून सोडतात. मी जेव्हा शिरगुप्पीला, माझ्या मावशीच्या गावी गेलो होतो. तेव्हा अशाच अेका पाअूलवाटेने मला अेका सुंदर विहिरीजवळ आणून सोडले होते. ती विहीर बारीक चणेची व पक्की बांधवलेली होती. चौरस आकार होता आत अुतरावयास बांधीव पायऱ्या होत्या आणि ह्या पायऱ्या जिथे चौकोनाला मिळतात तिथे अेक सुंदर कमान बांधून काढली होती अन् ह्या साऱ्याला साजेसे कावळ्याच्या डोळ्यागत काळशार पाणी भुलावण घालत होते. जरी आपण हे पाणी प्यालो तर सर्व विहिरीचा कुंवारपणा संपून जाअील, ती अुष्टावेल असे वाटत होते. किती वर्षे झाली या गोष्टीला ! पण अजूनहि ही विहीर माझ्या पक्की स्मरणात आहे.

तसेच सौदलग्याच्या आतीच्या येथे गेलो तेव्हा मळ्यातून हरवून दसनाना अेक प्रचंड विहिर अचानक माझ्या समोर ठाकली. गुऱ्हाळातल्या पांचसहा काहिली मावतील अितका घेरा होता. विहिर बांधविलेली नव्हती. पण आत अुतरण्यास वाट होती. तीवरून जपून आत अुतरता येअी. शहरी गडबड केली की सरळ सार्वजनिक बागेतील घसरगुंडीची आठवण ताजी झालीच म्हणून समजा ! आत पाण्याजवळ उतरून वर पाहिले, की विहिरीच्या भव्यपणाने मन दबून जाअी. अेखाद्या जबर व्यक्तिमत्त्वाच्य बाअीच्या सहवासात आल्यावर कसे वाटते, तसेच काहीतरी होअून जाअी.

विहिरीला वर चार मोटांची प्रशस्त धाव होती आणि मोटेच्या नाडयाची ती चार चक्रें वरून खालच्या पाण्यात सूर मारायला अुभी असल्यागत वाटत होती. विहिरीच्या पाण्यावर ब भळीची अेक ढापी ओठंगलेली होतीतिच्यावर गवळणी पक्षिणीनी बांधलेली तीनचार सुरेख घरटी लोंबत होती; वाऱ्याच्या झुळकेसरशी पाळण्यागत हालतडुलत होती. ही विहीरहि बरेच दिवस झाले माझ्या मनातरुतून बसली आहे.काळभैरी तसेच स्तवनिधि या देवस्याना–वरच्यासारकी पाण्याची व्यवस्था अितरत्र क्वचितच पाहायला मिळते. सुबक,बांधीव टाक्यातील ते स्वच्छ मधुर पाणी पाहून ते कुठल्या विहिरीतून पाअिप्स लावून आणले आहे याचा मागोवा घेत मी तवंदीचा व काळभैरीचा डोंगर पालथा घातला आहे अन् त्या विहिरी पाहून तृप्त झालो आहे.

अशा विहिरी पाहून असं वाटते की, आपणाला मरण जर यावयाचेच असेल तर कुठेतरी घराच्या किंवा हॉस्पिटलच्या चार भिंतीआड खितपत पडून न येता अशाच अेखाद्या विहिरीच्या काठावर मोहोराने दरवळणारे आंब्यांचे झाड असावे, अन् त्याच्या बुंध्याला कलंडून विहिरीतील पाण्याकडे पाहातपाहात तृप्तीने डोळे मिटलेल्या अवस्थेत जिवाचे पाखरु अुडून पंचतत्वात विलीन व्हावे !

* * *

जुने वर्ष संपतं. नवं उजाडतं. चैत्रातले पहिले चार दिवस कधीच सरतात आणि मग उगवतो 'म्हाई' चा दिवस. निपाणीकडच्या शेतकरी जीवनात त्याला काही वेगळंच महत्व आहे. ते सांगण्याचा हा एक प्रयत्न.

म्हाईचा दिवस

गुडी पाडव्यानंतर चौथी रात्र संपते, अन् काळोखाच्या पडद्याआडून पांचवा दिवस हळूच गांवाकडे डोकावून पाहूं लागतो तसे कोंबडे केकाटू लागतात, आणि गांव जागा होऊं लागतो. झोपेतून उठलेल्या सुस्त मनाला आज 'म्हाईचा दिवस' आहे, ही जाणीव होते नि सकाळपारचा अंगातला पारूसा' आळस पार नाहीसा होतो–म्हाईला बोलावलेले पाहुणे काहीं

कालच आलेले असतात. पुष्कळसे आज येणार असतात. दिवस कासराभर वर यावयाच्या आत त्यांची वर्दळ लागणार असते. शिवाय मुल्लाण्याला बोलावून आणून अजून बकरी कापावी लागणार असतात-आणि ती कापल्यावर मग हजारो कामे वाट पहात खोळंबून असतात.

ह्या कामाला गोमगाल्याची याद येताच घरचा कर्ता माणूस आळसावरोवरच पटका झटकील अन् डोईला गुंडाळून कामाला लागेल-हाताला गावेल त्याला वेठीला धरील, हुकूम सोडील कुणावर खेंस मारील-कुणाला गुमान सांगल.

'काय रे पोरा, काल मुल्लाण्याला सांगितलाईस न्हवं-लवकर यायला?" खांद्यावर कावड टाकून ओढ्यांतील झऱ्याचें पाणी आणण्यासाठी वाहेर पडणारा जानू शेवाळचा म्हणतो,

"आलोय तर गा ! ' बाचा मान राखण्याचा शक्यतो प्रयत्न करीत पोरगं म्हणतं, 'खर, आजून कसं आल न्हाई बेटं-त्येच्या बायली ?

"मायला, माजल्यात् साली ! बरं' आता जा उभ्या उभ्या त्येच्या घरला ; आनी हाय तसाच वडून आन् बेटचाला !"

मुल्लाण्याला कसं उभं-आडवं करायचं ह्याची वाटाघाट करीत पोरगा निघतो. बामण गल्ली ,शेलार आळी पार करून खालच्या गल्लीत जातो. आळीच्या दूर टोकाला मूल्लाण्याचं घर असतं. तो तेथे पोहचतो तेव्हा त्याच्या सारखेच संतापलेले भिमू, रावण, केरबा, शिंदे व परगौंडे पाटील मुल्लाण्यावर तोंड सोडत असलेले दिसून येतात. हाहि त्यात मिसळतो व तोंड वाजवू लागतो.

मुल्लाण्याची हौस फिटण्याचा एकमेव दिवस

' का रे बाबा ऽ ऽ, गावात एकला एक मुल्लाणी म्हणून लै भाव

आला व्हय तुला ?'

लै माजल्यात र ही लांडी ! लौकर यायला कालच म्या सांगितलय पर ह्याचा पत्या न्हाई. पाव्हण्यानी तर घर भरायला लागलय नि आजून कशाचीच जोडणी न्हाई ! काय करायचं मान्सानं म्हतो मी ? '

'आम्चंबी तसच हाय गा कुणाला सांगायचं ?'

आता ह्यापैकी कुणाकडं प्रथम जायचं हा यक्षप्रश्न मुल्लाण्याला पडतो पण केरबा शिद्यान लवकर यावयास सर्व प्रथम सांगितलय हे ध्यानात येताच तो बाकीच्यांची कशीबशी समजूत काढून त्याना वाटंला लावतो, मग घरात जातो आणि आदल्या दिवशी पाणी पाजवून ठेवलेली सुरी धार लावण्याची सळी व मदतीसाठी ८-१० वर्षांचा आपला पोरगा रसुल ह्याला घेऊन शिद्याबरोबर तो बाहेर पडतो.

शिद्याच्या घराकडे येतांना वाटेत लागणऱ्या अनेक घरातून आलेल्या, संताप जनक प्रश्नाना मुल्लाणी मोठ्या धैर्याने तोंड देत असतो. ' लौकरच येतो. तुमचा खुळांबा करत न्हाई. भिवू नका' म्हणत दिलासा देत असतो.

शिद्याचं घर येतं. तिघेजण मागील परड्यात येतात. तिथल्या पेरवाच्या झाडाला बांधलेलं बकरं, हाती सुरी घेतलेला मुल्लाणी बघतांच, जोराजोरानं ओरडू लागतं. बांधलेली दोरी तोडून घेण्यासाठी धडपडू लागतं.

' बे रांडके बच्छे, क्यों खाली – पिली गडबड करता है ? चूप बैठ छिनालके!' उठल्यापासून दुसरं, काही न खाता फक्त दुसऱ्यांच्या शिव्याच खाणारा मुल्लाणी आपली हौस भागवून घेतो.

मग धडपडणारे बकरे सोडून त्याला खाली पाडण्यात येतं. मुल्लाणी बकऱ्याचे मुंडके खाली जमिनीला जाम दाबून धरतो. शिद्या व रसूल बकऱ्याचे चारी पाय ताकतीने दाबून धरतात. तेवढ्यात शिद्याचा पोरगा रक्त साठविण्यासाठी घरातून मातीच्या ५-६ झाकण्या घेऊन येतो-नि

बकरे कसं कापतात हे बघण्याच्या उत्सुकतेनं तिथंच उभं रहातो. मग मुल्लाणी आता पर्यंत धडपड करणाऱ्या बकऱ्याचे मुंडके एका हाताने घट्ट असे जमिनीवर दाबून धरतो, आणि दुसऱ्या हाताने त्याच्या मानेखाली एक झांकणी ठेवून त्याच हाताने बकऱ्याच्या या कानापासून त्या कानापर्यंत सफाईने सुरी फिरवतो तसे मानेखालील झांकणीत गरम गरम रक्त सांडू लागते. तसा एखादा भाविक असेल तर ते तसेच जमिनीवर सोडून देतो. नारळ मात्र देवाच्या नांवाने फोडायचा पण नारळातील पाणी कंजुषपणांने सांठवून ठेवायचे मग नारळ फोडायचा तरी कशाला ? अशा प्रकारची काहींची भावना असते. ज्या काळभैरीसाठी म्हाई करायची, बकरं कापायचं, त्यालाच त्याचं रक्तहि अर्पण केलं पाहिजे असं पुष्कळ जणांचं मत असतं.

मुंडकं धडावेगळं झालं तरी बकरं धडपडतच असतं. रक्त जस जसं कमी होईल तस तशी ही धडपडहि हळू हळू बंद पडते,

मग जवळच्या त्या पेरवाच्या झाडाला बकरं उलट टांगून मुल्लाणी व त्याचा पोरगा थोड्याच वेळात ते सोलतात. चामडं वेगळं करतात अन् त्या 'गोसा' चे मोठमोठे ५–६ तुकडे पाडून शिंद्याच्या ताब्यात देतात आणि एवढे झाल्यावर समोरच्या घमेल्यात रक्ताळलेली सुरी धुतां धुतां मुल्लाणी म्हणतो.

" बर, शिंदे सर्कार जाताव आता."

तसा शिंद्या म्हणतो,

" हयेच्या माय् व्हलेऽ चाल्लास ! आनी हे तोडणार कोण? तू का मी ?"

" पर अबी समद्या ठिकाणला जानेकू हाय. तोडत बसायला टैम कुटं हाय सर्कार ! तवां तुमीच मोठं धाटं तोडून घ्या. "

" त्ये काई सांगू नको मला ! अगुदर तोडून द्यांचं, माग्नच बाहीर

पडायचं ! हां काम आर्धंच सोडून जाशील तर तांगडीच तोडीन तुजी! ''

आता जास्त घोळ घालण्यात काही अर्थं नाही असा समंजस विचार मुल्लाणी त्या लालभडक नि अजूनहि थरथरणाऱ्या 'गोसा' चे कचाकचा तुकडे करायच्या उद्योगाला लागतो.

घरोघर बकरी पडू लागतात. त्याचं ताजं भांस चुलीवरील हंडयांत रटरटू लागतं. घरातील बायका भाकरी भाजू लागतात. भात उकडू लागतात, मसाला कुटु लागतात. म्हाईसाठी म्हणून अगोदरच बोलावून आणलेल्या लेकी-सुना-नाती-लांबच्या जवळच्या आज्गा-मावश्या-फलाणी भावजय-ती तमकी घस्टनीतली हयातल्या कुणीना कुणी स्वयंपाकाला मदत करू लागतात, कुणी नुसतीच धावपळ करीत असतात, वचावचा बोलत असतात, कचाकचा धांदलीत धक्के मारत असतात, पायाशी लुडबूड-णाऱ्या पोराटोरांवर वस्कन ओरडत असतात.

ह्या सगळ्या गडबडीने नि आतून येणाऱ्या चविष्ट खमंग वासाने घरे भरून जातात. ह्या वासावर तरंगतच आवतन गेलेला एक एक पाहूणा येऊ लागतो. सकाळपासूनच्या गडबडीतून नुकतीच जरा उसंत मिळाल्याने शिवाऽ म्हणून ओटीवर टेकलेला व चंची सोडून अडकित्त्याने सुपारी कातरीत 'बार' भरण्याच्या तयारीत असलेला कारभारी ''या पाव्हणंऽ, वाईच येळानं येणं केलंसा?'' ''असं म्हणत त्यांचं आगत-स्वागत करू लागतो.....

पहिली म्हाई काळभैरीची

म्हाळाची पुनेव, चुडीची पुनेव, नव्याची पुनेव, तशीच ही म्हाईची पुनेव वर्षातून एकदाच येते. चैत्र महिन्याच्या सुरवातीस. पहिली म्हाई काळभैरीची असते. पहिला मान तिचाच. निपाणीपासून आजऱ्याकडे उतूर-भैरेवाडीपासून काही मैल गेल्यावर डाव्या हाताला शिवारात घुसलेली एक पाणद लागते. त्या पाणंदीतून दक्षिणेकडे पाऊण मैल नि तेथून तितकेंच

अंतर पूर्वेकडे गेल्यावर एक डोंगराच्या बेचक्यात, उतरणीवर काळभैरी हे देवास्थान लागते. येथून नजर खाली घसरते ; अन् थेट खाली मैलभर अंतरावर असलेल्या गाडहिग्लज गांवांवर स्थिर होते–

तर ह्या काळभैरीची म्हाई संपली म्हणजे, मग आजूबाजूंच्या विस्तीर्ण टापूत पसरलेल्या असंख्य खेड्यापाड्यांतून म्हाईला पेंव फुटते– कुठल्या गांवची म्हाई ह्यानंतर दुसऱ्या दिवशी असते. कुठल्या गांवची तिसऱ्या कुठल्याची चौथ्या. आणि हा दिवस ठरविण्यासाठी एखादेवेळी गांवात वाचावाची होते. गट पडतात. भांडणे उद्भवतात. आणि ह्या कारांतून काही वेळा खून झाल्याची उदाहरणें आढळतात.

म्हाईचा दिवस जवळ येऊ लागेल तसा शेतकरी तयारीला लागतो. शेताभातात उन्हाळ्याच्या मशागतीला जाता-येतां एकमेकाला विचारू लागतो

" काय गा, जोडणी झाली का ? '

' चाल्लीया. आनी तुजी ?'

'कुटली मर्दा, ह्यो असला म्हागाईचा कार, तरीबी बघाया लागलोय येत्या बेस्तरवारी बाजारला जाणार हाय–लिप्पाणीला तशी तिथं मानसं राखून हाय मी. बघायचा शब्द टाकून.

आणि असं कर्ज काढूनसुद्धा रक्कम जमविली जाते. बकरं खरेदी केलं जातं. म्हाईच्या पुनवेत बकरी महाग होतात म्हणून सदू भार्मल– सारखी काही धूर्तच हिकमती माणसं आधीच लहान लहान पालवी खरेदी करतात. म्हाईच्या दिसापर्यंत त्या पालब्यांची चांगलीच चरबीदार गुबगुबीत बकरी तयार झालेली असतात. मग एखादे घरी ठेवून बाकीची बेमाप भावाने विकली जातात.

पोरांच्या हाती ' पब्लिसिटी '

एकदां बकरं खरेदी केलं की, बाकीच्या तयारीला वेळ लागत नाही. धान्यधुन्य घरीच असतं. एखादी अवजड खेप निपाणीला टाकली की·

जुंधळ्याचं पीठ होतं नि भाताचा तांदूळ मग आजूबाजूच्या सगळ्या पपाव्हण्यास्नी आवतने धाडायची, सांगणे द्यायचे, जवळ असेल तर स्वता जायचं, लांब असेल तर पत्रानं आवतान करायचं

सासरी असलेल्या नववधूस माहेरी येण्यासाठी 'म्हाई' ही एक संधीच असते. माईचा दिवस हाय न्हाई तरी कसं म्हणायचं ? 'असा इचारपाचार करून मग सासरची मंडळी गाडी जुंपतात. उन्हाचा रणका व्हायच्या आत पाव्हाण्याचं गांव गाठाव, हा ताळा घलून पहाटंची चाल्ली उगवायल निघतात. नौकरी चाकरी गांवी असलेला एखादा तालेवार माणूस आपल्या बायका मुलासह ह्या दिवशी अगदी टेसात टॅक्सी करून येतो. धुरळा-फुफाटा उडवीत अशी एखादी टॅक्सी एखाद्या कौलारू घरासमोर उभी राहिली की, गल्लीतल्या आजूबाजूच्या घरातील पोरं-टोरं मोठ्या अपुर्वाईनं टॅक्सी भोवती गोळा होतात. काही धीट असलेली रंगावरून नवलाईनं हात फिरवितात. तर नखानी अन् अणकुचीदार दगडानी ड्रायव्हरची नजर चुकवून रेघोट्या मारतात. तर एखादं जाणतं पोर त्या रंगावर 'काशी आणि शिरप्या' ही अक्षरं कोरून काही महिन्या पूर्वी गांवांत घडलेलं हे रंगदार 'प्रकरण' जाहीर करतं. आणि असं 'पब्लिसीटी डिपार्टमेंट '(प्रसिद्धि विभाग) ताब्यांत असलेली काही इरसाल पोरं गावांत आहेतहि!

असा पै-पाव्हण्यांचा गोतावळा जमा होऊ लागतो. जेवण व्हायला अजून तसा खूपच वेळ असल्याने आणि शिवाय दुसरं काहीच काम नस-ल्याने पाव्हण्या-पाव्हण्यात गप्पा रंगू लागतात. मळ्यातून आणलेल्या ताज्या कोवळ्या पानाबरोबर विडा जमू लागतो ; अन् दारापुढील अंगण रंगू लागतं -

आणि असाच दुपारचा एकदीडचा सुमार होतो. पाव्हण्यांच्यात बकऱ्यावर ताव मारायचा म्हणून आज आलेले पाव्हणे सकाळची न्हारी न करताच आलेले असतात, अन् ह्यावेळी त्यांच्या पोटात भुकेमुळे वायगोळे

उठत असतात ! त्यात आणखी आतून–स्वयंपाकघरातून येणाऱ्या खमंग वासाची भर पडत असते. पाव्हण्यांच्या ह्या स्थितीचा त्यांच्या चेहऱ्यावर अंदाज घेत घरमालक सारखा आतबाहेर करीत असतो, बायकामाणसाना विचारीत असतो.

"काय गं–झालं का ? केवढा यळ अजून ?"

"आंबा म्हनावं बाईचं, हये काय, हे झालंच !"

अशाच प्रकारे आनखीन अर्धा पाऊणतास जातो, जेवण तयार झाल्याचे अमृततुल्य शब्द मालकांच्या कानावर पडतात, मग मालक चाटदिशी जागचा उठतो. आत जातो. देवाला निवदफिवद दाखवितो. ह्या वेळात बायका मधल्या सोप्यांत घोंगडी, ताटुकाच्या लांबट घड्या घालून पंगतीची तयारी करतात.

नैवेद दाखवून होतांच मालक बाहेर येतो. म्हणतो,

"हं s, घ्या मंडळी, चालू करा !"

तशी हा वेळपर्यंत आतून ज़रफडत नि तिष्ठत बसलेली मंडळी जेवणावर अक्षरशः तुटून पडतात ! नाक ओढीत, डोळ्यातून येणारे पाणी आंवरीत तो जीभ हुळहुळायला लावणारा तिखट डोम पण चविष्ट रस्सा ओरपूं लागतात. ताज्या भाकरीबरोबर 'सुकं' रिचवूं लागतात–

मग पडतात वाळूगत सुस्त होऊन

अशी ही पहिली पंगत संपते–ह्यानंतर मागाहून, उशीरा वगैरे येणाऱ्या पाहुण्यांना येईल तसं वाढलं जातं–सगळी आवाराआवर झाल्यावर मग आंतमध्ये स्वयंपाकघरांतच बायकांच्या पंगती बसतात–रस्सा कसा झालाय्, सुकं चांगलं शिजलंय् का कच्चंच हाय, चटणी मीठ कसं काय पडलंय्, भात सळसळीत झालाय् का किच्च झालाय् अशी खाता खाता

चर्चा होते. केव्हा-केव्हा पाहुण्या पाहुण्यांमध्ये चौकशी होते, गेल्या साली गांवांतल्या कितीशा पोरी उजवल्या-कोण कोण नवीन आल्या-त्यातल्या कितीजणी नि किती महिन्यांच्या गरोदर आहेत वगैरे-

बायकांची जेवणं संपतात भांडींकुंडीं घासून होतात, तेव्हां बाहेरल्या सोप्यांत जागा मिळेल तिथें (आणि 'चापून हाणलेल्या' मटणामुळे सुस्ती आल्याने) झोपलेल्या पाहुण्यांचा पूर्वार्ध संपून उत्तरार्ध चालूं असतो-अंधार पडेपर्यंत सारा गांव असाच देवाला सोडलेल्या वळूगत सुस्त पडून असतो-

मग किनीट पडूं लागेल तसा एक एक जण जागा होऊं लागतो-जांभया देत, शेजारी झोपलेल्याला उठवीत. नंतर तोंड वगैरे धुवून क्वचित् गुळाचा चहा मिळाल्यास तो ठोसून जरा पाय मोकळे करावे म्हणून कोण कुठं, कोण कुठं निघून जातात.

जेवणाचा सुमार होईल तसा बाहेर गेलेल्यापैकी एक एकटा जमू लागतो. अजून सर्व पाहुणे आलेले नसतात. त्यामुळें ते येईपर्यंत गप्पागोष्टी होतात.

एक पाव्हणा चिलमीच्या तळाशीं छापी गुंडाळीत नि आत प्रथम लहानसा खडा टाकून मग वर तंबाखू ठेचून भरीत घरमालकाला विचारतो,

"आज रात्री गेलं सालीगत कसला ख्योळ हाय का न्हाई ?"

म्हाईच्या रात्रीं प्रत्येक वेळी कसला ना कसला तरी खेळ असतो, केव्हां साधे भजन, तर केव्हां सोंगी भजन, केव्हा' गव्हाणीच्या नाटक मंडळीचं 'रामायण' नाटक तर केव्हां फलाण्या गांवच्या म्हाराचा तमाशा-असं अनेकप्रत्येक वर्षी काही ना काही असतं-

अशाच प्रकारे आणखी काही वेळ जातो. सर्वजण जमलेलेच असतात आणि 'आतून' ही हाक येते,

'अहो, ऐकलंसा का ? भाकऱ्या तय्यार हाईत. जेवून घ्या म्हणावं सगळ्यास्नी. मागनं आनी घोळ नको !"

मग हातपाय धुवून पंगती बसतात. दुपारचाच पण आतां गरम केलेला रस्सा सुकं मटण हयांवर ताव मारतात.

हया वेळेपर्यंत रात्रीचा साडेआठ नवाचा सुमार झालेला असतो. विष्णुपंत कुलकर्ण्याच्या घरापुढील हामचौक जागेत तमाशा होणार असतो. त्यामुळें तिथें एक एक पटका जमूं लागतो ; आणि त्या चौकातच जिथे तिथे घोळक्याघोळक्यानें जमून गप्पा झडूं लागतात. कुठंतरी मधाचं मोहोळ उठून माशा याव्यात तशी पोरंटोरंहि अचानक येऊन उगीच कालवा उसळ लागतात. लोक वसून उरलेल्या जागेंतून पळापळी करीत आब्बुढब्बू खेळू लागतात. मध्येंच एकमेकांशी भांडण उकरून काढून हातापायांना मेहनत देऊं लाततात.

चौकांतच डाव्या बाजूस वामन दीक्षिताचं पडकं घर वाहे. जळीत प्रकरणांत हे घर सांपडलं ... आणि दीक्षितानं गांव सोडलं ते कायमचच. तेव्हांपासून हे घर असंच आहे. पांढऱ्या मातीच्या विटांनी बांधलेल्या त्या भिंती झिजत जाऊन जमिनीत डोके रूतविण्याच्या मार्गावर आहेत.

पण धूर्त सदू भार्मलांचे हिकमती डोके ह्या पडिक जागेचा आज निराळाच उपयोग व फायदा करून घेत आहे.

मजबूत पाय रोवून उभ्या असलेल्या भिंतीशी थोडी साफसफाई करून भार्मल ३ दगडं ठेवतो, वर पाण्याचा हंडा चढवून खाली ढणाडणा जाळ घालतो ... जवळच जमिनिवर ठेवलेल्या फळीवर ६-४ कप (त्या तील दोन-एक कान तुटलेले) व तितक्याच बश्या असतात. त्या धुण्या साठी जवळच्याच बारडींत 'पेशल' पाणी असते. आज १०-१५ तरी

नगद जमतील असा त्याचा होरा आहे.... (गांवात अजूनहि एक देखील 'हॉटेल' नाही. कदाचित् पुढे झालेच तर पहिला मान भार्मलाचाच-ही नोंद इतिहास ठेवीलच!)

पुष्कळसा गूळ व थोडीशी साखर, पावडर नि दूध ह्यांचे भार्मलाच्या 'हॉटेलातले ते नामांकित मिश्रण दोन तीन वेळा पिऊन झाले तरी अजून तमाशेवाल्यांचा कांहीच पत्ता नसतो.

' आयला, ह्ये पंच हाईत का स्वाँग हाईत गा ? '

' माय व्हले ऽ, तमाशा तरी हाय म्हणं, का' उगंचच ढाक मारली! '

'घरांपती पट्टी वसूल केल्यात बायली ऽ आनी नसल कसा तमाशा ?'

असं लोकांत बोलणं चालू झालेलं असतं. एवढ्यांत तमाशेवाल्या मंडळीना घेऊन आलेली टॅक्सी ' पॅ पॅ ऽ हॉर्न वाजवीत गर्दीच्या टोकाला येऊन थडकते. गाडीचं दार उघडतं नि लोकांतून वाट काढीत तमाशेवाली मंडळी 'स्टेज' कडे येते.

चौकाच्या एका कोपऱ्यात थोडी उंचवट्यासारखी जागा आहे तेच स्टेज. त्यांच्या पुढल्या बाजूस दोन वेळूच्या काठ्या रोवून, शेंडयाला एक आडवी काठी बांधली आहे. आणि ह्या काठीच्या दोन्हीं टोंकाला दोन गॅसबत्त्या उत्साहानें लोंबकळत आहेत.

तमाशेवाल्यांत चारपाच पुरुष व दोघी नाचणारिणी आहेत. एक खूपच काळी, भितीना चूना फांसावा तशी चेहऱ्या वर पावडर फासलेली आहे ; नि दुसरी निमगोऱ्या रंगाची, कुठेंच नजर न ठरवितां चौफेर विभ्रम करणारी, शेलाटी व प्रमाणबद्ध शरीरयष्टीची आहे–

स्टेजवर आल्यावर सर्वजण प्रथम लोकांकडे तोंड करून मुजरा

करतात. तेवढ्यांत सोंगाड्या म्हणतोच, "गांवकऱ्यानुं निपाणीस्नं येतावख्ती आम्च्यां मोटार पंक्चरली, आणि पुढारी सभेला लैटाइम करून येत्यात तसं आमी आलूं ! तवा लेकरांची चूक मायबापांनीं पदरांत घेवावीं'

यावर उगीच हंशा पिकतो आणि ताणलेलं वातावरण पुष्कळसं सैल होतं.

हा वेळपर्यंत डफ-हालगीवाले स्टेजच्या मागच्या बाजूला चगाळा गोळा करून जाळ करतात ; अन् डफ-हालगी शेकूं लागतात. तुणतुणंवाला तार ठीक करूं लागतो. ढोलकीवाला ढोलक्यावर चापट्या मारीत, चामड्याच्या नाड्या सैल-आंवळ करत ते 'लावून' घेण्याच्या उद्योगाला लागतो. सुरपेटीवाल्याची पायपेटी असते. तेव्हा तो कुरकुर करू लागतो.

"हितं एखादं स्टूल न्हाई का खुर्ची न्हाई ! मी आतां कसं वाजवायचं हो ?"

यावर स्टेजजवळच्या टवाळ पोरांपैकीं एक पोर कृति करून दाखवीत म्हणतं,

'तोंडावर हात मारून विऊन !"

आणि ह्यावर आजूबाजूस एकच हंशा पिकतो. त्यात एक पोर समोरच्याची टोपी हवेत उंच उडवतो. ह्या गोंधळाचा फायदा घेत मागील मंडळी पुढच्यास रेटतात. शक्यतो स्टेजजवळ जाण्याचा प्रयत्न करतात. एकच कल्लोळ उडून जातो.

तसा एक पंच स्टेजवर चढतो आणि म्हाईला बळी दिल्या जाणाऱ्या बकऱ्यागत लटालटा कापत म्हणतो,

"मंडळी ऽ शांत व्हा-व्हा ऽ. "आणि पुढे त्याच्या तोंडून नुसते 'व्हा ऽ, व्हा' चे बुडबुडे येऊ लागतात ! यावर गांवकरी मंडळी पोट धरधरून

हसू लागतात. काही पोरं शिट्या मारतात, काही ओरडतात. तमाशापूर्वीचा हा तमाशा फारच प्रेक्षणीय असतो.

असा हा फजितवाडा होताच पंच सुरपेटीवाल्याजवळ जाऊन त्याला म्हणतो,

" काय तरी यवस्ता करतो हं लवकरच ! "

पंच बोलत असताना त्यांच्या तोंडातून आलेल्या गावठी मंडेसच्या मदिरेच्या– तीव्र वासाने सुरपेटीवाला गुदमरून जातो. मान हलवून तोंड बाजूला करीत तो म्हणतो , "बरं, बरं."

तसा पंच एका ढेंगेत स्टेजवरून खाली येतो नि गर्दीत पसार होतो.

मग काही वेळातच एक तरणं पोरग जवळच्या कुलकुर्णी वामनाच्या घरातून एक खूर्ची घेऊन गर्दीतून वाट काढीत स्टेजजवळ येतं.

अन् रात्र संपते पण–

आणि मग गरम झालेल्या डफावर थाप पडू लागते. हलगी खणखणू लागते. त्यांत तुणतुण्याची 'तूंई तूंई' आणि सुरपेटीचा सूर मिसळतो ; नि ढोलकीच्या ठेक्यावर नमनास प्रारंभ होतो. न समजणारं आणि गोंधळा-प्रमाणं वाटणारं नमन एकदाचे संपते नि मग गण-गौळणीस आरंभ होतो.

राधाकृष्णाच्या हरएक तमाशांत हटकून असणाऱ्या लीला सुरू होतात.

त्या दोघी गौळणी दूध घालण्यास मथुरेला जाऊ लागतात. पण सोंगाड्या आणि कृष्णकन्हैय्या त्यांना सरळ थोडाच जाऊं देणार ? तो त्यांची वाट अडवून धरतो. तशा त्या गौळणी त्याची विनवणी करू लागतत.

"किस्ना सोड बघू आम्ची वाट ! दूध घालून मथुरेस्नं यायला येळ झाला तर सासू फाडून खातील आमच्या ! "

"एक फसकलास गाणं म्हटल्याबीगर सुटका न्हाई तुम्ची ! हं करा वधूं सुर्वात,"

तशी राधा बनलेली ती निमगोऱ्या रंगाची, नयन विभ्रम करणारी, शेलाटी व प्रमाणबद्ध शरीरयष्टीची नाचणारीण गाऊ लागते.

"बारा घरच्या ग ऽ आम्ही
बारा गौळणी
चालत असतां मथुरेची वाट-"

ह्या लावणीच्या लयबद्ध ठेक्यावर सारे गांवकरी डोलू लागतात. गांवठी मंडेसगत, मदिरेगत, एक वेगळीच नशा त्यांच्या भाबड्या मनावर चढते. आणि त्यांत नेहमीच्या विवंचना, भांडणे पोटापाण्यासाठीं ओढाताणी आटापीटा, दुःख, जगण्यासाठीं द्याव्या लागणाऱ्या तारदाळचा ह्या साऱ्यांचा विसर पडतो. आणि रसगंगेच्या दुथडी वाहणाऱ्या प्रवाहात ते स्वतःला हरवून बसतात.

अशीच रात्र संपते ; अन् मग उरतात केवळ म्हाईच्या दिवसांच्या आठवणी. गांवच्या रोजच्या जीवनांत त्या हरघडी काढल्या जातात.. दिवस सरतील तसा त्यांचाहि विसर पडतो ... अशीच पावसाला सुरवात होते. पिकं तरारतात. कापायला येतात... सुगी होते... तंबाखूचे देखील कापूनचाफ व तो वाळवून, बोदांत भरून गांवात आणला जातो. तसेच भुईमुगाच्या शेंगाचेहि ... असेच दिवस जातात; आणि मग चैत्र उजाडतो गुढी पाडवाहि आटपतो. त्यानंतरची चौथी रात्र संपते, अन् काळोखाच्या पडद्याआडून पांचवा दिवस हळूच गांवाकडे डोकावून पाहूं लागतो. तसे कोंबडे केकाटू लागतात. गांव जागा होऊ लागतो. झोपेतून उठलेल्या सुस्त मनाला आज 'म्हाईचा दिवस' आहे ही जाणीव होते नि सकाळपारचा अंगातला 'पारुसा' आळस पार नाहीसा होतो !

ड्रायव्हर लोक : एक संशोधन.

अठरा पगड जाती आहेत असे म्हणतात. पण ड्रायव्हराना बिचारा ते विलक्षण आत्मविश्वसाने म्हणतील,

"अरे बाबाऽ, अठरा पगड कुठल्या ? १९ जाती हैत. आणि एकोणीसावी जात म्हणजे आमची ड्रायव्हर लोकांची !"

आणि ते खरेहि आहे. ड्रायव्हर लोकांची अशी एक निराळीच जात

असते अर्थात ह्या लोकांशी ज्याचा हरघडी संबंध येतो त्याना ह्या गोष्टीचा चांगलाच अनुभव येतो. अन् क्वचितच संबंध आलेले लोकहि धास्तावून जातात !

इतर जातीत जशी वर्गवारी आहे तशी ह्या जातीतहि आढळते- टॅक्सी ड्रायव्हर्स, व्यापाऱ्यांचे, पेढीवाल्यांचे किंवा सावकारांचे ड्रायव्हर्स, ऑफीसर, वकील, डॉक्टर, इ. लोकांचे ड्रायव्हर्स, मालट्रकवरील ड्रायव्हर्स, नगरपालिकांच्या गाड्यावरील ड्रायव्हर्स, एस. टी. वरील ड्रायव्हर्स इ. हे वर्ग. महत्त्वाचे ड्रायव्हर्स आहेत-साधारणपणे टॅक्सी ड्रायव्हर लोकांचा कनिष्ट वर्ग, वकील, डॉक्टर इत्यादींच्या कारवरील ड्रायव्हर लोकांचा मध्यमवर्ग आणि मंत्र्याच्या कारवरील ड्रायव्हरांचा उच्च वर्ग मानला जातो-एखाद्या जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या टॅक्सीवर ड्रायव्हर म्हणून काम करणाऱ्या माणसाला फक्त ३५-४० ते ५० रूपये महिना मिळणाऱ्या पगारावर रात्रंदिवस टॅक्सीवर राबावे लागते आणि त्याच- बरोबर टॅक्सी ड्रायव्हरांचा एक मोठा शत्रु असतो. त्याला सर्वसाधारण लोक पोलीस म्हणतात ह्या प्राण्याशीहि पेचाला पेच टाकून लढावे लागते. शिवाय आणखी एक प्राणी असतो, त्याला आर. टी. ओ. ड्रायव्हराच्या भाषेत 'तो साला आरटचु, साल्याची सारखी पनौती असती पैसे खायला'! इ. म्हणतात... ह्या प्राण्याशीहि झि झिग असतेच! शिवाय आणखी टॅक्सीचे कंडिशन म्हणजे नामांकित कुठे टायर उडते, कुठे पंक्चर होतात, कुठे रूसतात, वांदा काढतात अन् पुढे जायचे नाकारतात... अशा वेळीहि टॅक्सी ड्रायव्हराचा घामटा निघतो ते निराळेच! शिवाय गाडीतले 'प्यासिंजर' किंवा 'सीटा' कोकलतात अन् 'खालीपिली' वाळूला डोस्क्याला त्रास देतात, हे आणखी अल्लग. रात्र नाही, दिवस नाही, केव्हा भाडे लागेल तेव्हा टॅक्सी घेऊन जायाचे अन् मग दोन दोन तीन तीन दिवस तिकडेच रहायचे असे काम आणि पगार तर ४०-५० रुपड्यापेक्षां कधी जास्त वर चढायाचा नाही. बाहेर महागाई तर असली. मग ह्या ड्रायव्हरचा

फार नाईलाज होतो. एखाद्या गांवी जाताना किंवा येताना रस्त्याच्या उताराचर गाडी 'न्युटल' करीत करीत हा पेट्रोल वाचवितो अन् एखाद्या अडल्यानडल्या टॅक्सीवाल्याला विकून टाकतो. टॅक्सीला एखाद्या वस्ती सोडून येण्याचे' भाडे लागते. त्यामुळे येताना टॅक्सी रिकामीच असते. अशा वेळी मग तो त्या त्या गांवच्या एस्. टी. स्टँण्डवरच्या सीटा आंत ओढतो अन् टॅक्सी भालकहि धूर्त असेल तर तो एखादे वेळी विचारतो ' येतांना काय सीटा बिटा मिळाल्या का नाही रे? ' यावर हा चार सीटा मिळाल्या असे सांगून उरलेल्या दोन तीन सीटांचे पैसे 'लंबे' करतो! पण ह्या साऱ्यापासून असे कितीसे पैसे मिळणार ? बिडीकाडी व चहापाण्याचा वरकंड खर्च निघतो इतकेच... एकंदरीत ह्याची परिस्थिती फारच हलाखीची असते... अन् तिचा विचार सतावू लागला की मग एखाद्या रात्री ह्याची पावले परिचित गल्लीबोळात पडू लागतात. . अन् मग ' ते घर ' येते. हळूच दार ठोठावले जाते. दार उघडताच हा आंत शिरतो... घटाघटा एक 'नग घशात उतरतो आणि मग अर्थात त्याच्या साऱ्या व्यथाना एका रात्रीपुरती तरी मूठमाती मिळते.

ह्या मानाने व्यापारी, वकील, डॉक्टर, पेढीवाले व सावकार लोक ह्यांच्या कारवरील ड्रायव्हर लोकांची परिस्थिति थोडी बरी असते. ह्याना महिना ६०- पासून ७०-७५ रूपया पर्यंत पगार मिळतो. भट्टीचे कपडे घातलेला नि गाडीवर फडके मारणारा झ्याकपाक ड्रायव्हर बघितला की तो ह्या वर्गातला आहे असं निश्चितपणे समजण्यास काहीच हरकत नाही. ह्या वर्गातल्या ड्रायव्हर लोकांचे जादा पगार पडण्यांचे गनिमिकावे असतात नाना डावपेच लढवून ते आपल्या मालकाबरोबर लढत असतात.... मालक 'असा तसा' असला तर हे लोक त्याला पिळूनही खातील ! हे लोक काय काय विकतात नि काय काय मार्ग शोधून पैसे काढतात. ह्यांचो लांबलचक यादी सांगितलीतर सर्वसामान्य लोक अंवाळी चाट पडतील आणि मालक लोक तर बेशुद्धच पडतील ! मोटारीच्या टायरी, इनसे, पेट्रोल, जुनें व

नवेही स्पेअर पार्टस्, नटबोल्टस्, रिंगपाने, फिक्सपाने, स्क्रूड्रायव्हर, पक्कड इ. हत्यारे आणखी .... पण ही यादी येथेच पुरे. आणखी थोडा धक्का द्यावयाचा झाला तर ही सत्य घटना सांगावी लागेल. ती म्हणजे – एक ड्रायव्हर तर एका जिल्ह्याच्या गांवी जाऊन आपल्या गांडीचे पुर्णतः ओव्हर ऑईलिंग केलेंले इंजन घालण्याच्या पवित्र कार्यात मग्न होता. मालकाला हे समजतांच त्याने हनुमान उड्डाण करून जिल्हयाचे गांव गांठले अन् क्षणांत हनुमानाचा पार्ट बदलून रुद्रावतार धारण केला, तेव्हा ड्रायव्हर– मजकूर साठ मैल स्पिडच्या वेगाने पळून गेले. हे वाचतांनां तुमच्या तुमच्या तोंडाचे 'बॉनेट' आश्चर्याने उघडं पडलं असेल; पण वस्तुस्थितीच 'असली' असल्याने त्याला आमचा नाईलाज आहे... त्याशिवाय ह्या वर्गातील ड्रायव्हर लोकाचे मोटार मेकॅनिकल लोहार, इलेक्ट्रेशियन व स्पेअरपार्टसचे दुकानदार ह्यांच्याशी 'कमिशन' चे घनिष्ट 'नाते' असते ते निराळेच प्रत्येक बिलाच्या वेळी ड्रायव्हर लोकाचा जादा 'गाळा' ठेवूनच बिल करावे लागते अशा प्रकारे पुष्कळशी खटपट करून, थोडेसे डोके चालवून ह्या वर्गातला ड्रायव्हर आपली 'पगारवाढ' करून घेत असतो. 'महागाईभत्ता' पाडत असतो–ह्यासाठी संपाची धमकी नाही, सत्याग्रह नाही, काही नाही, इतर लोक ह्यापासून काही धडा घेतील काय?

इतके असून सुद्धा ह्या वर्गातला ड्रायव्हर भलताच असंतुष्ट असतो– नगरपालिकेचा किंवा एस. टी. डेपो मधला ड्रायव्हर होण्याची स्वप्ने पहात असतो.

ह्या मानाने नगरपालिकेच्या ड्रायव्हर लोकांचे फार आरामशीर जिणे असते-ठराविक वेळी काम इतर वेळी आराम· वरील दोन वर्गातील ड्रायव्हर लोकाप्रमाणें ह्याला रात्रंदिवस राबावे लागत नाही. पगारहि ८०–९० च्या घरात असतो–पण हाहि त्याला पुरणे अशक्य असते–नगरपालिकेच्या गाड्यांच्या पेट्रोल टाक्या नेहमी भरलेल्या असतात, अन् बऱ्याच वेळा त्या

पेट्रोलचा हिशेबहि ठेवला जात नसतो. त्यामुळे अशा गाडीवरील ड्रायव्हर गॅलनच्या गॅलन पेट्रोल सस्त्या भावाने टॅक्सीवाल्याना विकतात. काही टॅक्सीवाले व असे ड्रायव्हर लोक यांचे 'कॉन्ट्रॅक्ट' असलेले आढळून येते– शहरा बाहेरील ओढ्यावर किंवा तलावावर नगरपालिकेच्या गाड्या धुण्यासाठी नेल्या जातात, आणि त्या परत आणताना जवळच्या खेडयातील गावठी दारूचे शिसे, इनरी, टचूब्स त्या गाडयातून शहरात आणतात आणी मग ह्यापासूनहि 'धंदा' केला जातो-नगरपालिकेची गाडी म्हणून पोलिसाना व त्या सुप्रसिद्ध जनताजनार्दनालाहि ह्या गोष्टीचा थोडाहि संशय येत नाही ! आम्ही ही गोष्टी एका नगरपित्याच्या कानावर घालताच तो अक्षरशः बेशुद्ध पडला आणि अजूनही तो शुद्धीवर आला नाही. मग आमचा नाईलाज झाला. अन् मग आम्ही ही सुरस हकीकत एका पोलीस अधिकाऱ्याच्या कानावर घातली. ती ऐकून आश्चर्याने त्याने जो 'आ' पसरला तो अजूनहि तसाच आहे म्हणतात.

ह्या वर्गापेक्षा मालट्रकवरील व एस. टी. डेपोमधील ड्रायव्हर एंट्रीसाठी दिलेल्या पैशात 'खावडी' करून नि एस. टी वरील ड्रायव्हर ओव्हर टाईम काम करून एखाद्या प्रोफेसरापेक्षाहि जादा पगार पाडतात... (वाव्रट, मूर्ख, बेजबाबदार इ. इ. कॉलेज विद्यार्थ्यांपुढे लेक्चर्स देऊन हिमालयांत जाऊन संन्यास घेण्याच्या स्टेपपर्यंत आलेले काही नामांकित-प्रोफेसर लोक आमच्या ह्या बातमीकडे लक्ष देऊन ड्रायव्हरचा पेशा पत्करतील अन् नियमीत होणाऱ्या अपघातांच्या संख्येत आगतिक वाढ करून भारताची लोकसंख्या कमी करून ' नियोजनात ' सक्रिय हातभार लावतील, अशी आशा करावी काय?) एस. टी वरील काय किंवा ट्रकवरील काय दोन्हीहि पेशामध्ये थोडाफार त्रास आहे, पण पगाराच्या पैशाचा आकडा पाहून हा त्रास थोडा तरी सुसह्य व्हावा !

ह्यामानाने मंत्र्यांचा ड्रायव्हर म्हणजे मोठा राजस प्राणी, बळीबंका सारखी त्याची सफेद मूर्ती पाहुन कळकट, तेलकट कपड्यातील नि ४०–

४५ रुपडचावर महिन्याच्या महिन्याला 'फाके' मारण्याचीं पनौती लागलेल्या एका टॅक्सी ड्रायव्हरला खरोखरीच हेवा वाटतो ! टॅक्सी ड्रायव्हर रच्या मानाने ह्यांच्या पगाराचा आकडाहि गुबगुबीत असतो .. शिवाय मंत्र्याचा ड्रायव्हर म्हणून एक मान असतो, तो निराळाच ... पगारवाढ महगाईभत्ता इ. साठी मंत्र्यांचे ड्रायव्हर लोक सप करणार आहेत. अशी परवां बातमी वाचून आमचा एक टॅक्सीवाला दोस्त मुंबईला गेला अन् संप झाला नाही, नोकरीही मिळाली नाही म्हणून हात हलवीत परत आला. यावेळेपासून त्याचा दैनिकावरील विश्वास उडाला नि आतां त्याचा वाचण्यासाठी तर राहू द्या पण रद्दोसाठीहि उपयोग करीत नाही, ही हचा डोळचानी (चक्षुर्वेसत्यम्!) बघितलेली हकीकत आहे !





मरणानुभव

मी ड्रायव्हरकी करणार हे समजताच माझ्याबद्दल खूप आस्था बाळगत असलेले लोकप्रिय कादंबरीकार श्री बाबा कदम म्हणाले, "हे तुम्हाला आणखी काय आठवलं ?"

'मोटार लाइनीत शिरून तिथले भलेबुरे अनुभव स्वत: घ्यावेत आणि त्यावर काही लिहावं, असं योजलं आहे !" मी म्हणालो.

असं प्रत्येक बाबतीत स्वतः अनुभव घेऊन लिहितो म्हणाला तर काय काय करणार आहात ? मोटार लाइनीत अपघात वगैरे खूप होतात– तेव्हा स्वतःतला जपा–पन्नास पुस्तके झाली पाहिजेत, माधवराव तुमची !' आश्चर्य वाटून त्यानी म्हटलं,

पण माझ्या मनांत मोटार लाइनीतील, वेगळया जगातील अनुभव स्वतः घेण्याचे वेड ठाण मांडून बसलेले–! आणि स्वतःच्या जीवाची पर्वा तरी केव्हा केली होती ? घरच्या गरिबीमुळे इन्टर आर्टसलाच शिक्षणांला रामराम ठोकावा लागला होता तेव्हाच पांढरपेशेपणालाहि 'गुड्बाय' केलेला–मग शेताभातांत राबतांना, बांध-नडे घालतांना, सारणी खोदतांना तळहातावर फोड येऊन फुटले होते, तेव्हा शाळाकॉलेजाबाहेर देखील एक विद्यापीठ असते, हचाचा साक्षात्कार झाला होता–वैशाखातील रणरणत्या उन्हांत राबून दुपारच्या एक-दीडला बांधावरील बाभळीच्या अपुऱ्या सावलीत भाकरी खाताना सोबतचे मजूर स्त्री-पुरुष केवळ शेवग्याची मूठभर भाजी व कारभर भाकरीबरोबर पाण्याचे घोट गिळताना पाहिले होते. तेव्हा गरिबीमुळे भूक व रावणूक काय असते, हे प्रत्यक्ष पाहून अंगावर शहारे आले होते ! कुदळ–पहार-फावडे-विळा–खुरपे यांची संगत सुटली व स्क्रूड्रायव्हर, हातोडा, फिक्स पाने, रिंग पांने आदि हत्यारे हाती शोभू लागली. सात–आठ वर्षे मोटार–रिपेअरीच्या वर्कशाप-मध्ये काम करीत मोहरलेले ऐन जवानीतील आयुष्य पेट्रोल-डिझेल, ग्रीस व मोंबाईलमध्ये बुचकळून काढलं. हे मोटार मेकॅनिकचं काम सुटलं, आणि नशिबी पिठाच्या गिरणीत राबणं आलं. गिरणीत डंगही (मिरची कांडप मशिन) असलेलं. दळायला आलेली दळणं दळता दळता त्या डंगावरहि काम करावं लागे. डंगहि असा नामांकित होता की जवळ बसून मिरची सारता सारता व बारीक कुटलेली मिरचीपूड चाळणीत घेऊन चाळता अंगावर भकाभका चटणी उडे , ... सारं अंगच आगीत होरपळल्यागत आगडोंब होऊन जाई. रात्री अंथरुणावर पाठ टेकताच साऱ्या शरिराचाच

दाह होतो आहेसं वाटे. नंतर–नंतर तर सारं अंगच चटणीत रंगून गेले. डोळ्यात चटणी उडाली तरी त्रास होईनासा झाला . . . . . ! प्रतिकूल परिस्थितीत इतकं पेचकटून टाकलं तरी प्रतिभेचे घुमारे फुटतच होते. कथा, कादंबऱ्या, ललित लेख . , . . पुस्तकामागून पुस्तकही प्रसिद्ध होत होती. . . . 'चिताक' सारखा संग्रह राज्यपुरस्कारही मिळवून होता. . . . आणि एकाएकी नेहमीची ही चाकोरी 'रुटीन' वाटू लागली. . . ड्रायव्हर व्हावं मोटारधंद्यातील अनुभव घ्यावेत, अन् परत एका वेगळ्या जगावर लिहावं. . . . !

मोटार रिपेअरी करण्यात आयुष्याची काही वर्षं गहाणवट पडलेलीच होती:त्यामुळे अर्थातच ड्रायव्हिंग येतच होतं. केवळ ड्रायव्हिंग लायसन्स तेवढं काढायचं बाकी होतं. प्रथम जिल्ह्यांच्या गावी जाऊन कच्चं, लर्निंग लायसन्स, काढलं आणि नंतर काही दिवसानी आर. टी ओ. ला ट्रायल दाखवून पक्कं काढलं ...

प्रथम जी गाडी नशिबाला भेटली ती फियाट. तिचं कंडिशनही अगदी नामांकित. गाडी टॅक्सीला होती. एकदा चहा पुड्यांचं भाडं आलं. एका प्रसिद्ध चहा कंपनीचा एजंट टॅक्सी काढून जवळच्या १०–१५ मैलांच्या परीसरातील खेडी फिरवून तेथील, किराणा दुकानातून व हॉटेलातून चहा पुडे खपवीत फिरत असे. एकदा तो नेहमी नेत असे ती टॅक्सी कुठेशी बाहेर गांवी गेली होती. त्यामुळे ते भाढे माझ्याकडं आले. त्या एजंटाला चहावाला साहेब म्हणून आळखलं जाई. त्याच्या हाता खाली एक गर्द हि असे. चहाच्या दोन पेट्या डिकीत भरायच्या आणि पुडकी मागील गादीवर व पायांतील हौद्यात ठेवायची, निघायचे. .

गडी टॅक्सी ठरवायला आला. 'बैसजाऊ' म्हणाला. तो बसला. गाडी सुरु करावयास बघतो तो स्टार्टर लागेना ! गाडीला हॅण्डलही नव्हते. तेव्हा गाडी ढकलून चालु केली. एखादेवेळी बॅटरी उतरली असेल, असा

विचार केला. एक-दोनमैल गेलं की रनिंगमुळं डायनाम्यावर बॅटरी चार्ज होईल .. चहाच्या डेपोपुढे गाडी उभी करून माल भरला आणि निघालो. पहिलं गांव येऊन गेलं तरी स्टार्टर लागेना ... एखादी घसारत पाहून गाडी थांबवायाची, हे असं सुरु झालं ...

मध्ये दोन गांवांच्या मध्ये एक पाणंद लागली. पावसाळा नुकताच सरलेला. दिवाळी तोंडावर आलेली. पांदीत बैलगाड्यांची ये-जा अजूनी तरी पावसाळ्यांनंतर प्रथमच मोटारीची चाकं जात असलेली काळवाटा-तून. काळचारानातून पांद गेलेली असल्यामुळे खोल चाकोऱ्या पडलेल्या व बाजूस पावंडे. चाकोऱ्यातून जर गाडीची चाकं घुसवली तर मधले ऊंच पावंडे आईल केस, सायलन्सर आदि गाडीच्या खालच्या बाजूस लागणार, तेव्हा दोन्ही पावंड्यांवर गाडी चढवून व एक चाकोडीमध्ये घेऊन गाडी पुढे केल्याशिवाय दुसरा काही उपायच दिसत नव्हता ; तर मग मी चढविली पावंड्यावर गाडी. थर्ड गिअर ओढला होता तरी त्या पावंड्यावरला गचके मारीत गाडी चढलेली तसा मग सेकंड गिअर ओढला व क्लच सोडला, तर एकदमच गाडी बंदच पडली !

'घ्या आता आपसुक तोंडातून शब्द बाहेर पडले. पुढच्या सीटवर बसलेला साहेब, मी व मागच्या सीटवरचा गडी-एकमेकांकडे पाहूं लागलो. गाडीला हँडेल नाही, स्टार्टर नाही ; ढकल-स्टार्टशिवाय गति नाही ; साहेबाने व गड्याने खाली उतरून ढकलण्याचा प्रयत्न केला. पण बैलांची पावले उठून ऊंच-सखल झालेल्या पावंडावरून गाडी कुठली आलीय हलाय?

डांबरी रस्ता असता तर एकट्याला देखील हलली असती पण इथे तर काळवाट ! दमून दोघे थांबले ... पांदीतून कुणी येते का ह्याची प्रतीक्षा करणं आता आलं ! पांदीच्या दोन्ही बाजुंस कुणी चिटपाखरूहि दिसत नव्हतं, तशीच पांदली सुनी-सुनीशी ! अखेर एक जण म्हसर व शेरडं ताणवत पांदीतून आला. त्यानं हात लावला, तेव्हा कुठं गाडी हलली अन् एका गचक्यात सुरू झाली ! येथून कासरा दीड कासरा जाताच पांद

संपली व पुढील माळ लागला. माळाच्या टेकाडावरून पुढील गाव दिसत होतं. डोंगराच्या कुशीत दडलेलं. एखाद्या ग्रामीण कथा-कादंबरीत वर्णन करावं तसं- झुळू झुळू वहाणारा ओढा, पांद, दोहोंबाजूस हिरवोगर्द वगैरे झाडी आदि. ओढयांतील पाण्यातून कशी तरी गाडी पलीकडे गेली तेव्हा मी सुटकेचा श्वास सोडला. लगेच पुढे कासराभर अंतरावर एक ओहोळ होता, आणि नेमकी त्यात गेल्यावर गाडी बंद पडली ! खाली उतरून ओहोळांतील पाण्यात शिरली तर तळात चिखल व त्यात पुढील चाकं अडकलेली. आडलेली गाडी 'न्यूटल' केली, आणि तिचं ढकलू लागलो. पण गाडी मागेहि जाईना की, पुढेहि जाईना ! घुम्मनघुश्शा स्वभावाच्या साहेबानेही अबाऊट टर्न केला. नि गावाच्या दिशेने चराट चालत सुटला ! गडयानेही गाडीतील चहा-पुडे भरलेली ती भली मोठी पिशवी खांद्याला लावीत म्हटलं. " आम्ही पुढं जाऊन चार दुकानं करतो तंवर तुम्ही गाडी काढून घेऊन या !" आणि तोही बेटा साहेबाच्या मागोमाग ! संकटात अक्षरशः अडकलेल्याला तसेच सोडून पुढे निघून जायची ही चांगली पांढरपेशी पद्धत होती साहेबांची ! हे दोघे तर निघून गेले, आता काय करावे ? मागें ओढचात चार-सहा बायका धुणे धुवीत असलेल्या, त्या काय गाडी ढकलायला येणार ? पुढे थोडचा अंतरावर एक मळा दिसला, मळचात कुणी असतील, मदतीला येतील, अशा अपेक्षेने निवालो . . . उजवी दरडा चढून गेल्यावर विहीर लागली. विहिरीवरच्या मोटेच्या धावेजवळ पाण्याचा उपसा करायला इंजिन बसविलेलं होतं. विहिरीलगतच पानमळा हिरवाचारडंवरलेला. इंजनजवळच्या आंब्याखाली तिघे-चौघे चंची सोडून बसले होतेच. दरड चढून वर गेलो आणि म्हणालो, "पाव्हणं, खालच्या वगळीत गाडी अडकलीया, जरा ढकलू लागा चला हो !"

" अहो ड्रॉयव्हरसाहेब, ह्या पांदीतनं कशाला गाडी घाटलासा हो?

आजून रोड तर कुठं ठार आटलीया ? मग गाडी आडकना तर काय हुईल ?'

असं म्हणून ती सारी चटाऽटा धूड झाडून उठली. चाकाच्या पुढे चिखलात दगड टाकून गाडी जी कच्चून ढकलली ती एकदम वरच आली.

गाडी चालू करून गाव जवळ केलं, गावच्या वेशीत साहेब व त्याचा गडी भेटले. त्यांना आत घेऊन गावातलं पहिलं दुकान गाठलं, घसारतीला गाडी उभी केली. तशी गाडी गिअरमध्ये घातली होती, तेव्हा घसारतीवरून पुढे जायची भीति नव्हती, तरी पण असावा म्हणून पुढच्या चाकाला एक दगड लावायला म्हणून खाली वाकलो, तर पुढच्या चाकाला गेलेली ब्रेकपाईप थोडी ओलसर झालेली दिसू लागली ! स्पिडल आर्मला चाकाची प्लेट बसविलेली असते, तिला जेथे (व्हील सिलेंडरच्या मागच्या बाजूस. ब्रेकपाईप फिट केलेली असते तेथे थोडे ओलसर असे दिसत होते. अर्धे कच्चे का असेना ब्रेक लागतात, आता एवढ्याने काय होणार आहे असा विचार करून त्याकडे मी पूर्णतःदुर्लक्ष केले . . . गावाच्या दक्षिणेकडील दोन दुकानं आटोपली की परत पुढील गावी जायाचं . . . त्या दक्षिणेकडील दुकानाजचळहि पूर्वेस, तोंड धरून एक घसारत होती . . . ती दुकानं करून परत दक्षिणेस जायचं. पण गाडी चालू करतांना परत ढकलायला लागू नये म्हणून मी त्या घसारतीकडे तोंड करून मुद्दाम होऊन गाडी उभी केली होती.

साहेबानं ती दुकानं घेतल्यावर मग दोघे गाडीत बसले. मी स्विच देऊन गाडी न्यूटल केली, घसारतीवरून ती वावभर जाताच एकदम थर्ड गिअर ढकलला, गाडी स्टार्ट झाली व घसारतीवरून धावू लागली . . . घसारत संपण्याच्या आधी ब्रेक लावून गाडी उभी करावी व रिव्हर्स ढकलून मागे घेऊन आपल्या इच्छित मार्गाने जावे, असा विचार केला, अन् ब्रेकवर पाय दिला, तर पायडेल भस्सदिशी आंतच गेले. तसा एकदम काळजाचा ठोका चुकल्यागत झाला ! संकटांतूनहि परत संकट उभे रहावे, तसे झाले !

घसारत डाव्या बाजूस किंचित वळण घेऊन वक्र होत गेलेली. ते वळण पार करून पुढे जातोय, तर एकदम हातपाय थंड व्हावेत, तसे झाले ! कारण खेड्यातील त्या नामांकित गल्लीचं तोंड पुढं इतकं अरुंद होत गेलं होतं की, त्यातून फियाट गाडी पुढं जाणंच शक्य नव्हतं ! आणि ब्रेक तर लागत नव्हते . . . आता पुढे अपघात होणार हे तर अटळ दिसत होतं . . . त्या गोंधळलेल्या मनस्थितीतहि कुठे तरी विचारशक्ति अजूनहि काम देत असावी. मी झट्दिशी इंजन स्विच बंद केली आणि गिअरवर गाडी आवरण्याचा प्रयत्न केला . . . म्हणजे थर्ड म्हणून ओढून गिअर फर्स्टमध्ये ढकलला ! एवढ्याने घसारतीवरील गाडी कुंठली आलीय थांबायला ? वेग किंचितसा कमी झाला, एवढंच.

संकटकाळीहि आपली विचारशक्ति शाबूत असेल, तर आपण त्यांतूनहि शीरसलामत बाहेर पडतोच . . . ह्यालाच काहीजण नशीब साथ असणेहि म्हणतात ! वळणावरचं घर मागे पडताच डाव्या हाताला थोडी मोकळी जागा दिसून आली, त्या जागेवर एक उकिरडा दिसून येत होता, मी चटकन निर्णय घेतला, आणि त्या उकीरड्याच्या ढिगाऱ्यावर गाडी चढविली, तशी गाडी आपोआप त्या उंचवटयावर थांबली !

मी मनांतल्या मनांत कपाळावर हात मारून घेतला, पण साहेबाने तो उघड मारून घेतल्याचे तर दिसतच होते... आता ही बया गावाबाहेर काढावयाची झाल्यास आलेल्या रस्त्याने परत वर टेकाड चढून जाणे आलेच म्हणजे, ही ढकलूनच वर नेली पाहिजे.. हरे राम! आता ह्या दुपारच्या वेळी ह्या खेड्यात माणसं गावायची म्हणजे तसं हे गाव 'व्हलस' प्रसिद्ध खुनी गांव म्हणून लौकिक मिळविलेलं. सुपाऱ्या घेऊन खून करणारं. काही लोक तुरुंगात, काही सुटलेले आणि उरलेले बरेचसे चोऱ्या करण्याच्या ग्रामोद्योगात गुंतलेले. सुगीच्या दिवसांतच ह्यांची खरी 'सुगी' दहा-दहा, बारा-बारा जणांच्या टोळ्या करून आजूबाजूच्या पंचक्रोशीतील सात-आठ मैलांत हिंडायचे व पिकं शेंडलून आणायची, हे

धंदे. अशा हया नामांकित गावांत गाडीचं हे असं व्हावं ! त्यात आणखी साहेबाच्या पिशवीत सकाळपासून चहा पुडे विकून आलेले तीन-चारशे रुपये तरी असणारच ! चार रट्टे लगावून साहेबाच्या हातांतील ती ब्रीफकेस कुणी पळविली नाही म्हणजे मिळविली, असा विचार करीत निघालो.,. एका घरांत पांच-सहा माणसे बसलेली दिसली.

"अहो, गाडी बंद पडलीय, जरा हात लावायला चला!" त्यांना म्हणालो.

"आलावच हं!" म्हणून परत मी, "चला की, पाव्हण जरा हातभार " त्यावर त्यांचं 'आलावच्!' म्हणून परत क्याड्ब्याड् अशी पंधरा मिनिटं तिथंच बोंबलली. अखेर ती सारी उठली, आणि आम्हाला मार्गस्थ करून देती झाली. . .

कधी फर्स्ट गिअर, कधी सेकंड, गिअर टाकत कशी तरी डिगीडिगी करीत गावांतून गाडी बाहेर काढली . . कुणी आडवं आलंच तर गाडीच्या दारावर हात आपटून व दाराबाहेर मुंडकं काढून जोरात ओरडायचं- ' सरा, बाजूला सरा, ब्रेक फेल हाय ! ' कधी मी ओरडायचा तर कधी गडी. बैलगाडीवाले पुढे दिसले तर मागून बोंबलल्यागत ओरडावं लागायचं तेव्हा कुठे बाजूला व्हायचे. . विदाऊट ब्रेकची गाडी चालविणे, हा एक रोमांचक मरणानुभव . . . ! तो यथेच्छ अनुभवत एकदाची आमच्यां गावाबाहेर गाडी थांबवून तिला हात जोडले ' बये इथे भेटलीस ते भेटलीस, बर भेटू नको !'

वाट

गांवची वाट तशी सर्वांनाच प्रिय असते. कोणी शिक्षणासाठी तर कोणी पोटासाठी, कामाधंद्यासाठी तर कोणी नोकरीसाठी बाहेरगावी मुक्काम करून असतात. पण सणासुदीला गांवची वाट नजरेसमोर दिसू लागते. अन् मग पावलें आपोआप एस. टी. स्टँडच्या किंवा रेल्वे स्टेशनच्या दिशेने पडूं लागतात. डावा हात गांवातल्या कुणी कुणी आणायला सांगितलेल्या, तसेच घरच्या आपल्या माणसांसाठी, मुलांसाठी खरेदी

केलेल्या वस्तूंनी भरलेल्या बॅगेला सांभाळीत असतो. नि उजवा हात पावलें जलद पडण्यासाठी मागे पुढे लंबकासारखा हालत असतो.

आश्विन महिना चालू आहे. चैत्र, वैशाखांतली घाईगर्दी, गोंगाट स्थानकावर मुळीच नसतो. त्यामुळे झटकन् आपणांस गाडी मिळते. अगदी हवी तशी जागा मिळते. आज सगळं कसं मनासारखं घडूं लागलंय ह्या विचाराने मनावर समाधानाची दाट सायं साठूं लागते. आणि प्रवासांत मनालाहि वेग येतो. केव्हा एकदा गांवी पोहचू, आपल्या माणसांत मिसळू गप्पाटप्पा मारू असं होऊन गेलेलं असतं.

चिंचेचे ते एकटे झाड

तब्बल अडीच-तीन तासाचा मरगळ आणणारा प्रवास संपल्यावर निपाणी येते.गजबजलेल्या नव्या मोटार स्टॅण्डमधून बाहेर पडल्यावर पावले भराभर रस्ता कापू लागतात.

एक मोठा रस्ता नि दोन-तीन लहान रस्ते सपले की, माझ्या गांवाकडे जाणारी वाट दिसू लागते.

येथे एक चिंचेचे मोठे झाड आहे. एक किराणा दुकान नि जवळच एक हॉटलहि आहे. त्या चिंचेच्या झाडाखाली तंबाखूच्या वखारीत कामाला येणाऱ्या माझ्या गावच्या बायका सुट्टी झाल्यावर जमतात. आणि मग गटागटाने गावाकडं चालू लागतात.

पण आता ह्या दुपारच्या ३-४ च्या सुमारास तेथे कोण असणार! पावसाळ्यात तंबाखूची कामं बंद झालेली. काही दिवसापासूनच उघडीप सुरू झालेली असणार त्यात माझ्या गावच्या बायका विशेष अशा नसतीलच; थोड्या असल्या तरी ते काहीच नव्हे. आणि ह्यामुळे ह्या दिवसात ह्या तिठ्यावर विशेष असे कोणी आढळणार नाही. तेव्हां ते चिंचेचे झाड तसेच उभे आहे-एकटेच आणि डोईवरचे आश्विनाचे कोवळे कोवळे ऊन खात मजेत.

गांवच्या वाटेला लागण्यापूर्वी हचा हॉटेलात चहा पिऊन ताजेतवाने व्हायला हवे आहे. पण गावच्या ओढीने झेपावणाऱ्या मनाला तेवढाहि उशीर सहावत नाही.

येथून तीन एक मैलावर गांव आहे. 'रस्ता' नामेकरून जो काही प्रकार असा आहे कीं, मोटारीची तर बात सोडा, पण बैलगाड्या देखील फक्त उन्हाळ्यांत कांही महिने जाऊं येऊं शकतील. पावसाळ्यांत तेहि बंद. जग इतकं सुधारलं पण मोटारीची चाकं अजूनहि गावाला लागायची आहेत. गावची वाटच अशी हटवादी की, स्वत:मध्ये सुधारणा होऊन रस्ता ही वरची ग्रेड मिळण्याला तिचा सक्त विरोध. किती वर्षे झाली पण तो आपला स्वभाव बदलायला तयार नाहीं. अखेर ती माझ्या गावांतच जन्मली आहेना! गांवची जशी माणसं, तशीच ही वाटहि !

ह्या वाटेवरून पावले भराभर पडू लागतात. शहरावाहेरच्या त्या बकाल वस्तीतून जातांना चोंदटलेली वाट आता उघड्या माळरानाच्या मोकळ्या हवेतून धांवू लागते. अगदीं स्वैरभैर झाल्यासारखी.

गुराढोरांच्या तडाख्यातून, वाचून आपला हिरवा विस्तार सतत पसरणारी हिरवळ अंगावर ओढून घेऊन हा राकट माळ मोठ्या मजेत पहुडला आहे. शहर आता मागे पडले आहे आणि ह्या विस्तीर्ण माळावरून नजर फिरते आहे. मऊशार होते आहे. हा माळ इतका मोठा आहे, इतका मोठा कीं नजरेत मावत नाही ! दूर चढावाला भुईमुगाच्या वेलांची रांगोळी काढली आहे, अन् सखलात भाताची ओपाडी नि एक लांबलचक जुंधळ्याचं शिवार अंग चोरून, अवघडून उभं आहे.

बाभूळ नव्हे शिपाईदादा

आणि ह्या विस्तीर्ण माळावर अगदी एकटे असे एक बाभळीचे झाड

उभे आहे. शिवाराकडून उडालेल्या अन् किलबिलाट करीत पश्चिम क्षितीजाकडे भरारणाऱ्या पांखरांच्या एका थव्याकडे पहात.

हया झाडाजवळूनच वाट गेलेली आहे दूर, लांववरच्या वाटेवर माळाच्या माथ्यावर राहून हे झाड पहारा करीत असते. जणू त्याच्या जवळ जाताच मी म्हणतो,

" कसं काय शिपाईदादा, ठीक ?"

पण हया दादाचे लक्ष मघांच्या थव्यातच अडकून पडले आहे. (बहूधा पूर्वजन्मी तो कुणीतरी एखादा रानकवीच असावा!) त्यामुळे माझे शब्द त्याच्या कानावर जातच नाहीत.

फिक्कट जोंधळा, गडद तंबाखू

येथून पुढे चालले की, माळाचा उतार लागतो. उतारावरून घसरत पावलांच्या पुढे नजर धांवते. सखलातील शिवारावरून पिसं फिरू लागतात. आणि हया नजरेच्या पिसांना हया पूर्वी न जाणवलेले जाणवू लागते. सखलात पुष्कळशी भाताची ओपाडी आहेत. जोंधळ्याची शिवारं आहेत. तंबाखूच्या पट्टया आहेत. सर्वत्र पसरलेल्या हिरवळीतून कापणीला आलेल्या भाताचा पिवळा रंग किती उठून दिसतो! काही ओपाडी कापलेली आहेत. काही कापायची आहेत. कापलेल्या ओपाडयात तालमीतील हौद्यागत खड्डा तयार झाला आहे. आणि त्याच्या आजूबाजूचा हिरवा साज तर काय एकाच रंगाचा आहे ! गांवातच एकी नाही, तिथं हया शिवारातील हिरव्या जगांत तरी कशी असावी? माळावर पसरलेल्या भुईमुगाच्या शेंगाच्या वेलांचा रंग आजून काळसर झाक मारणारा गडद हिरवा आहे. त्यामानाने जोंधळ्याच्या शिवाराचा रंग फारच फिक्कट, आणि पाठीवर रेघ मारावी तशी तंबाखूच्या पट्टयांतून लावलेली रोप नुकतीच गडद हिरव्या रंगाकडे झुकू लागली आहेत. पेरबाच्या झाडावरील

पानासारखी ३–४ पाने नुकतीच त्यांना फुटू लागली आहेत. ही पानं पुढे वाढत वाढत जाणार आहेत. हात–दीडहात होणार आहेत हिरवा रंग नंतर पिवळट होत जाणार आहे. झाडावरची पानं भूईवर डोकी टेकणार आहेत. पण ह्यांना मोठ्या काळजीत वाढविली पाहिजेत. खत–पाणी घातलं पाहिजे. हातात काडी घेऊन हळुवारपणे पानात दडलेल्या आळ्या कीडी बघायला पाहिजेत. आताहि काही तंबाखूच्या पट्ट्यातून थोडी थोडी माणसं दिसत आहेत. काही तंबाखूच्या रोपावर आळ्या तपासत आहेत. कांहीजण आळ्यांकडून खाल्लेली रोपं उपटून टाकून त्याजागी दुसरी लावत आहेत.

काळ्या मामाची आठवण

माळाची उतारत संपल्यावर एका गवताच्या रुंदाट नडयावरून वाट गेलेली आहे गवत पिंढरीइतके उंच वाढले आहे. अन् त्या खाली पाउलवाट झांकोळून गेली आहे. ह्या वाटेवरून चालताना लहानपणीची आठवण. एक थेंब टाकून जाते.

लहानपणी आम्ही गाणे म्हणायचो. 'काळ्या मामा, काळ्या मामा काळी पानं खा, काळी पानं खा. गोऱ्या मामा, गोऱ्या मामा, गोरी पानं खा गोरी पानं खा, वाटेनं चिपळ्या टाकत जा, टाकत जा ऽ तुज्या माज्या शेताकडं बघत जा ऽ बघत जा ऽ ...

ह्या गाण्याच्यावेळी एक चित्र मनावर उमटायचे हिरव्या गर्द शेतातील एका गवताच्या नडयावर (बांधावर) 'लांबडं' पडल्या सारखी एक वाट पडली आहे.माझा दैत्यासारखा काळाकभिन्न येश्यामामा व काटकुळा, घाऱ्याडोळ्यांचा गोरापान ईटुमा काळी नि गोरी पानं (?) खात आणी वाटेनं लालभडक चिपळ्या (पिचकाऱ्या) टाकून, त्याच्या – आमच्या शेताकडं बघत, कापणीला आलेल्या पिकांवर बसलेल्या पांखराना हाकारा देत जात आहेत. त्यांच्या पायात असलेली शिरगुप्पी भरभक्कम, गोंडेदार

आणी वेणी असलेली पायताणं कशी कुर्र कुर्र' वाजत आहेत !

ह्या वाटेवरून जाताना आठवणीचा थेंब असाच अंगभर पसरतो, मला भारून टाकतो. पावलांना गति देतो.

सखलातील शिवारं संपतात तिथच ओढा लागतो. ओढ्याकाठच्या लांबट काळवाटात तंबाखू लावला आहे. पुढे सखल दिसतं, तिथं भाताची– ओपाडी आहेत. ओढ्याची घसरत उतरून मी ओढ्यांत येतो. ह्या आश्विनात वास्तविक ओढ्यांचं पाणी शांत वहायला हवं. पण जवळच मैलाभरावर दक्षिणेस डोंगर आहे आणि तेथून उडघ्या मारीत येणाऱ्या ह्या ओढ्याला खळखळाट फार! जोरदार पाऊस पडलाकी तुडूंब ओढा वहातो. पाऊस थांबला की, पाणीही झट्दिशी, ओसरते आणि वाट मोकळी होते. अशा वेळी पाण्याबरोबर वाहून आलेले कांटकुटे वाटेवरील चिखलात रुतून बसलेले असतात. तेव्हा खाली पाहून थोडं सावधगिरीनं चाललं म्हणजे झालं ! पण आज तशी पुष्कळच उघडीप असल्याने माणसांच्या जनावरांच्या पायदाडाने वाटचांगलीच मळली आहे.

हडकुळीवरची घसरगुंडी

त्या वाटेवरून निर्धास्तपणें मी खाली उतरतो. पाणी जवळ येतांच पॅण्ट आखडतो, पाण्यात शिरतो. पाण्याचा वेग पावलांना स्पष्ट जाणवतो. हळूहळू मी पाय उचलतो. आजुबाजूला पहात असतो. उजव्या बाजूला वावभर अंतरावर 'खडकुळी' असते. ह्या ठिकाणी ओढ्यांत पुरा काळाकरंद खडक आहे म्हणून म्हणायचं 'खडकुळी' ह्या खडकुळीवरून जाताना पाण्याला एक वेगळाच वेग आलेला असतो. लहानपणी ह्या खडकुळीवर घसरगुंडी करायला आम्ही यायचो. नागवे व्हायचो आणि खडकुळीच्या टोकाला बसलं की, वेगाने क्षणात दुसऱ्या टोकाला पाणी आणून सोडायचो. सुरवातीला कमरेतील चड्डया किंवा लंगोट ढुंगणावर फाटल्यावर घरी योग्य असा समाचार घेतलां गेल्यावर मग आम्ही पूर्ण नागवे होऊन घसरगुंडीच

परिपाठ रोज ठेवलेला असायचा.

ह्या खडकुळीकडे पहात मनांत ही आठवण जोजावत मी ओढा ओलांडतो. पलीकडे येतो, पुढील चढ चढतो आणि चालू लागतो.

वर आल्यावर एकदम वर चढत गेलेला ओसाड माळ लागतो. हा माळ पाहूनच मनांतून कारंजी उडूं लागतात. अगदी धावत माळाच्या माथ्यावर जावसं वाटूं लागतं. कारण गांव जवळ आल्याची खूण म्हणजे हा शिदबाचा माळ. माळाच्या माथ्यावर पूर्वेकडे तोंड करून शिदोबाचं एक देऊळ आहे. भोवताली चिंचेची नि लिंबाऱ्याची झाडे आहेत. एका झाडावर उंच काठी बांधली आहे. काठीच्या शेंड्याला भगवं निशाण फडकत आहे. रोजच्या वाऱ्यामुळं त्याच्या दोन फाकोळ्या झाल्या आहेत. तरीहि ते मोठ्या डौलाने व अभिमानाने फडकतच आहे.

ओढ्यातून वर आल्यावर दोन पाऊलवाटा फुटल्या आहेत. एक थोडी उजवीकडे कोन करून शिदोबाच्या देवळाकडे जाते. तर दुसरी थेट समोर जाते ह्या वाटेने गेले असता गांव जवळ पडते आणि शिदोबाच्या देवळाजवळून गेलं तर थोडा मुरा पडतो.

मी जवळची वाट धरतो. चालू लागतो एवढ्यात मागून कलकल बोलत आलेल्या ५-६ बायकांचा थवा मला गाठतो. गांवातील हचा बायका. निपाणीला तंबाखूच्या खळ्यात कामाला गेलेल्या. (अजूनहि काहीच्या लुगड्यावर तंबाखूची पिवळट रंगाची धूसहि तशीच आहे.) पण हचा ओसरला दुपारीच कशा परत फिरल्या ? मी काही विचारावयाच्या आत त्यांतील काशीबाई जांभळेकरीण विचारते.

"कोण म्हादबा काय मोऱ्यांचा ?"

मी 'व्हय्' म्हणायच्या आंत पाटलाची सोनुबाई विचारते "दसऱ्याला आलास सुट्टीवर !"

"व्हय् व्हय् " दोघींच्या प्रश्नाना योग्य असे एकच उत्तर मी देतो आणि विचारतो,

'तंबाखूच्या कामाला गेल्ता, आनी सुट्टी ही अशी अवेळी कशी ?''

माझ्या गांवच्या शिवारा आवारात प्रवेश केल्यावर शुद्ध भाषेची शहरी झूल मी केव्हाच उतरून ठेवलेली असते. मागे गेलेल्या त्या ओढ्याच्या कांठावर (गांवातून परतते वेळी ती पुन्हा मला अंगावर चढवून शहरात जायालाच हवी आहे तेव्हा गांवात जातांना प्रत्येक वेळी ही झूल उतरविली तरी परततांना ती अंगावर चढवावीच लागते. नाईलाज !) ह्यामुळे होतं काय की गांवच्या लोकाशीं मला गांवलीत बोलता येतं त्यांनाहि आपल्यातल्यागत होऊन जातं. शुद्ध बोलल तर बिचकायला होतं. परक्यागत होतं.

"आज एक वख्त काम हुतं. दोपारची सुट्टी झाली. मग कशाला ऱ्हायाचं तितं ? निघालाव झालं."

असे बोलून बायका लगालगा पुढे निघन जातात. अशी भरभर चालण्याची त्यांना रोजची संवयच असते. पुढ गेलेल्या बायकाकडे पाहून विचाराना भरतं येतं . . . एव्हांना त्या माळाचा माथा चढून पुढील उतारावरून दिशेनाशा झालेल्या असतात.

मीही भरभर चालू लागतो. माळाच्या डोक्यावर येतो. इथं आल्या वर समोरच्या सखलात एकदम माझा गावदिसू लागतो. आणि अंगावर कसे रोमांच उभे रहातात.! झाडीत झोकळून गेलेल्या त्या घरांची भरभर ओळख पटू लागते काळचा करंद खापऱ्यांचा तो जूनाट वाडा, पाटलांच्या अमोरासमोर असलेली बंगलोरी खापऱ्यांची ती दोन घर बामणांची दारू गाळून गबरगंड झालेल्या येसाबची ती दुमजली इमारत. सगळ्या गावात एकच एक नि उंच असं नारळींचं झाड आहे ते आमच्याच परडयातलं

झाडीत घर बुजून गेलं आहे पण ह्या नारळीमुळे ओळख पटते चटकन् आणि जातांना वाटेवर लागणारी थोडी उंचावरची ती तालीम ... आणि गांवातील ह्या सगळ्या घरांची राखण करीत वसलेला अंबाबाईच्या देवाळाचा तो उंच कळस असं किती सांगावं ?

माळाच्या उतारावरून धावणारी वाट पुढे लागणाऱ्या शिवारातील एकां पांदीत सरळ घुसली आहे. ही पाणंद सरळ गावच्या वेशीपर्यंत आहे.

पाणंद थोडी ओलसर आहे; तरीपण तिथं चिखल नाही.

ह्या पादींतून चालत गेलं की, पांच-दहा मिनिटातच वेस येते. वेशीतच मारुतीचं देऊळ आहे. सभोवती वडाची झाडे आहेत. त्यांच्या असंख्य पारंब्या जमिनीत घुसलेल्या आहेत; त्यामुळे एकाकी दुपारी सुद्धा भयाण वाटावं, अशी येथील झाडी आहे. (रात्रीच्या वेळी पुष्कळ लोक इथं यायलासुद्धा भितात आणि म्हणूनच गावातील पुष्कळ रंगेल तरुणांनी ह्या वडाच्या बुंध्याशी आणि समोरच्या एक हात उगारलेल्या बलभीमास तिलांजलि दिली आहे !)

गांवात जाण्यापूर्वी मारुतीला नमस्कार करून नि उंबरठ्याजवळचा अंगारा कपाळावर लावून पुढे जाण्यास मी विसरत नाही.

गांवच्या रस्त्यावरून जाताना वाटेत प्रश्न करणारे चौकशी करणारे शहरात असलेल्या 'आपल्या'ची हालहवाल विचारणारे काहीजण भेटतात. त्यांना योग्य अशी उत्तरे देत देत घर येते. साधं ठेंगण्या दाराचं, पांढऱ्या मातीनं सारविलेलं आणि त्यावर हुरमुजाने मोर काढलेलं, चुन्याची पांढरी पाच पाच बोटं उठविलेल. आणि दसऱ्याचं सारवण काही दिवसा" पूर्वीच आटपून घेतल्याली खूण सांगणारं.

घरासमोर गल्लीतील पोरांबरोबर माझ्या भावंडानी गिल्ली-दांडूचा

डाव मांडला आहे.

मी दिसताच ' अन्ना आला, अन्ना आलाऽ' असा गोमगाला करीत करीत ती मला येरगटून घेतात. ह्या गडबडीत माझ्या हातांतील बॅग त्यांच्या हाती जाते. पूर्वानुभवाप्रमाणे त्यांत कांही तरी खाद्यपदार्थ असणार ह्या कल्पनेने त्या बॅगेशी झोंबा झोंबी करीत, एकमेकाला गुद्दे घालून ती आपलीशी करण्याचा प्रयत्न करीत आणि ह्या गोंधळाने मी आल्याची अभावितपणे वर्दी देत ती सारी आत जातात.

वाळून कोळ झालेलं वासरू

बॅगेची नि अंतील वस्तुंच्या भावी भयानक स्थितीची कल्पना करीत दाराच्या वरच्या चौकटीची भेट होणार नाही अशा तऱ्हेने वांकून मी घरांत प्रवेश करतो.

मी आल्याचे समजताच बाहेरल्या सोप्यांत आलेली माझी आजी पुढे होऊन मला मिठीत घेते. सारे आयुष्यभर रानामाळात कष्ट करून करून रापलेले खरखरीत झालेले आपले हात माझ्या गालावरून फिरविते ते तसेच आपल्या कानसुलाजवळ नेऊन कडाकडा बोटे मोडीत माझी दृष्ट काढीत म्हणते.

"माजा सोन्या त्यो ! ऊन डोकोवर घिऊन आलास लेकरा! आनी कती सोकलंय त्वांड माज्या वासराचं ! वाळून कोळं झालयं नुस्तं !",

आणि गांवी आल्यावर प्रत्येक वेळी आजीला वाळून कोळ झालेला, रोडावलेला दिसणारा मी वात्सल्याच्या प्रवाहात विरघळून जातो आहे ... विरघळून जातो आहे ...

अशी पांखरे येती

'मेरे बचपनके साथी मुझे भूल न जाना
देखो देखो हॉसेना जमाना ओऽ वो, हॉसेना जमाना !''

देशाच्या विभाजनानंतर पाकिस्तानला निघून गेलेल्या नूरजहॉ ('नूरजहान' असं लिहिणं हे काही वाचतांना उर्दूसारखं वाटत नाही बघा.) या त्या वेळच्या प्रथम श्रेणीतील ख्यातनाम गायिकेचा आवाज. नौशादचं संगीत आणि (स्मरण ठीक असेल तर) 'अनमोल घडीतील

गाणं.सकाळ नुकतीच उमललेली असते, आणि साडेसात ते आठच्या दरम्यान (आठच्या आधीची ती तीन मिनिटे आणखी स्व. सैगलच्या व्याकूळ आवाजातील एखाद्या रेकॉर्डसाठी नेलीच म्हणा !) 'पुरानी फिल्मोके गीत' मध्ये कधी तरी हे गाणं लागतं आणि मला एकदम पन्नास साल्यात नेऊन टाकतं. नरसोबाच्या वाडीच्या संगमावरील जत्रा मनःचक्षूंसमोर झगमगू लागते. . . . तेव्हा बडील टॅक्सी ड्रॉयव्हर. भाडंहि माझ्या वर्गावरील वालकर मास्तराचं (तेव्हा आतासारखं मास्तरांचं 'शिक्षक' वा 'गुरूजी' होऊन अवमूल्यन झालं नव्हतं. मास्तर शब्द कानावर पडतांच तेव्हा भीतियुक्त आदराची भावना मनांत निर्माण व्हावयाची. उलट आता शिक्षक वा गुरूजी म्हणताच नजरेपुढे एक अस्त्राप व लाचार प्राणी उभा राहून कणव निर्माण होते !) आपल्या हुशार (?) मुलांचं अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊन त्याला मोटारीचा नाद लागू नये म्हणून वडील तेव्हा मला कटाक्षाने दूर ठेवीत, पण त्या वेळी कसे कोणास ठाऊक घेऊन गेले. जवळचा रस्ता म्हणून कुन्नुर–मांगूरचा मार्ग. पण रस्ता इतका गचाळ की, नुकतीच सावंतवाडीहून खरेदी केलेली १७४३ नंबरची ती गुड कंडिशण्ड व्ही एट् फोर्ड असूनहि ते खड्डे व बैलगाड्या जाऊन–येऊन निर्माण झालेल्या चाकोऱ्यातून सुरळीत गाडी नेईपर्यंत राम तर आठवेच शिवाय चालविणाऱ्याचे कौशल्यहि प्रगट होई . . ! नदीच्या तीरावर पोहोचलो, तेव्हा रात्र फुलेली होती. पुचगंगा कृष्णाला मिळते तो तीर . . पलीकडे घाट, अन् नरसोबाची वाडी. संगम होऊन विशाल होत गेल्यागत वाटणारे पात्र. उजव्या हाताला खाली कुरूंदवाडच्या किल्ल्याच्या भितीला स्पर्शून जाणारे आणि वरच्या रस्त्यापासून खालच्या पात्रापर्यंतच्या घसारतीपर्यंत दक्षिणेकडे तोंड करून ओळीने असणारी दुकाने. हॉटेले· पेट्रोमॅक्सच्या बत्त्यांनी झगमगणारी (तेव्हा आता सारखी खेड्यापाड्यावर वीज पोहचली नव्हती म्हणा आणि पेट्रोमॅक्सच्या बत्त्यानी जत्रेला एक खास ग्रामीण टेचू येतो, तो आता विजेच्या या दिव्यांनी झगमगणाऱ्या जत्रांना व रेडिओ, ट्रॅन्झिटर्समधून ओकल्या जाणाऱ्या उडत्या चालीतील व दीड–दोनशे वाद्यांच्या कल्लोळांत गुदमरलेल्या गाण्यांना कुठला आलाय् ?) आणि

त्यातीलच एका हॉटेलांतील गल्ल्याच्या टेंबलावर ठेवलेल्या ग्रामोफोन मधून मधाळ शब्द बाहेर पडलेले.

' मेरे बचपनके साथी मुझे भूल न जानाऽ
देखो देखो हँसेना जमाना ओऽ वो हँसेना जमाना !

त्या नऊ-दहा वर्षाच्या पोर वयात गाणे कोण म्हटल कुठल्या सिनेमातील नि कुण्या संगीत दिग्दर्शकानं बाधलेलं आदि संदर्भ माहीतहि नव्हते. पण कानातून मनांत शिरलेले ते मधाळ शब्द तिथे कोरलेच गेले ! अन् रेडिओवर ते गाणे सुरू झाले की, नजरेसमोर वाडींच्या संगमावरील ती जत्राच उभी रहाते ! !

जमाना जीत गया

त्यानंतर पंचवीस वर्षानी वाडीला जाण्याचा योग आला, नात्यातींल एका आजीच्या अस्थी विसर्जनासाठी. कारने गेलेलो कोल्हापूर–जयसिंगपूर शिरोळ रस्त्याने घाट उतरून खाली आली. कृष्णेच्या पात्रात थोडं पाणी होतं, अन् पंचगंगेचं पात्र जवळ–जवळ कोरडच पडलेल होतं. पुढे मावळतीकडे पात्रावर उंचच्या उंच व लांब असा पूल बांधून कुरुंदवाडकडील माझा भाग वाडीच्या भागाला जोडण्यात आला होता. पंचगंगेच्या पात्रातून चालत मी पलीकडे गेलो अन् मनःचक्षूंसमोर जत्रा फुलली. पंचवीस वर्षापूर्वीची नि 'फोनु'च्या लांब कर्ण्यातून आवाज बाहेर पडू लागला-'मेरे बचपनके साथी मुझे भूल ना जानाऽऽ.'

आता रात्रीचा नऊचा सुमार झालाय, आणि रेडिओ कुवैतवरील फर्माईशच्या कार्यक्रमात गीता रॉयच गाणं लागलंय-(त्यावेळी 'रॉय'ची गीता 'दत्त' झाली नव्हती.)

' मेरा सुंदर सपना बीत गया
मै प्रेम में सबकुछ हार गयी,
बेदर्द जमाना जीत गयाऽ. . .

शब्दात मनातील भाव इतक्या उत्कटपणे प्रगट करणारं गा सापडणं कठीण. जणू गीता रॉयचच हृदय भरून आलंय; प्रेमभंगाच्या दुःखानं नी ती खूप वेळ रडून-रडून डोळे सुजलेल्या अवस्थेत थन् भरलेल्या आवाजाने ह्या गाण्यावाटे कोंडलेल्या दुःखाला वाट करून देतेय असं वाटावं! 'दो भाई' चित्रपटातल्या या गीताला एस्. डी बर्मननी संगीतबद्ध केलं होतं आणि गीतकार होते, राजा महेंदी अली खान. या तिघांपैकी आता कोणीच हयात नाही.

माझ्या लहानपणी रेडिओ हे एक अप्रुपच. गावात दोन-चार रेडीओ असतील-नसतील. आम्ही तेव्हा साखरवाडीवरील कोठोवाले अण्णांच्या घरात भाड्याने रहात होतो. साखरवाडीवरील तेव्हाची तालेवार आसामी म्हणजे श्री. मारुतीराव कदम हे पूर्वी एका तंबाखूच्या फर्ममध्ये साधे कारकून होते. पण तेव्हा गाजलेल्या गोवा लॉटरीत बक्षीस मिळाल्याने एकदम लक्षाधिश होऊन स्वतःशीच फर्म काढलेले. तर बक्षीस मिळाल्यापासून त्यांना लॉटरीवाले कदम म्हणत. त्यांच्या घरी रेडिओ होता. कदमांच्या घरापुढील रस्त्यानेच शाळेला जाणे येणे. अशा वेळी त्या रेडिओचे स्वर खुणावू लागत. उत्सुकता वाटे-कसला असेल रेडिओ. . .? पहावेच एकदा! आणि मग मनाचा हिय्या करून शिरलोच आत. रेडिओ माडीवर. दारालगतच उजव्या हाताला जिना. सुरांचा पाठलाग करीत वर शिरलो. कुणी तरी रेडिओ लावीत होतं जणू कारण कुठलंहि निश्चित स्टेशन लागत नव्हतं, रेडिओ लावताना होतो तसा खुर्रऽ खुर्रऽऽ, टुर्रऽऽ टुर्र' आवाज होत असलेला. वर गेल्यावर पुढील बाजूस गच्ची. अन् जवळच्या दाराने आत गेल्यावर पुढील सोपा-अरुंद व लांबसा. त्या सोप्यातच रेडिओ होता. रेडिओ !! काळी कॅबिनेट असलेला थोडा अरुंद व बराचसा उंच वाटणारा आंत दिवा पेटलेला न् काचेवर लाल-हिरवे इंग्लिश आकडे ! आणि पंधरा सोळा वर्षाचा हाफ पँटीतला कदमांचा मुलगा-जयवंता-रेडिओ लावीत असलेला ! !

आत जाताच मी रेडिओ पुढे आलकट-पालकट घालून बसलो.

एखाद्या देवळांतील मूर्तीपुढे ध्यानस्थ बसावा, तसा अन् अचानक रेडिओवरून काळजाला हातच घालणारे शब्द बाहेर पडले 'मेरा सुंदर सपना बित गयाऽ

असंच केव्हातरी रेडिओवर हे दर्दभरं गीत 'छोटा भाई' (की बडा? काही आठवत नाही आता .) मधील लागतं. आणि लहानपणी प्रथमच पाहिलेला तो रेडिओ आठवू लागतो.

स्मृति रेंगाळतात

एखाद्या गाण्याच्या स्मृति अशा दीर्घ काळ काळजात सांठून रहातात. अन् ते गाणं प्रथम आपण कुठं ऐकलं ते सारं आठवू लागतं. आता मै नशेमे' हूँ या चित्रपटातलं गाणं घ्या

"हम है तो चाँद-सितारे,
जहाँके रंगीन नजारे,
हाय रे हाय दुनिया . . . "

'मै नशेमें हूं' हा राजकपूर, मालासिन्हा, निशी, मारूती आदींच्या भूमिका असलेला चित्रपट तसा विशेष गाजलाहि नव्हता. त्याकाळी फॉर्मात असलेले संगीत दिग्दर्शक शंकरजयकिशन या द्वयीचं संगीत असूनहि ह्यातील गाणी तशी काही लोकांच्या तोंडात दीर्घ काळ घोळत राहिली नाहीत ; तरी पण ह्या चित्रपटातील मुकेश व 'साथी'ने म्हटलेलं वरील गाणं लागलं की' वाईबाहेरील परिसर मला आठवूं लागतो. १९५८ सालचा डिसेंबर वाईतून बाहेर पडून पांचगणी महाबळेश्वरकडे गेलेला रस्ता डाव्या हाताचा डोंगर व रस्ता. ह्यांच्यामधील चिचोळ्या पट्टीत आमच्या कॉलेजच्या एन्. सी. सी. चा नाताळी कॅम्प पडलेला. सकाळची परेड आटोपून, आम्ही टेन्टस्मध्ये आलो. आपापल्या किट्स्मध्ये 'मग', 'वाऊल', प्लेटी' थाऱ्यावर आहेत का पाहिल्या. कारण जेवणाच्या ह्या थाळ्यांच्या चोऱ्या फार होत. काही बनेल मुलं जेवणाची ही आयुधं घरीच ठेवून वा 'विसरून' येत अन् मग कॅम्पमध्ये चोऱ्या करू लागत. एकाची चोरी झाली की मग तो दुसऱ्याची भांडी चोरून आपली 'इक्वल' बरोबर करीत असे! तर मग

बाऊल–प्लेटी घेऊन मेसपुढील मांडवात जेवायला बसलो होतो तोवर रस्त्याकडे बोट दाखवून कुणीसं ओरडलं– "अरे राज कपूर !" राज कपूर तर तेव्हा टॉपचा नायक ! सारे धावलेच. कुणी अन्नाने भरलेल्यां पुढचातील प्लेटी तशाच सोडून, तर कुणी त्या तशाच हाती तोलत ! गाजरासारखा लालभडक राज कपूर पाहून कित्येकांना परमेश्वर पाहिल्याचं सुख झालं बनियन व हाफपँटीतल्या आमच्या माकडसेनेला हात हलवून अभिवादन करीत राज कपूर टांग्यात चढला. तो टांगा एका रिकाम्या ट्रकच्या मागील बाजूस (फाळकं पाडून) जोडला होता. ह्या घोडं नसलेल्या टांग्यामागे घोडे असलेले दोन टांगे त्यात मारूती (तेव्हाचा विनोदी नट) व त्याचे साथीदार नि पुढच्या टांग्यात राजकपूर! आणि ट्रकमधील स्पीकरवर 'हम है तो चाँद सितारे, जहाँ के रंगीन नजारे . . हे गाणं नि ही सारी जत्रा १–२ फर्लांग जाऊन परत मागे यावयाची असं रिटेक सुरू होतं ! कधी–मधी क्वचितच हे गाणं सिलोनवर लागतं नि हे सारं आठवू लागतं!

ह्याच कँम्पमथ्ये ' सब कुछ सीखा हमने, ना सीखी होशीयारी, सच है दुनियावाले, कि हम हे अनांडी ' हे मुकेशच गाणं ऐकलं ! सायंकाळची वेळ टबमधून पाणी भरून घेत होतो नि 'क्लबवरील लांऊडस्पीकर ह्या गाण्याचा सुरुवातीचा आकर्षक पीस लागला आणि मधलं एक खोल वताड ओहळ ओलांडून मी क्लबकडे धांवतच सुटलो होतो ! (अंडर ऑफिसर व सार्जंट लोकांची नजर चुकवून, सिव्हिल ड्रेसवर ह्या ओहळांतूनच आम्ही कँम्पबाहेर निसटून वाईतील पोरीवर लायनी टाकायला, उंडरायला जात असूं ! !) जवळ जाई पर्यंत मुकेश गायला लागला होता ! वरील दोन्ही गाणी लागली की, वाईबाहेरचा तो रम्य परिसर डोळ्यासमोरून सरकू लागतो !

अशीहि आठवण

स्मृति अशा कुठे–कुठे चिकटून बसतात ! लहानपणी श्री. भालजी पेंढारकराचे चित्रपट म्हणजे केवढे आकर्षण वाटायचे ! तेहि ऐतिहासिक

असेल तर मग सांगायलाच नको ! अशाच त्या पोरवयात सखामामा बरोबर ज्योतीबाला गेलो होतो. परत कोल्हापूरला आलो, तेव्हा खूप रात्र झाली होती. मामासोबत त्याचा एक मैतरही होता. म्हणाला 'सिनेमाला जायचं ! आणि सगळ्यात मोठं आकर्षण म्हणजे राजाराम टॉकीजला लागलेला मा. विठ्ठलचा शिलंगाचे सोने'. हातांत नंगी तलवार घेऊन मराठा सरदाराच्या भूमिकेत रुबाबदार मा. विठ्ठल ! तिकिट खिडकीपुढे भली लांब रांग लागली होती. तरी आम्ही बारीला राहिलोच आणि खिडकीजवळ आमचा नंबर यायलाच तिकिटे संपून खिडकी बंद झाली! न् मग आम्ही जितीच्या ओढ्यावरील कुंभारवाड्यातील मामाच्या ओळखीच्या एका गृहस्थाच्या अंगणात झोपून रात्र काढून सकाळी उठून गावी आलो होतो !

माझ्या लहान बहिणीचं लग्न कोल्हापूरातील मंगळवार पेठेतील श्री पायमलांच्या घरी ठरलं आणि मग लग्नाला सारी हाफटनीत बसून गेली. साठमारी जवळून गेलेल्या गल्लीत घरं. घरा पुढे मांडव घातलेला आणि आमची गाडी मांडवापुढे थांबताच एकदम लाऊडस्पीकरवर गाणं लागलं

" मला लागली कुणाची उचकी ओऽऽ मला ..."

प्रथमच कानावर पडलेल्या लावणीतील ते बोल नंतर काळजात घर करून बसले, ते कायमचे ! ती लावणी कुठल्या चित्रपटातील, कुणी म्हटलीया . संगीत कुणी दिलय, ती लिहिलीय कुणी, हेहि तेव्हा मला ठाऊक नव्हत ! पण तिचा मुखडा, चाल, लचक, ठेका – सारच आकर्षणारं !

पुणे केंद्रावर ' आपली आवड ' मध्ये अजूनही कधी कधी वरील लावणी लागली की, बहिणीच्या लग्नातील मांडवच डोळ्यापुढे उभा राहतो.

पाखरं खांद्यावर

स्मृतिची पांखरे अशीहि केव्हा केव्हा येऊन खांद्यावर बसतात,आणि कुजबूजु लागतात !

"ये रात भिगी भिगी,
ये चांद प्यारा प्यारा"

हे किंवा,

"आजा सनम,
मधुर चाँदनी मे हम तुम मिले तो
विरानी में भी आ जायेगी बहार
झूमने लगेगा आसमाऽ"

ही 'चोरी चोरी' मधील मन्ना डे व लताने म्हटलेली गाणी लागली की, नजरेसमोर निराळेच कांही उभे राहते. १९५६ सालचे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांस जागृति निर्माण करण्यासाठी आम्ही ८-१० विद्यार्थ्यांच्या गटाने अधिवेशन घ्यायचे ठरविले होते. आजूबाजूच्या १०-१२ मैलांच्या परिसरात प्रचाराचा धडाका लावला होता. कांही सायकलीने जायचे, तर सायकल न येणारे पायी जायचे. सायकलीवरून फिरणारे आम्ही ४-५ जण. एके दिवशी कोगनोळीत आलो तेव्हा संध्याकाळ झालेली. तेव्हा काहीनी टूम काढली की, आता येथून परस्पर कोल्हापूरला जायाचं सिनेमा पाहायला ! कोल्हापूर येथून १४-१५ मैलावर. सर्वच विद्यार्थ्यांना तेव्हा हिंदी सिनेमाचं जबर आकर्षण. रेडिओ सिलोनवरची गाणी ऐकून हचा आकर्षणात भरच पडत असलेली . . . मग तशाच सायकली, ताणल्या कोल्हापूरला आणि 'प्रभात' टॉकीजला लागलेला साडेनऊचा 'चोरी चोरी' पाहून परतलो. त्यावेळी कोल्हापूर-सारख्या अनोळखी शहरातील पोलिसांचं भय मानगुटीवर. डीम लाईटच्या सायकलीवरून आलं नि रात्री पकडलं की. सरळ लॉकअप्मध्ये ! म्हणून कोल्हापूरच्या जकातनाक्यापर्यंत तशाच सायकली चालवत आणून तेथून मग वर बसायचं ! त्या रात्रीहि असेच आम्ही यावयास निघालो. २५ मैलांचं अंतर व अमावास्येची रात्र आणि सायकली मारता मारता रस्ता-भर आम्ही 'चोरी चोरी' ची गाणी म्हणत येत होतो- ! ये रात भिगी

भिगी, ये चाँद प्यारा प्यारा,' ' आजा सनम मधुर चाँदनी मे हम तुम'. इ.

आणि हां, आणखी ते ' पंछी बनू उडती फिरूं मस्त गगन में, आज मै आझाद हूं अपनी चमनमे ! तशी 'चोरी चोरी' मधील सर्वच गाणी आवडलेली. त्यावेळी गाजणारी, पण विशेषत: वरील तीन तर आमच्या खास आवडीची आणि आताहि ती अधी-मधी रेडिओवर लागताच ती अमावास्येची रात्र आणि ती गाणी म्हणत आम्ही २५ मैलांचा तो सायकलवरून कोल्हापूरहून केलेला प्रवास आठवू लागतो. १६-१७ च्या उमेदीचे नव्या नव्हाळीचे ते दिवस आठवू लागतात . . .

आता संगीताचे कारखाने


पुढे कॉलेज शिक्षणासाठी कोल्हापूरला ' वॉर अँड पीस,' 'बिटवीन हेल अँड बॅक' असे एकाहून एक सरस इंग्रजी चित्रपट पाहून हिंदी चित्रपटांचं वेड बरंच कमी झालं तरी त्यापूर्वी पाहिलेल्या चित्रपटांचे नि त्यांतील एकाहून एक सरस गाण्याचे काय ? सी. रामचंद्र, नौशाद, रोशन, शंकर-जयकिशन, एस. डी. बर्मन, मदनमोहन, चित्रगुप्त, ओ. पी. नय्यर असे एकाहून एक कसलेले संगीत-दिग्दर्शक व त्यांनी खास मेहनत घेऊन बांधलेली गाणी जणू संगीताची मेजवानीच . . . हंऽ तर गेले ते दिवस! सिनेसंगीताचे सुवर्णयुग ते ! ! आता तसले दिवस कुठले येणार म्हणा ! आता लक्ष्मीप्यारे . 'कल्याण-आनंद,' 'आर. डी.' यांतील सारा निर्मा- त्यांना गहाणवट घेतलंय् १५०-२०० वाद्यांच्या कल्लोळातील गुदमरलेल्या चालीची गाणी. त्या चालीहि दीर्घकाळ स्मरणात राहतील अशा नव्हे ! ! अलबेलातील गाण्यावर आम्ही नाचलो होतो. आता आमची मुलं नाचतात तर पिढ्यांनपिढ्या टिकून राहणारी अशी झिंग अलीकडील कितीशा गाण्यांत आहे? आता केवळ कारखाने सुरू झालेत पाणी पाडायचे !

स्मृतीची पाखरं अशी खांद्यावर बसली की, अस बरंच काही आठवू

लागतं तुम्हांलाहि आठवेल. जरा फिरवा बटन रेडिओचं; पाहा . .







जोगतिणींचे जग

'पोरीला जोगतीण म्हणून सोडायची हाय !' ती म्हणाली.

'पण का? काय तिनं एवढं पाप केलंय म्हणू त्याची ही कठोर शिक्षा? चारचौघींसारखं तिचं लग्न का लावून देत नाही तुम्ही ? तिच्या आयुष्याचं का असं वाटोळं करता ? का ?' मी तळमळून विचारत होतो . . .

पण माझे प्रश्न तिच्यापर्यंत पोहचतच नव्हते. मध्ये कुठे तरी थिजून जात होते . . . परंपरागत समजुतीच्या-रूढीच्या पोलादी भिंतीवर आदळून हतबल होत होते. एखाद्या मुलीला जोगतीण म्हणून सोडणं किती भयंकर आहे. त्यामुळं त्या मुलीच्या आयुष्याची कशी परवड होते, कशी नासाडी होते, हे मी तिला सांगत होतो ; पण तिला ते पटत नव्हतं. एखाद्या वेडचा माणसाचं निरर्थक प्रश्न विचारल्यावर त्याच्याकडे जसं पहावं, तसं ती माझ्याकडे पहात होती. मग म्हणाली,

'जोगतीण केल्यावर वाटुळं कसं हुईल ? झालं तर उलट चांगलंच हुईल . . . यल्लमाला नवस मागून घेतलाय मी. त्या वख्ताला मूल होत नव्हतं मला. हज्जार नवस केलं खरं, एकबी फळाला येईना.मग यल्लम्माला नवस मागून घेतला, 'आयी, यल्लूबाई, मला मुलबाळं हु दे ; पयला पोरगा झाला तर जोगता म्हणून नि पोरगी झाली तर जोगतीण म्हणून तुझ्या दरबारात सोडते . . . पयली पोरगी झाली. आता ती वयात आली. मग नवस बोल्लाय तसं तिला देवाला सोडाय् नको ?'

'आणि नाही सोडली तर ?'

'न्हाई सोडली तर . . . ? यल्लाम्मा मोठं जागतं दैवत हाय. नवस केल्याला फेडला न्हाई तर जलमाचं वाटुळं हुतंय्. सत्यानास हुतोय . . . अशी कैक उदाहरणं घडल्यात !'

मला हे सारं पटणं शक्य नव्हतं. एखादं दैवत स्त्री-पुरूषांचा अशा विचित्र प्रकारे बळी घेण्यास उत्सुक असेल, त्यांचं आयुष्यच असं काढून घेऊन त्यांना माणसांतून उठविणे हीच त्याची रीत असेल, हे सर्व माझ्या सुशिक्षित मनाला पटणं शक्य नव्हतं. हे सगळे त्याच्या भक्तांनी केलेले खेळ . . . पुरूषासारखा पुरूष, पण जन्मभर त्याला चोळी-लुगडं नेसून जोगता बनून बायकाप्रमाणं रहावं लागतं . . . स्त्रीसारखी स्त्री, पण इतर बायकांच्या वाटचाला येणारं आयुष्य, तिला जगता येत नाही. की

लग्न करून सुखाचा संसार थाटता येत नाही की चारचौघीसारखं मानाचं सुवासिनीचं जिणं जगता येत नाही अन् मग शरिराची भूक भागविण्यासाठी काही तरी सोय, तडजोड, करावी लागते.दर मंगळवारी, शुक्रवारी प्रत्येक घरासमोर जाऊन ' आकुंदी ऽऽ जोगवाऽ, म्हणत जोगवा मागून गुजराण करावी लागते, .. छे, छे, हे सारं भयंकर होतं, फारच भयंकर होतं, विचित्रही होतं ... !

एक तपापूर्वी बेळगांवच्या 'तरुण भारत' दिवाळी अंकातून, नंतर तीत बरेच फेरबदल करून 'मेनका' मासिकातून प्रसिद्ध झालेल्या व नंतर 'बताशी' या माझ्या कथासंग्रहात समाविष्ट करण्यात आलेल्या 'जोगतीण' या कथेतील वरील उतारा. सत्य घटनेवर आधारलेली ती कथा. कथेतील नायकाप्रमाणे माझ्याही डोक्यात एक वादळ घोंगावत असलेलं ... मराठा समाजातील एक कोवळी, देखणी नीटस मुलगी. जणू मोगऱ्याची कळीच अशी मोकारलेली. वाटायचं आपणास बायको लाभावी तर ती अशीच – शालीन सुंदर. पहाताच देवघरात तेवणाऱ्या शांत तृप्त समईच्या ज्योतीची आठवण व्हावी ... तर एके दिवशी तिच्या विधवा आईनं तिला जोगतीण म्हणून देवाला सोडलं ... ऐकून मी तीन दिवस बेचैन, अस्वस्थ, डोक्यात एक वादळ ... ती अजाण एवढी–एवढीशी पोर, कुणा–गुणवंताचा संसार तिनं पाकळी साकळीनं फुलविला असता, तिलाच आता दहा जण खाली देह अंथरीत वारयोषितेचं जिणं जगवं लागणार ... माझ्या नजरेसमोर एक निष्पाप जीवाचा बळी घेतला जात होता न् नुसत पहाणं व तळमळणं हेच माझ्या हाती. १८ वा १९ चं वय. मी कोता-दुबळा, क्रूर रूढीचा कोयता त्या कोवळ्या जीवांच्या मानेवरून चरचरून फिरला तरी ती आवरणे अडविणे माझ्या कुवतीबाहेरचं होतं... तर त्या विधवा बायजाण आपल्या लेकीचा तसा बळी का घ्यावां? स्वत:च्याच लेकीची दावेदारीण का बनावं? तर विधवा बायजा जोगतीण 'झुलवा' लावून घेतलेली, (झुलवा लावून घेणं म्हणजे एखाद्याजवळ लग्नाच्या बायकोगत रहाणं. थोडक्यात, पाट लावून घेणं.) पोटाला पोरं झाल्यावर एक तरी देवाच्या दरबारात

सोडायला पाहिजे; मग तो पोरगा असो, पोरगी असो, तर तिला ओळीनं चार पोरीच झाल्या, सोडूया-सोडूया करीत पहिली हुडागत वाढली, 'जाग (म्हणजे लग्नासाठी मागणं) सांगून येऊ लागलं. एका स्थळाला पसंत पडली. लग्न उडवून टाकलं. तिच्या पाठीवरचीही एक-दोन वर्षांनी न्हानी धुती झाली. हीही अशीच फुसुकदिशी कुणाला तरी पसंत पडेल, आई यल्लुबाईचा (यल्लम्माचा) रोष ओढवेल, म्हणून घाईगडबडीनं देवाला सोडणं' 'परंतु जोगत्याचा ताफा आला. (आपल्या कळपात एक मेंढरू सामील होतय्, मग मागं का ?)

बायजाच्या दारात लग्नातल्यागत मांडव. माडवाच्या मेढीला नारळीचया झावळचा, छाताला आंब्याचं ढाळं, रात्रभर जागर. चवंडक टांग् टुंग् टगांग् करत्यालं, तुणतुगं तुंईतूंई. चवंडक तंगव्याकडं तुणतुणं सत्यव्याकडं. 'जग' (रेणूकेचा, यल्लम्माचा, पितळी मुखडा असलेला लांबलचक, पसरट हारा-भोत्याभोर आयने, मोराची पिसं निरनिराळया देवदेवतांच्या मुखवटचानी सजविलेला.) सांभांळणाऱ्या परमूच्या हातातील टाळेचाही त्यात नाद ; न् उपस्थितांची कपाळं, आपल्या गळ्यातील पिशवीनं पिवळीधम्मक करणारा गोरापान व देखणा जोगंतावाळू हया साऱ्यांना एक लय, एक ताल, एक ठेका आलेला. रात्रीचं सारं वातावरण हयानं मंत्रभारित आणि सत्यव्वाच्या कमावलेल्या आवाजाचे, गाण्याचे चकाकते मोती ओघळले-

'यल्लुबाई ग माजी आई'
महीमा तुजी थ्वॉर
चहू देशावर कडाका (किर्ती),
परडी (जोगवा मागायची कुरकू. बूट्टी) बरोबर.
सत्ती सौदत्ती गड देवा
अवघड डोंगर
तिथं देवा उमटली,

पाण्याचा झरा हाय समोर.
पाण्यामंदी उंभी रेणुका,
नेसुन पीतांबर
परशराम बाजुला,
मातंगी हाय हो समोर.
पुजाऱ्यानं पुजा बांधली,
पुजा बरोबर
झेंडू फुलांच्या माळा,
गळ्यामंदी फुलांचा गजबार (गर्दी)
माहेरघराला पालखी निघाली,
आनंद अवतार
बहु दुरचे लोक येती,
करती नमस्कार
कोकटनूरामदी देसाई
करतोय् म्हायार
करून चोळीपातळ,
जोगत्याला वाटी पनियार (आयार)
तिथनं पालखी निघाली
हलगीच्या जोडाबरोबर (संगतीनं)
मरीआई म्होरं पालखी निघाली,
दिवस सव्वा पार
अगिनकिचाला (अग्निकुंडाला) चालली रेणुका,
सरती मागंम्होरं
खारीक-खोबरं, केळी-नारळ,
उडतोय भडार (भंडारा)
अगनीमंदी (अग्नीत) पाऊल टाकिता,
आगीन थंडगार
दुनयामंदी तुजं चाललं

येवढं खरोखर
आगीन खाल्ली आईनं
लावलं देवाचं दार
झाली जत्रंची फूट,
फुटे शिवंच्या भाहीर
तंगव्वा-सत्यव्वा भारे
उठविलं तालासुरावर
लिप्पाणी ठिकाणं,
जागा मला दिसती गुलजार . . . '

आणि त्या एका रात्रीत तारीची ललाट-रेषा इकडची तिकडे झाली. एका रात्रीत इकडलं जग तिकडे झालं . . . हया जगाचे छक्के-पंजे माहीत नसलेल्या कोवळचा ताराबाईची पावलं वेश्याव्यवसायाच्या वाटेवरून तिच्याही नकळत अशी पडत गेली . . . मग अनेकांनी तिला वापरली. न् सोडून दिली . . . गेल्या दहा-एक वर्षांतच ती तीन मुलांची आई बनलीय् पार पोतेरं झालंय तिचं . . . माझ्यासमोरच मोकारलेली, फुललेली, वांढलेली न् पार कोळमाटून सुकून गेलेली अशी ताराबाई . . . तर अशा अनेक ताराबाईंचा बळी घेतला जातोय यल्लाम्माच्या नावानं. प्रत्येक वर्षी हजारोंच्या संख्येनं. वेश्याव्यवसायात मुली ढकलण्याचा हा एक राजरोस धार्मिक मार्ग. कुणाची अडवणूक नाही, की आडकाठी नाही अन् ज्याचा बळी जातोय त्या अस्त्राप जीवांना आपण मारले जात आहोत आणि यापुढचं अख्खं आयुष्य मेल्या मनानं काढायचं, पुरुषी वासनांच्या गिधाडी छायेत, हेही ठाऊक नसतं . . . डोंगरावरच्या गर्दीनं काही भांबावलेल्या, जत्रेत यावयास मिळाल्याचा आनंदही काहींच्या कोवळचा मुखावर. हया कळचा थोडयाच काळानं उमलणाऱ्या न् लवकरच आपण खुडले जाणार आहोत, हयाची जाण नसलेल्या. आत्ममग्न !

ज्या यल्लम्माच्या नावावर ज्या रेणुकेच्या नावावर, ज्या आई

यल्लूबाईच्या नावावर प्रत्येक वर्षी इतक्या संख्येनं मुलीना वेश्याव्यवसायात ढकललं जातं, ती रेणुका, ती यल्लम्मा, ती यल्लूबाई आहे तरी कुठे ?

कोल्हापूराहून पुना-बेंगलोररोडनं आपण दक्षिणेस निघालो की, पंचवीस मैलांवर निपाणी लागतं. निपाणीहून थेट सौंदत्तीच्या एस. टी. गाड्या हमेशा मिळतात. निपाणीहून सौंदत्ती नव्वद मैल. निपाणीहून तेरा मैलांवर असलेल्या संकेश्वरला गाडी आली की, आपली पुना-बेंगलोर रोडची सोबत सुटते अन् हुक्केरी-घटप्रभा मार्गाने सौंदत्तीकडे गाडी धावू लागते. तसं बेळगावहूनही सौंदत्तीला जाता येतं; पण ते अंतर बरंच दूरचं. जवळचा मार्ग हुक्केरीवरूनच, कोल्हापूरभागातील लोकांना . . . तर सौंदत्तीला गाडी आली की, समोर पूर्वेस डोंगर दिसतो तोच यल्लम्माचा डोंगर. थेट डोंगरावरही गाड्या जाण्यास डाव्या व उजव्याही हातानं दोन पक्के मार्ग आहेत; पण यात्रेकरू डाव्या मार्गानंच जाण पसंत करतात; नव्हे तसंच जावं लागतं. कारण जुमूलबाई सत्यव्वाच्या कुंडात स्नान करूनच मग वर डोंगरावर जाण्याचा प्रघात आहे. जोगतिणी, तसेच नवस केलेल्या बायका येथे लिंबही नेसतात. मार्गशीर्षी पौर्णिमेपासून माघी पौर्णिमेपर्यंत तुफान यात्रा भरते. त्यावेळी जुगुलबाई सत्यव्वाच्या हव्या कुंडातील (पूर्वाभिमुख देऊळ व त्यापुढील हे कुंड आता मलप्रभा कॅनॉलमध्ये बुडालं आहे.) पाणी इतकं गढूळ न घाणेरडं झालेलं असतं की, तुम्ही सुशिक्षित न् सुजाण असाल तर अशा पाण्यात स्नान करायला मन धजावणार नाही तुमचं. अंगावर शहारे येतील! पण अनेक भाविकांची नुस्ती गर्दी झालेली असते. ह्या कुंडावर अक्षरशः मरत असतात स्नान करायला येथून निघालं की डोंगराची चढण लागते. ती पार केल्यावर नाका लागतो. येथे जकात उकळली जाते. मोटारींची-माणसांची ह्या नुसत्या जकातीचाच आकडा लाखाच्या बाहेर जातो. (वरच्या देवळात जमणारा पैसा निराळाच याचा पण हिशेब असा लाखावरी करावा लागतो.) नाक्यावरची जकात देऊन पुढं गेलं की, डोंगराचं पठार लागतं, जत्रेच्या दिवसांत गाड्यानी

माणसानी हे नुसतं फुललेलं असतं. शे-दीडशे मैलांच्या परिसरातले लोक काही एस. टी. ने आलेले, काही बैलगाडयांनी. यात्रेकरूना रहाण्यासाठी वर काही धर्मशाळाही आहेत. त्यातील एक तर चित्रपटसृष्टीत विख्यात असणाऱ्या व्ही. शांतारामनी बांधली आहे. पठाराच्या पूर्वेकडील उतारावर रेणुकेचं मंदिर. मंदिराजवळ उभं राहून चौफेर पाहिलं तर आपण एका विशाल कढईच्या तळाशी आहोत, असं वाटतं. चौफेर चढत जाणारं पठार व क्षितिजाला टेकलेल्या डोंगरकडा . . . हेच ते रेणुकेचं मंदिर. (यल्लम्मा, यल्लूआई ही देवील ह्याच देवीची नावं) प्रत्येक वर्षी हजारो कोवळ्या मुलीना जोगतीणीची दीक्षा देऊन येथेच त्यांच्या आयुष्याचं वाळवण केलं जातं. वर आभाळ, खाली धरती असते. सोबतीला तितक न् तेवढचं ! बाकी कोणी सोबतीला नसतं, आई यल्लूबाईही ! पायाखालची धरती तापलेली, वरचं आभाळ इंगळ टाकणारा-ह्यात जोगतीण जन्मभर जळत रहाते- जळून जाते !

जत्रा फुटली की परतायच्या वाटेवरील पहिला मुक्काम मनोळीच्या नदीवर पडतो. बैलगाडया-माणसं नदीच्या दोन्ही तिरांवर लगडून गेलेली. नदीवर पूल. पुलाच्या अल्याड बाजूस मेवा-मिठाईची दुकानं. चहाची हॉटेलं. एखाद्या खेडेगावी मोठी जत्रा भरावी, तसं दृश्य इथं दिसून येतं. येथून गाडया हलल्या की पुढचा मुक्काम गोकाक न् त्यानंतर व्हळेवा. हुकेरी ते हत्तरगी हा जो रस्ता गेला आहे, त्या रस्त्याला दुभंगत हिरण्यकेशी नदी पूर्वेकडे वाहात जाते. पूल ओलांडून पलीकडे जाताच उजव्या हाताला नदीतीरावर पूर्वाभिमुख व्हळेव्वाचं दर्शन घेऊनच परतावं लागतं.परतणाऱ्या लोकांची येथेही प्रचंड जत्रा भरलेली असते. देवळाच्या भोवताली, नदीच्या किनाऱ्यावरही. येथून निघालं की ३-४ मैलांवर हत्तरगी. बेळगावहून येणाऱ्या गाडया इथं मिळू शकतात. तेथून निपाणी-कोल्हापूर भागात येता येतं. बैलगाडयांचा ताफा मात्र हत्तरगीहून पुना-बेंगलोर-रोडनं उत्तरेकडील संकेश्वरकडे निघतो . . . संकेश्वर-निपाणी असे करीत आपल्या गावाकडे बैलगाडया परतात. गाव आल्यावर एकदम गाडया गावात कधीही

जात नाहीत; तर वेशीबाहेर थांबतात. तेथे जत्रा भरते. मग ह्या जत्रेला 'बागेतील जत्रा' असे नाव आहे. परिस्थितीमुळे व सवडीअभावीही यल्लाम्माच्या यात्रेला न गेलेले गावातील लोक ह्या बागेतील जत्रेला जातात. ही जत्रा दुपारचे ३-४ पासून रात्रीचे ८-९ पर्यंत चालते. घरोघरच्या बायका आंबीलीचा 'निवद' घेऊन व जेवणे बांधून ह्या बागेतील जत्रेत जातात. ह्या दिवशी अंबिलीचं महत्व. ह्याचाच नैवेद्य यल्लम्माला जाऊन आलेले ताफे जागजागी उतरलेले असतात. त्यांच्या 'जगा' भोवती भाविकांची गर्दी उडते. निवद दाखविला जातो, नारळ फोडले जातात न् भंडाऱ्यानं कपाळ-कपडे माखून जातात . . . मग आजूबाजूच्या शिवारात नेलेली जेवणं सोडली जातात आणि मग त्या मोकळ्या हवेत अंबिलीसह घास गिळण्यात एक और लज्जत येऊन जाते . . . रात्रीचे ८-९ झाले की जत्रा फुटते. मेवा-मिठाईची दुकाने उठतात. बैलांच्या मानेवर जू ठेवून सापत्या बांधल्या जातात, 'जग' डोक्यावर घेतले जातात. आणि 'उदेग आई उदे ऽ उदे ऽ'चा गजर वातावरणात मिसळू लागतो . . . लोक घराकडे परतू लागतात . . . १-२ आठवडे बाहेर, प्रवासात काढावे लागल्याने बैले-माणसे वेगात पावले उचलू लागतात-घरच्या ओढीने . . .

तर अशी ही यल्लम्माची जत्रा. ह्या जत्रेत मुलीला जोगतीण करण्यात येतं जुगुळबाई सत्यव्वाच्या कुडात अंघोळ करायची न् लिंब नेसायचा. (आता कॅनॉलच्या पाण्यात अंघोळ करतात,) म्हणजे काय? तर ओलेत्याने तोंडात लिंबाऱ्याचा एक डहाळा धरायचा, हात जोडायचे. जोडलेल्या हातातही लिंबाऱ्याचा डहाळा. पुजाऱ्याचा ताफा समोर 'तानु तंदानुऽ' करीत गात असतो. चवन्डक,तुणतुण, टाळ ह्यांचा कल्लोळ उसळलेला असतो.. ताफ्याच्या पाठोपाठ 'जगा' भोवती पाच फेऱ्या मारायच्या, मग वर डोंगरावरील देवळात यायचं आणि यल्लम्माच्या पाया पडायचं, मग पुजाजाऱ्याच्याही. पुजारी मग पोरीच्या गळ्यात 'दर्शन' घालतो. हे 'दर्शन' म्हणजे काय ? तर दर्शन म्हणजे लाल-पांढऱ्या मण्याची माळ, लग्न झाल्यावर मुलीच्या गळ्यातील मंगळसूत्राला जे न् जसे महत्व, तसे ह्या 'दर्शना ला.' मुलीच्या गळ्यात 'दर्शन' घातले की मुलगी

जोगतीण झाली. हे 'दर्शन' मग जन्मभर गळ्यात वागवावे लागते. हे दर्शन गळ्यात घातले गेल्यावर पाच परड्या व पाच जोगते पुजायचे. (त्याना कॅनॉलच्या पाण्याखाली हे कुंड व लगतचे देऊळ बुडाले असल्याने भाविक कॅनॉलच्या पाण्यात स्नान करून लिंब नेसतात–) स्नान करून नेसला की, प्रत्येक स्त्री जोगतीण होते, असे नाही; तर नवस फेडणाऱ्या लोकानाही नवस फेडताना लिंब नेसावा लागतो. तेव्हा ' सत्यशोधक ' ह्या मासिकात ' यल्लम्मा 'या लेखात दिलेली माहिती अगदीच अपुरी व गैरसमज पंसरविणारी आहे. तर जोगतीण होण्यासाठी मुलीच्या गळ्यात दर्शन' पडणं महत्वाचं. लिंब नेसनं नव्हे. तसेच 'सत्यशोधक' मधील वरील लेखात एखाद्या अशा पद्धतीनं देवाला वाहिलेल्या मुलीबरोबर मग कोणी लग्नाला तयार होत नाहीत. ही सांगितलेली माहितीही चुकिची आहे. त्या लेखात सांगित–ल्यानुसार सगळ्याच मुली काही वेश्या बनत नाहीत तर अनेक जणींची लग्नही होतात. ह्या लग्नांना झुलवा लावून घेणं म्हणतात. झुलवा लावून घेणं म्हणजे पाट लावून घेणे, जोगते – जोगतीणीच्या पोटी जी संतती निपजते, त्यातील मुलांशी जोगतिणी म्हणून सोडलेल्या उपवर मुली 'झुलवा' लावून घेतात. ह्या समाजाच्या बाहेरील तरूणही जोगतिणीचा स्वीकार करतात. डॉ. बाबा आढावसारखे ह्या प्रश्नावर चळवळ उभी करण्याच्या तयारीत असलेले नेते विचारतात की, 'जोगते म्हणून यल्लम्माला सोडलेले लोक खरोखरच नपुंसक असतात की काही ऑपरेशन वगैरे करवून घेऊन नपूंसक होतात ?' ह्याला उत्तर म्हणून सांगता येईल की, जोगते म्हणून [सोडण्यात आलेल्या मुलांत फारच थोडी मुले नपुंसक असतात. ही मुलं स्त्रियांसारखी चोळी–लुगडे घालून वावरत असतात. ह्यांना 'हिजडे' ही म्हणतात. बाकीचे जोगते मात्र खरोखरीच पुरूष असतात. ते जोगतिणीशी वा अन्य मुलींशीही लग्ने करतात. ; त्यांना मुलंही होतात, झालेलीही आहेत, फक्त मंगळवार–शुक्रवार हातांत परडी वा डोईवर 'जग' घेऊन त्यांनी किमान पाच घरं तरी जोगवा मागायचा आणि पौषी पुनवेला यल्लम्माच्या जत्रेला जाऊन यायचं, इतकेच. केवळ ढोबळ नियम.

ज्या यल्लम्माला पोरं-पोरी अशा प्रकारे सोडून, धार्मिकतेच्या नावाखाली चाकोरी-बाहेरचं जिणं त्यांच्या नशिबी मारण्यात येतं, त्या यल्लम्माला लोककथा अशी-

रेणुका ही पार्वतीचा अवतार व जमदग्नि-मुनी हा शंकराचा अवतार, जमदग्नीची बायको रेणुका. तिला चार पोरं. शेवटचा परशराम. जमदग्नीचा तपसाधना कडक. मुनी लवकर उठायचा, नदीवर जाऊन अंघोळ वगैरे करून झोपडीत यावयाचा. तो परतायच्या आधी त्याच्या पूजेची सर्व काही तयारी करून ठेवायची कामगिरी रेणुकेवर असायची ; त्यामुळं तीही भल्या पहाटे उठून घडा तयार करून त्यांतून पूजेसाठी पाणी आणी. एकदा अंघोळ करून पाण्यातून वर येताना माशाचं एक युगुल रतलेलं, प्रणयक्रीडेत मग्न झालेलं तिला दिसलं आणि तिचं मन चळल्यागत झालं . . . मग तिच तिलाच अपराधी वाटू लागलं ; आपल्या हातून पापच घडलं, अशी तिची भावना झाली. त्यामुळं तिच्या हातून वाळूचा घडा लवकर तयार होईना. तसाच कसाबसा घडा तयार करून त्यातून पाणी घेऊन तशीच निथळत ती झोपडीत परत आली. दारात नवरा रागानं लाल झालेला. त्याचा राग पाहून रेणुकेच्या डोक्यावरचा पाण्याचा घडा खाली कोसळला. ती भ्याली. तिचं मन आज चळलं होतं, हे नवऱ्यानं अंतर्ज्ञानानं ओळखल आणि तो गरजला, 'पापिणी आताच्या आता तुझं मुंडकंच उडवितो ! . . . ' नि मग त्यानं आपल्या चारही मुलांना बोलविलं व आईचं मुंडकं उडवायचा हूकूम केला. पहिल्या तिघांनं,' तो मानला नाही म्हणून शाप देऊन त्यांना भस्म करून टाकलं. चौथा परशराम. तो तयार झाला अन् बापाला म्हणाला, 'बाबा' मी आपली आज्ञा पाळल्यावर मला मागेन ते द्याल ? तसा बाप म्हणाला, 'तू मागशील ते मी देईन, पण अगोदर हिचं मुंडकं उडीव !' आणि त्यानं मुलाच्या हातावर कमंडलूमधील उदक सोडलं ; तसं मग परशरामानं आपल्या हातातील परशूनं आईच मुंडकं उडविलं ; ते मुंडकं आभाळातनं कैलासावर गेलं न् शंकराच्या गळ्यातील माळेत जाऊन बसलं.

तसं मग मुनीनी विचारलं, 'मुला, आता तुला काय पाहिजे ते माग !' त्यावर परशराम म्हणाला, 'बाबा, माझी मेलेली आई मला परत आणून द्या !' हे ऐकून मुनीला आश्चर्य वाटलं ; पण इलाज नव्हता. वचन तर दिलेलं, ते पूर्ण करायलाच हवं. जवळून एक मांगीण नदीकडे जात असलेली दिसली. मुनीनं कमंडलूतलं पाणी तिच्या अंगावर फेकलं, त्याबरोबर तिचं मुंडकं धडावेगळं होऊन रेणुकेच्या धडावर येऊन चिकटलं नि रेणुका जिवंत झाली . . . एवढं होऊनही मुनीचा राग शांत झाला नव्हता, तो म्हणाला, तुला जरी मी जीवदान दिलं असलं तरी ह्यापुढं मी तुझं तोंडही पहाणार नाही ! तुला वाट मिळेल तिकडे तू चालू लाग !' हे ऐकताच रेणुकेनं त्याचे पाय धरून विनविलं, 'महाराज, मला असा शाप देऊ नका, ह्यातून काही तरी मार्ग काढा !' तसा मुनी म्हणाला, 'ठीक आहे जा ! जिथं जाशील तिथं लाखानी भक्त मिळतील !' एवढ्यात ते मांगिणीचं धड बोललं, 'महाराज, आता माझी पुढं वाट काय ? तसा मुनीनं आशीर्वाद दिला, 'हिच्याबरोबर तुझीही लोक भक्तिभावानं पूजा करतील !' आणि तो तपाला निघून गेला. परशरामाला व त्या मांगिणीला (जुगुळबाई सत्यव्वा नाव तिचं . . . जुगुळबाई सत्यव्वाचं देऊळ व कुंड व शेजारून डोंगरावर चढलेला रस्ता. अलीकडेच झालेल्या मलप्रभा कॅनॉलखाली बुजल्यानं जवळचा नवा मार्ग केला आहे. ह्या मार्गावर एक कमान बांधण्याचंही काम सुरू आहे.) घेऊन रेणुका निघाली. सौदत्ती गावाजवळ आली. लोकांनी विचारलं, 'यल्लू अम्मा ? ('आई) कुठं चाललीस ?'- (ह्या 'यल्लू- अम्मा' वरूनही रेणुकेला 'यल्लम्मा' असं संबोधलं जातं. तसंच या शब्दांची फोड यल्लरद अम्मा, सर्वांची माता, असाही केला जातो.) तसं रेणुकेनं उत्तर दिलं, 'कुठं नाही बाळांनो, इथंच की !' आणि तेव्हापासून सौदत्तीजवळ असलेल्या उगरगोळाच्या डोंगरावर रेणुका राहू लागली. रेणुका पतिव्रता असल्यानं तिला पुरूषांचा वारा खपत नाही म्हणून ती जोगते व जोगतीणीकडून आपली सेवा करून घेते.

तर अशी ही लोककथा आहे तीवर आधारलेलं गाणंही आहे, ते असं-

आदिमाया रेणूका माता ।
पारयुगाची सांगतो कथा ।
चित्त देउनि ऐकावं आता।
बोलूंनका म्होरं ।
जमदग्नि हिचा भरतार ।
झाला विस्तार ।। १ ।।
चार पुत्रांची रेणूका हो माता
सर्व बाळावर बघा तिची ममता ।
बोले ती कांता, अहो भरतार।
झाला मायेचा बाजार,
सगळा हाहाकार ।। २ ।।
जमदग्नि बोले आपल्या अस्तुरीला ।
आम्ही बसलो अनुष्ठानाला ।
लौकर पाणी घेउनि यावे पुजेला ऽ
नका करू उशीर यायला
पोटचं बालक मारील तुला ।। ३ ।।
अदिमाया निघुनि गेली पाण्याला
वाळूचा घडा बुडता राहिना ।
झाला गेला भंगला ।
कसं नेऊ पाणी पूजेला ।
झाला उशीर ।। ४ ।।
जमदग्नि तापला हो फार।
कुठे हाय पाणी सांग लवकर ।
देवपूजेला झाला उशीर ।
उडवितो शीर ।
चौंघा पुत्राना आज्ञा केली ।
मारा लौकर ।। ५ ।।
पदरामंदी पाणी घेता

राहिना हो झालं ।
झालि बेजार ।
कसं केलं देवा कवतुक ,
बडविती ऊर ।। ६ ।।
जमदग्नि तापला हो फार ।
चौघा पुत्रांना घेतलं बोलावुन ।
तिघांनी हो बापाचा शब्द
नाही मानला ।
चौथा मग आला परशराम ।
राग क्रोधात घेउन हत्यार,
मातेचं उडविलं शीर–
वरच्यावर ।। ७ ।।
परशराम लागे बापाच्या चरणाला ।
जिवंत करूनी द्यावी
माता माझी मला ।
हचोच माझा वर ।
हचाशिवाय न्हाइ मागणं
जोडतो कर ।। ८ ।।
जिवंत करूनी दिली माता,
त्येची त्येला ।
रेणुकेचं धड लाविलं कबीच्या सुता :
ग्रंथ वाचुनी पहावा, जावे आता ।
खोट्या-पाखंडचा न्हवं हचा कथा ।
बोलू नका म्होरं ।। ९ ।।

तर अशा हचा यल्लम्माला जोगतीण व जोगते म्हणून मुली-मुलं सोडण्याची प्रथा विशेषत: दलितसमाजात फार आढळते. मांग, बेरड, ढोर, चांभार, महार, डोंबारी, गारुडी आदि जातींतील अज्ञान व पूर्वापार

चालत आलेली रूढी ह्यामुळं पोरा-पोरींची आयुष्यं अल्पवयातच यल्लम्माला वाहून सुकविली जातात. आर्थिकदृष्ट्या मागासलेली मराठा व लिंगायत कुटुंबातील मुले-मुलीही वरील दुष्ट रूढीची बळी ठरतात. ह्या जातीतील संख्याही नजरेआड करण्याइतकी नाही.

गरीब मुस्लीम कुटुंबातीलही काही मुलानाही जोगतीणी करून वेश्याव्यवसायात ढकललेलं आढळून येतं. बेळगाव, धारवाड, सोलापूर जिल्ह्यातून व कोल्हापूर-सांगली जिल्ह्याच्या दक्षिण भागातून यल्लम्माचे भक्त पसरलेले असल्याने वरील भागातच ही अमानूष प्रथा रूढ झालेली आहे. वरील जिल्ह्यातील काही भाग तर इतका मागासलेला आहे की, तेथे शिक्षणाचा प्रसार अजूनही झालेला नाही, मग नव्या विचारांचा वारा वाहणे तर दूरच. त्यामुळे येथील लाखो लोकांना महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, दलित चळवळ आदि माहीतही नाही. संकेश्वरपासून पुढे सौदत्तीपर्यंत असलेला सारा भाग तर कानडी भाषिकांचा. मराठी बोलणारे लिहिणारे तर अभावानेच आणि कन्नड विचारवंताचे तर ह्या गंभीर प्रश्नाकडे अजूनही पुरेसे लक्ष गेलेले नही ! प्रतिवर्षी रांडपुनवेपासून (मार्गशीर्ष पुनव) माघ पुनवेपर्यंत यात्रा भरते. चार-पाच लाख लोक येतात-जातात, सात-आठ हजार पोरी व दोन-तीन हजार पोरांना जोगतिणी व जोगते म्हणून सोडण्यात येतं. देवळाच्या विश्वस्थनिधीला व पठारावरील सरकारी जकातनाक्याला वर्षाला लाखो रुपयांचं उत्पन्न मिळतं. हे सारं चाललेलंच आहे. कोण लक्ष देणार?

जोगतिणी व जोगते इतक्या मोठ्या संख्येने का सोडले जातात ? ह्याचीही बरीच कारणे असतात. काही वेळा पोटीं संतान नसतं. यल्ल - म्माला नवस बोलला जातो, 'पोरं होऊ देत, तुझ्या दरबारातही एक सोडतो,' अशी लालूचही दाखविली जाते. मग यथा काळ नवसाप्रमाणे घडलं तर पोरगी (जोगतीण म्हणून) व' पोरगा (जोगता म्हणून) देवाला सोडलं जातं. एकमेकांच्या घराण्यात पूर्वापार चालत आलेली रूढी. चाल

असते की, घरातील एक तरी माणूस यल्लम्माला सोडायला हवं. काही वेळा मुला-मुलींची जट वाढते, डोईवरचे केस एकमेकाला चिकटतात न् मग देवीचं आवतणं आलं, बोलावणं आलं असं समजून गळ्यात विधी-पूर्वक 'दर्शन' घातलं जातं. 'जोगतिणीं' ना 'देवदासी' म्हणणे सर्वस्वी बरोबर नाही. देवदासींची लग्नं होत नाहीत, पण जोगतिणींची होतात. चार-चौघी बायकांप्रमाणे त्या प्रपंच करू शकतात. त्यांच्या मुला-मुलींची लग्ने त्यांच्यासारख्याच जोगतिणींच्या मुला-मुलींशी विनासायास जमू शकतात. अशा जोगतिणींनी व जोगत्यांनी दर मंगळवार व शुक्रवार रोजी पाच घरं फिरून जोगवा मागायचा आणि चुडच्याच्या पुनवेला (हिलाच 'रांड पुनव'ही म्हणतात.) यल्लूआईच्या दर्शनासाठी डोंगरावर जायचं, जोगतिणींनी जुना चुडा फोडून नवा ल्यायचा, घालायचा, लिंब नेसायचा, एवढाच नियम. जोगतीण म्हणून सोडलेल्या सर्वच मुली वेश्याव्यवसायात ढकलल्या जातात, ही काही पांढरपेशा विचारवंतात पसरलेली समजूत सर्वस्वी चुकीची आहे. घरातील पूर्वापार गरिबीमुळे बऱ्याच मुली वेश्या-व्यवसायात लोटल्या जातात, ही वस्तुस्थिती. देवाला मुलं वहाण, हा कायद्याने गुन्हा असला तरी त्या संबंधाने पुरेसे ज्ञान / माहिती अजूनीही तळागाळ तल्या लोकांत नाही ! कारण तळागाळातल्या लोकांतच ही प्रथा रूढ आहे. जोगतीण होऊन आपल्या वागण्याला धार्मिकतेचं पवित्र अस्तर लावून वेश्याव्यवसायात शिरलेल्या मुली दावणगिरी ते मुंबईपर्यंतच्या दक्षिणोत्तर टापूतील अनेक लहान-मोठ्या शहरांत पसरल्या आहेत. ह्यात बेरड, महार, चांभार, ढोर आदी दलित समाजातील घटकांमधील मुलींचा भरणा अधिक असतो, हीही चिंतनीय बाब आहे. एखादी मोठी चळवळ उभी करून ही प्रथा बंद पाडली तर दलित, पददलित समाजातून वेश्या-व्यवसायाला होणारा हा पुरवठा बंद पडून ह्या हजारों मुलीची मुक्तता होईल का ? – कठीण आहे ! चळवळ यशस्वी झाली तर केवळ प्रथा बंद पडेल, फार तर ! आता जोगतीण करून, धार्मिक प्रतिष्ठा देऊन, मुलींना ह्या व्यवसायात ढकलले जाते, असे मानले तरी ही प्रथा बद पाडल्यावर पुढे तसेच (म्हणजे, जोगतीण न करता) ह्या व्यवसायात ढकलले जाईल!

म्हणजे, केवळ प्रथा बंद पाडून आपण तळागाळातल्या समाजातील हजारो दुर्दैवी मुलींना वेश्याव्यवसायापासून परावृत्त करू शकत नाही ! प्रथा बंद पाडायचीय का हा लोंढा थोपवायचाय, हे आधी निश्चित झाले तर सामाजिक कार्य करणाऱ्यांना चकवा बसणार नाही !

गावोगावी जोगतिणींचे ताफे विखुरलेले असतात. ह्यात चार-सहा जोगतिणी व एक-दोन जोगतेही असतात. ताफ्याची मुख्य म्हणून एखादी वयोवृद्ध जोगतीण वा क्वचित जोगताही असतो. कोण चवंडक वाजवितं, कोण तुणतुणं, कोण टाळ, तर कुणी भंडाऱ्याची पिशवी गळ्यात अडकून तो लावण्याचं काम करतं. ताफ्याचा 'जग' असेल तर कुणी त्या 'जगा'चं ओझं वहाण्याचं काम करतं. 'जग' म्हणजे एक पसरट व बराच रुंद असा हारा – त्याच्या भोवती ओळीनं देवादिकांचे छोटे-छोटे फोटो, पितळी मुखवटे लावलेले अन् मोरपिसे खोवलेले नि रंगीत रिबीनी लावून सजविलेला हा हारा असतो आणि ह्याच्या आत यल्लाम्माचा मुखवटा असतो. ह्यालाच 'जग' म्हणतात. ताफ्यातल्या दोन-तीन जोगतिणी गाणे म्हणणाऱ्या असतात. यल्लाम्मावरील कानडी-मराठी गाणी तर त्या म्हणतातच, शिवाय गेल्या दीडेक तपापासून समाजातील सर्व थरांत सिनेमाचा प्रसार झाल्याने हिंदी-मराठी सिनेगाण्यांचीही त्यांना 'फर्माईश' होत असल्याने ती गाणीही पाठ करावी लागतात ! कोल्हापूर-बेळगाव, गारगोटी-आजरा वा निपाणी-गडहिंग्लज ह्या भागात ही गाणी बसूनच म्हटली जातात पण सांगली भागात अशी गाणी म्हणताना जोगतिणी नाचतातही असे त्या भागातले लेखक मित्र श्री. चारुता सागरांनी सांगितले. दर मंगळवार-शुक्रवारी ताफ्याची गावात फेरी असते. भक्तांची ठराविक घरं, दुकानं, हॉटेलं आदी जागी हा ताफा फिरतो. भक्तांच्या आर्थिक स्थितीवर गाण्यांची संख्या अवलंबून असते. पाच-दहाची पत्ती काढणारा व चार-आठ आणे देणारा ही हाय व लोअर भक्त श्रेणी! श्रावण महिन्यात तर रोज गावात फेरी. वाटेत भेटणारा ओळखीचा कुणीही चलाख नजरेतून सुटत नाही ! भंडारा लावून त्याचा खिसा हलका केला जातोच ! शिवाय श्रावण चालू झाला की 'यल्लम्माला त्याल घाला' म्हणत येशेल तेलाचा डबा घरोघर

फिरविला जातोच ! कुणाला लिंब नेसायचा असेल तर तिथंही ताफ्याला आमंत्रित केलं जातं ! नि अशा वेळी शंभर रुपयांपर्यंत बिदागीही मिळू शकते ! लग्नाच्या वेळी तर पहिला मान जोगतिणीचा ! लग्न ज्या घरी असतं त्या घराच्या दाराला जोगतिणीच्या हस्तेच तोरण बांधण्यात येतं ! जोगतीण स्वखर्चाने तोरण घेते व ते वाजत-गाजत आणून दाराच्या चौकटीला बांधते. ह्याबद्दल मग लग्नात चोळी-काकणं-लुगडं असा 'आयार' (आहेर) जोगतिणीला द्यावा लागतो. ताफ्यातील जोगतिणींचे खासगी आयुष्य वेश्या वा रखेलीगत असते. ताफ्यात दोन-तीन तरी अत्यंत देखण्या पोरी असतातच. तर ह्या पोरींवर लोभावलेल्या पुरुषांना कसं खेळविलं जाऊन पैसे उकळले जातात, हा एक स्वतंत्र लेखाचा विषय ! ताफ्यातील दोनेक जणींच्या अंगातही येत असतं. चवंडकाच्या ठेक्यावर ह्या बायका घुमू लागतात न् नाचूही लागतात ! अशा वेळी किमान वैचारिक पातळी असलेला सुशिक्षितही भांबावून गेल्याशिवाय राहात नाही, मग अशिक्षितांची तर काय कथा ? अशा घुमणाऱ्यांच्या तोंडून भविष्यवाणी बाहेर पडत असल्याने आकाशवाणीपेक्षा ह्याचं जास्त अप्रूप ! ह्यावेळी नवे नवे भक्त नादी लावून त्यांना पिळण्याचे काम सुरू होतं. कुणाला काही व्याधी वा रोग जडलेला असला की त्याच्यावरचा एकमेव रामबाण उपाय सांगायचा, 'पाच मंगळवार-शुक्रवार कर नि डोंगरावर (म्हणजे यल्लाम्मा देव-स्थानात) जाऊन लिंब नेसून दंडवत घाल ! ' अन् हे सारं श्रद्धापूर्वक करण्यामध्ये समाजाच्या तळच्या थरातील लोक आणखीन कर्जबाजारी होत असतात ! यल्लाम्मा हे कडक दैवत आहे व त्याविरुद्ध काहीही ऐकून घेण्यास णी तयार नसतं !

जोगतिणी होऊन वेश्याव्यवसाय करण्यासाठी मोठमोठ्या शहरी दलित समाजातील ज्या मुली जातात त्यांच्या घरच्या माणसांना त्यात काही अनैतिक, वाईट असं वाटतच नाही ! जोगतिणीनं अनेकांशी संबंध ठेवणे ही यल्लूआईची आज्ञाच, अशी उलट श्रद्धा असते, त्यामुळे सासरी नांदावयास गेलेल्या मुलीला सणासुदीचं बोलावून आणायला ज्या असीम आपुलकीनं मुराळी जातो, तशी ; ो माणसं त्या मुलीला बोलावून आणा-

वयास शहरी जातात. माहेरच्या ओढीनं एखादी सासुरवशी जावी, तशा हच्या मुली बोलावयास आलेल्या भाऊ, बाप वा अन्य नातेवाईकांबरोबर आपल्या गावी जाऊन सणासुदीचं गोडधोड खाऊन, सर्वांना भेटून चार-आठ दिवसांनी नांदाय परतावे, तशा शहरी येऊन वेश्याव्यवसाय करू लागतात! समाजाच्या खालच्या थरात श्रद्धेपोटी हे जे घडतेय वा या साऱ्या मागे जी एक वृत्ती आहे, ती भयंकर आहे–चिंतनीयही !

आणि म्हणून ही प्रथा बंद होण्यासाठी ज्या व्यक्ती, संस्था कार्यरत आहेत, त्यांच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी ही दुष्ट प्रथा ज्या परिसरात चालू आहे त्या भागातील स्त्री-पुरुषांनीही स्वतःच्या कुवतीनुसार मदत केली पाहिजे. एकदा ही दुष्ट रुढी बंद तरी पडू दे, मग पुढे हयातूनही आणखी एखादा प्रकाश किरण दिसेल ! जटा-निर्मूलन कार्याला सर्वत्र जो उत्साही प्रतिसाद मिळत आहे, ते प्रसादचिन्हच नव्हे काय ?

गोतावळा : साहित्यप्रेमाने जोडलेला

साठ सालाच्या आगे-मागे कोल्हापुरातील 'चंद्रकांत शेटचे प्रकाशन मंदिर' हा साहित्यिकांचा अड्डा असे आणि नवोदित लेखकांचे ते आशा-स्थानही असे. पूर्वी 'पद्मा टॉकीज' पुढे राजाराम) सायन्स कॉलेज होते. त्याच्या डाव्या बाजूला काही दुकाने सोडून गेले म्हणजे एका स्टोअरच्या माडीवर शेटचेंच्या संस्थेचा बोर्ड दिसे. (आज त्यांचे 'प्रकाशन मंदिर' त्याच ठिकाणी सातशेहून अधिक प्रकाशने सादर करून रौप्यमहोत्सवी वर्षात

पदार्पण करीत आहे.) उजव्या हाताचा जिना चढून वर गेले की लगतच 'सॅम' आर्टिस्ट बसलेले असत. अन् पुढील लांब-रुंद सोप्यात चष्मा घातलेले शेटचे. नवोदित लेखक आपला कथा-काव्यसंग्रह, कादंबरी, नाटक वा असेच काही ना काही शेटचे प्रकाशित करतील, या आशेने या माडीचा जिना अनेकदा चढत-उतरत. एकदा शेटचेंनी तेथे असलेल्या व्यक्तीची ओळख करून दिली– 'हे चंद्रकुमार नलगे !' नलगे तेव्हा किरकोळ शरीरयष्टीचे व हलाखीच्या जीवनाने खूप रापलेले-रोडावलेले होते. ते व्हा ते चिखली आंबेवाडीत प्राथमिक शिक्षक होते व कोल्हापूर ते चिखली, आंबेवाडीच्या त्यांना इतक्या फेऱ्या माराव्या लागत की, त्याकाळी अशा फेऱ्यांचा लाखांचा विक्रम त्यांनी मोडला असावा !

शेटचेंच्या माडीवर तेव्हा अनेक वाङ्मयीन योजना शिजत. अशातूनच 'वैजयंती' मासिकाचा जन्म झाला. तेव्हा शरद वराडकरांची ओळख झाली. गिड्डे, काळेसावळे वराडकर तेव्हा नुकतेच लिहूही लागले होते. त्यांच्या भागीदारीत शेटचेंनी 'वैजयंती' मासिक काढले होते व काही महिन्यांतच हजारोंचा फटका बसून त्याचे प्रकाशन स्थगित करावे लागले होते. मासिक कार्यालयात नाशिककडील विजयकुमार कंगले नावाचे तरुण होते. त्यांनी 'वैजयंती' चालविण्यास विकत घेतले व त्याला अश्लील स्वरूप देऊन कुप्रसिद्ध करून टाकले !

काही कामानिमित्त कोल्हापूरला गेलो की, शेटचेंना भेटून येण, हेही एक काम त्यात समाविष्ट झालेले असेच ! आम्हासारख्यांचा भेटावयास येणाऱ्यांचा (प्रेमळ ?) ताप शेटचेंना नेहमीचाच असे. अशांचे आगत-स्वागत, चहापाणी वगैरे ते करीतच आणि मी त्यांच्या घरचाच, असे समजून सांगत, 'मोरेसाहेब, वर्षाला चहापाण्यावरच तीन हजारांहून अधिक खर्च होतात !' भेटावयास येणाऱ्या माझ्यासारख्या नवोदितांना शेटचे आपली नवीन प्रकाशित पुस्तकं भेटीदाखल देत. त्यांच्या किमती या खर्चात मिळविल्या तर शेटचेंना नवोदितांचे काम किती तापदायक होत असेल, याची कल्पना केलेली बरी ! प्रकाशक असूनही शेटचे एक चांगल्या-पैकी लेखकही होते. (अलीकडे ते काही लिहीत नाहीत, त्यामुळे 'होते' च

म्हणायला हवे.) ते तेव्हा कथा-कादंबरी-नाटके व लेख असे चौफेर लिखाण करीत. त्याकाळी 'ललित' मासिकात 'कोल्हापूरचे साहित्यिक' नावाचा एक लेख डॉ. सुमती क्षेत्रमाडेंनी लिहिला होता. अपुऱ्या माहितीच्या त्या लेखात अनेक लेखकांची नावंही धड नव्हती. त्यावर शेटचेंनी तावातावाने माहितीपूर्ण असा लेख लिहून प्रसिद्ध केला होता. त्यात त्यांनी माझ्या-सारख्यांचीही वर्णी लावली होती ! बहुतेक प्रकाशकांचे चेहरे नुकतेच कुणाच्या तरी मयताहून आल्यागत सदाचेच असतात, पण खळखळून हसणारे, कपाळावर आठी न घालता सुहास्य मुद्रेने तुमचे स्वागत करणारे जे काही थोडे प्रकाशक (व लेखकही) मराठीत आहेत, त्यांत शेटचेंचे नाव अग्रक्रमाने घ्यावे !

शेटचेंच्याच माडीवर शकर खंडू पाटलांची अशीच ओळख झालेली. तेव्हा पाटील पेठ नाक्याच्या शाळेत शिक्षक होते. ढगळ विजार, तसाच नेहरू शर्ट, डोकीला पांढरी टोपी, हातात पिशवी अशा एबावातील पैलवानी बांध्याचे पाटील तेव्हा शिक्षकापेक्षा तलाठी वा गावपुढारीच जास्त वाटत ! शेटचेंच्या माडीवर तेव्हा ते एक कथाकल्पना सांगत एखाद्या मंत्र्यांची जीप सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत कुठे-कुठे फिरतेय (व थांबतेय) यावर ती जीप स्वतःच सांगतेय् अशी कल्पना करून एक कथा लिहावयाची... पुढे पाटलांनाच एका मंत्र्यासमवेत मराठवाड्याचा दौरा करण्याची संधी मिळाली. मनात आणतील तर ते अशा अनुभवसिद्ध खळबळनजक कथा लिहू शकतीलही, पण सर्वांशी सांभाळून राहण्याच्या शांतवृत्तीमुळे त्यांच्या लेखणीला लगाम (पक्षी / बंधन) पडत असावे ! पाटील 'पुढारी' व 'नवसंदेश' मध्ये होते. त्याकाळात खासबाग मैदानाजवळील त्यांच्या निवासस्थानी एकदा जाण्याचा योग आला होता, तेव्हा त्यांनी आपल्या सौभाग्यवतींशी माझा परिचय करून दिला– 'हे महादेव मोरे, मराठी-तील एक मोठे लेखक !' तेव्हा संकोचून मी एवढा–एवढासा झालो होतो !

माझ्या उमेदवारीच्या काळात माझ्या कथालेखनाबद्दल पहिलेवहिले खुशीपत्र कामेरीहून रंगराव बापू पाटलांचे आले ... कोल्हापूरला कॉलेज शिक्षणाला, नंतर ते आल्यावर एकदा प्रत्यक्ष भेटही झाली. तेव्हा मी

विद्यार्थी असताना शाहू बोर्डिंगमध्ये माझे साईड पार्टनर मोहिते बंधूंकडे त्यांच्या आप्तांपैकी म्हणून पंधरा-सोळा वर्षांचा हाफ पँटीतला जो मुलगा येत होता, तोच रंगराव पाटील, ही ओळख पटली. कॉलेजमध्ये आल्यापासून रंगराव कथा लिहू लागले होते. गोरटेले, कुरळचा केसाचे व लाजाळू स्वभावाचे रंगराव तेव्हा एका मुलीच्या (ही बहुधा त्यांच्या वर्गातलीच असावी.) प्रेमातही पडले होते व 'निळी बंगली पिवळे फूल' नावाची कथाही त्यांनी तिच्यावर लिहिली होती. एकदा एका घरमुती खानावळीत त्यांनी मला ओढून जेवायला नेले होते. तेथे डाळीची आमटी म्हणून जे काही आम्हाला वाढले होते, त्यात शोधूनच डाळ सापडत होती ! माझ्या गोतावळ्यातील या मित्राला कसले कदन्न भक्षण करून कॉलेज शिक्षण घ्यावे लागते आहे हे ! तेव्हा मला खूप वाईट वाटले होते ! पुढे दोन तपाहून अधिक काळाने त्यांची भेट झाल्यावर ते नोकरी करीत असलेले हायस्कूल पाहण्याचा योग आला. जिल्हचाच्या गावातील एखाद्या किराणा दुकानासारखे ते छोटेसे हायस्कूल वाटत होते. मी अनेक कॉलेजांतील मराठीचे रेमेडोके प्रोफेसर पाहिले होते. त्यांनाही चार गोष्टी सुनावू शकेल अशा योग्यतेचा एम. ए. झालेला माझा मित्र त्या साध्याभाध्या हायस्कूलातील मुलांना निष्ठेने शिकवीत काळ काढीत होता ... 'सत्यकथे'त कथा प्रसिद्ध होणे, हा सर्वोच्च बहुमान व लेखनगुणाची कसोटीही. तेथे रंगरावचे नाव झळकल्यावर मला कोण आनंद झाला होता ! कुणाला आपल्या लेखणीचा विश्वास असेल त्याने 'सत्यकथे'ची परीक्षा द्यावीच. पण आता 'सत्यकथा' ही अस्तंगत झाली.

१९७५–७६ सालचा राज्य पुरस्कार मिळालेल्या कवी निकुंब, गो. म. कुलकर्णी, सखा कलाल व मी अशा चौघांचा सत्कार करवीर नगर वाचन मंदिरात होता. तेथे लोकप्रिय कादंबरीकार बाबा कदम यांची ओळख झाली तसे शेटयेंच्या माडीवर मी बाबा कदमांचे नाव ऐकले होते. 'प्रलय' ही त्यांची पहिलीच कादंबरी शेटयेंनी तेव्हा प्रकाशित करून आपल्या स्वभावानुसार तिची एक प्रत मला भेटीदाखल दिली होती. त्या कादंबरीत डझनभर कादंबऱ्यांचे कथा-बीज बाबा कदमांनी ठासून भरले

होते. त्यावरून त्यांचे अनुभवविश्व स्तिमित करणारे होते. तेव्हा ते गडहिंग्लजला होते. पण प्रत्यक्ष परिचय व्हायला ७७ साल उजाडले होते ! अशा ओळख झालेल्या लेखकांना बाबा आपल्या 'आनंद' बंगल्यावर ओढून नेतील, त्यांना खाऊपिऊ घालतील व आपण तृप्त होतील ! बाबांचा पाहुणचार झोडून गेलेले अक्षरशः डझनावारी लेखक (व समीक्षकही) आहेत. त्यांत कै. पु. भा. भावे, कै. ग. दि. माडगूळकर, माधव मनोहर यांच्याप्रमाणे आनंद यादव, शिवाजी सावंत, मी अशा अलीकडील पिढीतील लेखक तर आहेतच शिवाय देवदत्त पाटलांसारखे नव्या पिढीतील लेखकही आहेत. मी ड्रायव्हरकी करण्यात काही दिवस घालविले होते. पण माझ्या या निर्णयाचा सुगावा लागताच बाबा म्हणाले होते, 'मोटार धंद्यात ॲक्सिडेंटस् किती ! माधवराव, तुमचा जीव अमूल्य आहे. जपून ! ' माझ्या प्राणाचे मोल जाणणारी एक तरी व्यक्ती जगात होती, हे त्या विपरित दिवसांत किती दिलासा देणारे होते ! 'आनंद' बंगल्याबाहेर आल्यावर ढसढसा रडून माझा गर्हिवर हलका करावासे मला वाटले. अशा व्यक्ती केवळ सुहृद राहात नाहीत, तर त्याहूनही जास्त आपल्या अंतर्विश्वात प्रवेश करतात. मला थोरले बंधू नाहीत, पण ते मिळाल्याचे विलक्षण समाधान अशा वेळी वाटत राहतं !

साप्ताहिक मनोहर मासिक स्वरुपात होते, तेव्हा दुष्काळात सापडून देशोधडीला लागलेल्या एका खेड्यातील माणसांच्यावर समूहचित्रणात्मक अशी ग्रामीण शैलीतील 'गायगुली' ही कथा मी त्यात लिहिली होती. ती वाचून पाठ थोपटणारे डॉ. आनंद यादवांचे एक पत्र आले. यादव कागलचे. सुट्टीत हमेशा कागलला येत. आपल्या मित्रासह त्यांच्या पाहुण्यांच्या घरीही एकदा आले होते, तेव्हा पहिली भेट झाली. मी तेव्हा मोटारमेकॅनिकचं काम करीत होतो व अंगावरच्या मेस्त्री कामाच्या काळ्याकुट्ट मेणचट कपड्यांत त्यांच्याशी साहित्यिक चर्चा करीत बसलो होतो ! प्रकाशक मित्र श्री. अनिल मेहतांचे वडील दिवंगत झाले, तेव्हा सांत्वनासाठी यादव निपाणीला आले होते. त्यावेळी दुसऱ्यांदा भेट झाली आणि ग्रामीण साहित्यावरील परिसंवादात भाग घेण्यासाठी बार्शी संमेलनाला गेलो होतो

तेव्हा तिसऱ्यांदा. तेथे एकदा माझ्या राज्य पुरस्कार मिळालेल्या 'चिताक' संग्रहाचा संदर्भ घेत कथा कशा लिहाव्यात-लिहू नयेत याचे तंत्रमंत्र सांगत ते रात्र जागवीत राहिले.

बार्शी संमेलनाच्या मंडपानजीक असलेल्या सुलाखे हायस्कूलमधील एकाच खोलीत यादव, प्राचार्य रा. रं. बोराडे, मी असे होतो. एका सकाळी असेच आम्ही बोलत बसलो असताना कमरेला नुसता टॉवेल गुंडाळलेली एक गिडडी चष्मीस व्यक्ती बाहेरून आंघोळ करून ओलेत्याने आत आली. 'हे सावंतवाडीचे डॉ. वसंत सावंत.' यादवांनी ओळख करून दिली. यादवांचे डोईवरील टप्पार आता छान पिकले होते व गोऱ्या रंगामुळे नि देखणेपणाने ते नुकतेच अमेरिकेहून आले असावेत, असे वाटत होते. डॉ. सावंतांचे ते क्लासमेट असल्याने दोघे एकमेकाला 'अरे-तुरे' म्हणून बोलवत होते. बार्शीचे गाजलेले कविसंमेलन (दहा हजारांहून अधिक उपस्थितीतील कविसंमेलनासाठी श्रोत्यांची ही सर्वाधिक उपस्थिती ठरावी !) पहाटेपर्यंत चालले होते. त्यात डॉ. सावंत, नारायण सुर्वे, निकुंब, मधुकर केचे हे मोहरे शेवटी शेवटी खास राखीव ठेवलेले, आणि मी तर एकच्या सुमारास परत आलेलो. आणि पहाटे दमूनभागून आलेल्या डॉ. सावंतांना यादवांनी म्हटले, 'तुझा नंबर शेवटी लागला, त्यामुळे मोरेंना तुझ्या कविता ऐकायला मिळाल्या नाहीत, आता म्हणून दाखव काही कविता ! ' २६ जानेवारीला झालेल्या दिल्लीतील अखिल भारतीय कविसंमेलनात सन्मानाने आमंत्रित केलेले व हजेरी लावून तसेच बार्शीला आलेले कवी सावंत माझ्यासारख्या छोट्या माणसासाठी त्या श्रमलेल्या, शिणलेल्या अवस्थेतही काव्यगायन करीत राहिले... त्या मोठ्या माणसापुढे मी संकोचून तिळाएवढा होत राहिलो.

बेळगावला गेल्यावर प्रकाशक मित्र जवळकर बंधूंना भेटल्याशिवाय बेळगाव-भेटीची सांगता होत नाही. एका भेटीत एकनाथराव जवळकर म्हणाले, 'निकुंब सर आठवण काढत होते तुमची.' मोरे आल्यावर त्यांना घेऊन या,' म्हणालेत. तुमची 'प्रवाह' कादंबरी वाचलीय त्यांनी. त्यावर तुमच्याशी चर्चा करायचीय त्यांना ! ' आणि आम्ही उजव्या बाजूच्या

(मराठीतील सर्वश्रेष्ठ लेखक प्रा. जो. ए. कुलकर्णींच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या) गोंधळी गल्लीतून 'रेक्स टॉकीज' कडे निघालो. रेक्सच्या उजव्या बाजूने एक रस्ता समोरील झाडीत अदृश्य होत गेलाय. त्यावरून दोन-तीन मिनिटं चालल्यावर उजव्या बाजूची टुमदार बंगली 'गीतांजली.' अर्थात या नावावरूनच येथे कविवर्य राहात असणार, हे कुणी न सांगताही ओळखता येण्याजोगे. एकनाथरावांनी माझी ओळख करून दिली, अन् मग दिलखुलास स्वागत करीत निकुंब सर आम्हाला बागेत नवीनच घेतलेल्या पाण्याच्या कनेक्शनची – मीटरची माहिती बाळबोधपणे पुरवू लागले.. बागेतून घरी आल्यावर त्यांनी आम्हाला चहाबरोबर घरीच तयार केलेली शंकरपाळी खाऊ घातली व मग चर्चा सुरू झाली.

माझ्या कथा आवडत असल्याचे एक खुशीपत्र खरसिंगहून आले नि त्याखाली 'चारुता सागर' ही सही. एखाद्या मुलीचे पत्र म्हणून मी मोहरून गेलो ! मग काही महिन्यांनी वरील नावाने 'स्वराज्य' मधून विनोदी चुटकेही प्रसिद्ध होऊ लागले आणि मग एकाहून एक सरस कथा त्या नावाने 'सत्यकथे' त येऊ लागल्या. ग्रामीण कथेच्या प्रांतात नवे चैतन्य ओतू लागल्या. एका भर दुपारी चाळिशी उलटलेली, डोक्यावर टक्कल पडू लागलेली, तोंडावर देवीचे व्रण असलेली व नेहरू शर्ट-पायजमा घातल्याने आणखीनच उंच वाटणारी व्यक्ती माझ्यासमोर उभी ठाकली व म्हणाली, 'मी चारुता सागर ! ' अर्थात मला बसलेल्या शॉकची आपण कल्पना करू शकाल !

कवठेपिरानच्या हायस्कूलला व्याख्यानासाठी गेलो होतो. तेथून जवळच असलेल्या कामेरीची ओढ लागली. रंगराव पाटलांच्या कथांतील प्रदेश पाहण्याची ओढ तपाहून अधिक कालापासून लागलेली. वाटेत इस्लामपूर लागले आणि 'बानू' कार देवदत्त पाटलांचा शोध घेत मी निघालो. रविवार असूनही सकाळी आठपूर्वीच कॉलेजमध्ये त्यांचा जादा पीरियड चालू होता. काळेसावळे देवदत्त कादंबरीवरील मलपृष्ठावरच्या फोटोपेक्षाही तरुण वाटत होते. अनपेक्षित असा मी आलेला पाहून त्यांनी 'मॅजेस्टिक गप्पा' टाईपची एक मुलाखतच आपल्या एम. ए. च्या

विद्यार्थ्यांपुढे घेऊन मला बोलके केले. व्याख्यान म्हटल्यावर लटपटणारा मी, तेथे धडाधड बोलत होतो !

'चिताक' संग्रहाचा राज्य पुरस्कार स्वीकारण्यास मुंबईला गेलो होतो. तेव्हा बांद्रयाच्या कलामंदिर सिनेमाशेजारील 'आराम हॉटेला त आम्हा साहित्यिकांची राहण्याची सोय केली होती. शेजारच्या खोलीत 'ढग' संग्रहाचा पुरस्कार स्वीकारण्यास आलेले सखा कलाल होते. आल्या आल्या ते आपणहून खोलीत आले व माझा परिचय करून घेतला. मध्यम उंचीचे मितभाषी कलाल बोलक्या डोळ्यांचे होते. बेळगावच्या स्कूल ऑफ कल्चर नाट्यगृहात नाथ पै व्याख्यानमालेत आमचा (तिकीट लावून केलेला, तरीही खूप गर्दी असलेला बहुधा हा पहिलाच सत्कार असावा !) सत्कार करण्यात आला तेव्हा कित्तूर चन्नम्माच्या पुतळ्याजवळील एका आलिशान हॉटेलातील भव्य खोलीत आम्हा दोघांची राहण्याची व्यवस्था केली होती. तेव्हा नेहमी मौनाची बाधा झाल्यागत वाटणारे कलाल खुलले होते व आपल्या पूर्वायुष्याबद्दल खूप वेळ बरेच काही सांगत राहिले होते. आपल्या गरिबीच्या काळात कलालांनी हॉटेलांमधून वेटरचीही कामे केली होती. दिवसाही कामे व रात्रीच्या वेळी हॉटेलातील गच्चीवर जाऊन 'सत्यकथे' साठी कथालेखन. हे चित्र अजूनही डोळ्यांसमोरून जात नाही. दिवसभर राबलेले थकलेले कलाल रात्रीच्या वेळी लिखाणास उत्साह कोठून आणत असतील ? अशा श्रमकारांच्या लेखणीतच मराठी साहित्याला पुढे नेण्याचे सामर्थ्य असते !

स्कूल ऑफ कल्चरमधील त्या सत्कार समारंभाचे अध्यक्ष 'स्वामी'-कार रणजित देसाई होते. 'पूर,' 'झाड,' 'सुरुंग 'सारख्या अप्रतिम ग्रामीण कथांचे व 'बारी 'सारख्या चित्तस्पर्शी कादंबरीचे लेखक म्हणून 'स्वामी 'पूर्वी कितीतरी आधी मी त्यांना ओळखत होतो. बेळगावला जाता-येता सुतकट्टीची बारी लागे व 'बारी' कादंबरी वाचण्याची ओढ तीव्रतर होई. हाती बंदूक व खांद्यावर शिदोरी घेऊन ते महिनाभर बेरड जमातीचा अभ्यास करीत सुतकट्टीच्या बारीतून हिंडत होते, अशी एक आख्यायिका तेव्हा प्रस्तृत होती. त्यामुळे रणजितभाईंशी ओळख करून

घेण्याची एक वेगळीच उत्सुकता मनात होती, ती त्या समारंभानिमित्ताने पूर्ण झाली. समारंभ संपल्यावर ' एकदा आपल्या घरी येण्याचे ' दिलखुलास आमंत्रण रणजितभाईंनी दिलं, याचा अत्यानंद तर त्याहून थोर !

या कार्यक्रमापूर्वी काही महिने अगोदर बेळगावच्या वाङ्मय चर्चा मंडळात आमचा सत्कार झाला होता. अध्यक्ष होते कविवर्य बोरकर व वक्त्या होत्या कवयित्री इंदिरा संत. बोरकरांना खूप वर्षांपूर्वी विनोबा भावेंची पदयात्रा खडकेवाडा गावाजवळ महाराष्ट्रात प्रवेशणार होती तेव्हा पाहिले होते. इतक्या वर्षांनीही बोरकर पूर्वीसारखेच चिरतरुण दिसत होते. तसाच उत्साह, तशीच वाङ्मयीन ओढ आणि इंदिरा संत तर आमच्या निपाणीजवळच असलेल्या तवंदी गावच्या दीक्षित घराण्यातल्या. या दोन थोर सारस्वतांच्या ओळखीमुळे मी जे काही लेखनकार्य करतो त्याचे सार्थक झाल्यागत मला वाटते.

आपला गोतावळा रक्ताच्या नात्याचाच असतो, असे नव्हे ! साहित्य-प्रेमाच्या बिसतंतूंनी जोडलेला असा हा गोतावळा रक्ताच्या नात्यापेक्षाही अधिक जवळचा असू शकतो ...! !

ब्रुसलीचा बाप

कडाकड् शड्डू घुमतोय आणि तसाच खणखणीत आवाजही. 'हातानं दगोड फोडणार, थाळीचं दोन तुकड करणार, लोखंडी सळो वाकविणार!'

भोवताली गर्दीचं कोंडाळं. माणसांचं. पोरांचं. पोरांचंच जास्त.

चालता चालता थबकतो. उत्सुकतेनं आत डोकावतो. तर एक ग्रीक शिल्पच इथं कुणी तरी आणून ठेवलेलं. अवयव अन् अवयव तसेच घोटीव

व पीळदार ! पण हे शिल्प हलतं-चालतं, बोलतं आणि त्यातही विशेष म्हणजे पन्नाशी गाठलेलं. डोकीवरच्या टप्परावर पांढरा वाख. न् ह्या वयात असं घाटदार अभंग शरीर ठेवणं हे आश्चर्यातच जमा होणार. एखादा पैलवान झाला तरी काय झालं ? चाळिशी उलटली की, गर्वार बाईगत पोट सोडतो ! आणि हा पन्नाशीच्या घरात, तरी एखाद्या व्यायामपटू सँडोगत ! अंगावर वा चेहऱ्यावर एखादी सुरकुतीही नाही. कमरेला केवळ लांग, बाकी शरीर उघडंच.

डावा हात कोपरात दुमडून उजव्या हातानं त्यावर तो परत काड्कन् शड्डू मारतो व तालमीतल्या लाल मातीतल्या हौद्यात खाल्ल्यागत एक उलटी उडी हवेत खातो नि परत पूर्वीगत पायावर अज्जाद उभा राहतो अन् म्हणतो,

' शिनिमा-तमाशाला जाता पाच-धा रुपयं उडविता, हाटीलात जाता च्या-भज्याला रुपयाभर खरचता, पन मायबाप हो, आज ह्यो पैलवान आलाय तुमच्या गावात, त्येची करामत बघा नि खुराकाला काई थोडी मदत करा ! '

' कंच्या गावचं वं ऽ पैलवान ... ' ? गर्दीतीलच कुणीसं विचारतं.

' मी व्हय ... ? कऱ्हाड–साताऱ्याकडला ... ' सहज बोललं तरी गुरकावल्यागत वाटावं असं हेल काढून बोलणं. ही तर कऱ्हाड-साताऱ्याकडील तऱ्हा. माणसाच्या बोलण्यावरून व बोलण्याच्या पद्धतीवर हा नग कोल्हापूर-पन्हाळ्याकडला, की पुण्या-मुंबईकडला, की नागपूर-औरंगाबादेकडला, की रत्नागिरी-सावंतवाडीकडला, की बेळगाव-धारवाडकडला हे चाणाक्ष माणसाला तसं ओळखताही येतंच ! ' खासबाग मैदान वसाड पडलं, पन आता मोठमोठ्या कुस्त्या तुमच्या भागात व्हायला लागल्यात...! ' तो बोलगाभाण बोलतोय, ' बिराजदार, सत्पाल, दादू चौगुले ... ! तुमच्या भागाचा डंका चौमुलखात ! इथलं लोक हावळे. कदर करणारे. म्हणून तर एवढ्या पल्ल्यावर आलो ... ' तो बोलतच असतो. बोलता बोलता गुंतवितोय लोकांना आपल्यात. बोलण्यात.

त्याच्या कानाचं कानुलं वाकडं-तिकडं होऊन मुद्दाटल्यालं झालेलं असतात ... मीही बरीच वर्षं तालमीत घुमलेला. हौद्यातल्या लाल मातीत सांज-सकाळ झोंबी खेळलेला. अंगावरील घामाच्या धारांवर लाल मातीच्या हुर्मुजाचं किटाण चढविलेला, तीन हजार जोर-बैठकापर्यंत एक रेकॉर्ड केलेला गावात. माझी अनुभवी नजर ओळखतेय की पठ्ठ्यानं ज्वानीत अनेक फड गाजविले असतील, शड्डू ठोकून तालीम हादरविली असेल. त्या आवाजाने छपरावरची पारवाळं फार्रदिशी उडून गेली असतील आणि कुस्तीच्या वेळी मैदानात समोरच्या भिडूचा ढळ फुटला असेल !

सभोवताली पुरेसे लोक जमलेले आहेत. त्याची जाणीव त्याच्या धूर्त नजरेला होताच तो बोलणे आवरते घेतो.

वर्तुळाच्या मध्यभागी त्याने काढून ठेवलेले कपडे आहेत. सामान-सुमानाची एक पिशवीही आहे. तिथंच एक लोखंडी सळी पडलीय्. त्याच्या बोटाच्या पेराएवढी जाड. खांद्यावर ती घेऊन तो सर्वांना दाखवीत वर्तुळात गोल फेरी मारतो, न् मग मध्यभागी येऊन ती पाठवणाला लावतो, एक पाय पुढे घेऊन पवित्रा घेतो व दोन हातांची पुरी ताकद लावून वाकवू लागतो... तट्ट स्नायू फुगताहेत ... थरथरताहेत ... सळी हळूहळू वाकते आहे ...टाळी पडते आहे... ! अंगाबरोबर ती दुमती होताच खाली फेकून तो प्रेक्षकांना मुजरा करतो ... परत एक रिंगण मारून शड्डू ठोकतो व पिशवीतून एक थाळी काढतो .. प्रेक्षकांजवळ जाऊन ' बघा मामा, बघा दादा ' म्हणून त्यांच्या हाती देऊन थाळीची पारख करायला लावतो आणि मग परत मध्यभागी येऊन पवित्र्यात उभा राहतो. पुढं केलेल्या डाव्या मांडीवर थाळी ठेवून दोन्ही पंजांनी सुरवातीला जोर खाऊन खटपट करतो. न् मग क्षणात ह्या कडेहून त्या कडेला थाळीचे दोन भाग होत जातात. परत टाळीची पावती ! परत त्याचा प्रेक्षकांना सलाम ! परत आणखी जोमही सुरूच,

' तर मायबापहो, पैलवानगी काय कांदाभाकरी खाऊन होत नाही ! तर त्येच्या चंदीला दूधदुभतं पायजे, ' थंडाई ' पायजे ! तवा काय थोडी मदत करा. पावली-अधेली असली तर टाका. नसली तरी जाऊ नका !

आता शेवटचा ख्योळ हुतोय. फत्तर फोडायचा. ह्या–ह्या हातानं फत्तर फोडायचा... हातात काय हातोडा न्हाई, का छन्नी न्हाई, तर नुसत्या हातानं.. हातानं फोडायचा ... ! चार-आठ आणं काय राव, विडी वढून धूर काढता ... पान खाऊन थुंकून टाकता... ! ' त्याचं असं सुरूच आहे.

उत्तेजित झालेले लोक ...पाच-दहा पैसे फेकताहेत. कुणी चार-आठ आणेही. पर कुणी मख्खपणे तसेच उभे. तो किंचित काळ वाट पाहातो न् मग भुईवर पडलेले पैसे गोळा करून आपल्या रुमालात ठेवतो न् तो रुमाल आपल्या सामानाजवळ ठेवून म्हणतो,

' तर आता फत्तर फोडायचं काम ! मायबापहो, ह्यो फत्तर बघा ! या, या म्होरं या. हातात घिऊन बघा या. परीक्षा करा या !! ' आपल्या सामानाजवळची इंच-दीड इंच रुंदीची काळ्या फत्तराची फरशी तो हाती घेऊन प्रेक्षकांपुढं करतो.

' बघा मायबापहो ऽ कुणी बघणार हाय काय ? ' हातातील लादी घेऊन प्रेक्षकांच्या वर्तुळाच्या कडेने तो फिरत विचारीत रहातो. कुणीच पुढं येत नाही. तशी ती खांद्यावरील लादी तशीच जमिनीवर उभ्या उभ्या टाकून तो म्हणतो, ' बघा, ही एवढ्या उंचीवरनं टाकली तरी फुटली का ? न् मग परत लोकांच्या समोरून एक वर्तुळ पूर्ण करीत तो बोलतो, ' आता बच्चे लोक, फिर एक बार टाळी बजाव. आता खरा हिकमतीचा, ताकदीचा खेळ चालू हुतोय ! '

पुन्हा एकदा कडकडून टाळी पडतेय ! त्या गजरातच तो दगडाजवळ बसतो. दोन्ही कडेला दोन्ही छोटे दगड ठेवून तो त्यावर ती फत्तराची लादी ठेवतो आणि ' बजरंगबली की जय ' म्हणून दोन्ही हात जोडून तो प्रेक्षकांना अभिवादन करीत खाली बसतो, अन् पुरी ताकद एकवटून त्या दगडावर– त्या लादीवर पंजाने मारू लागतो. पाच मिनिटे असे प्रयत्न सुरूच... लोकांत अपार टेन्शन .. खरंच दगड फुटणार आहे का उगीच आपलं... ? शंका–कुशंका .. हा इकडे घामाघूम होऊन गेलेला... प्रयत्न सुरूच...आणि काय आश्चर्य ! त्याच्या घणाघाती घावांना यश येतं, अन् ती लादी, तो दगड दोन तुकडे होऊन खाली पडतो ... !

परत टाळ्यांचा गजर ! बराच वेळ 'हाय रे पट्ट्या ! हे ऽ रे गब्रू!' दोन हातांत दोन तुकडे घेऊन तो दोन्ही बाजूस टाकीत उठतो आणि प्रेक्षकांना फड जिंकलेल्या पैलवानागत अभिवादन करीत मघाशी जमा झालेल्या गल्ल्याचा रुमाल हाती घेऊन येतो व लोक पांगायच्या आत वर्तुळाकडे फिरू लागतो, रुमालाची झोळी पसरीत,

'पैलवानाला मदत करा दादा, पैलवानाला मदत करा मामा ! '


दहा पैसे, चार आणे, कुणी अधेली कुणी कुणी देतं तर कुणी कामधाम आठवून काढता पाय घेतं अंडीवाला बसाप्पा तर आकबंद दोन रुपयांची नोट पुढं करतो. ती हाती घेऊन कृतज्ञतेने पाहत तो बसाप्पाला सलाम करतो...

जत्रा उलगावी तसं क्षणात होतं. सारं रिकामं रिकामं ! तो आपल्या सामानाजवळ जातो. अंगात पैरण चढवितो. पटका नामे करून कुण्या एकेकाळी असलेला व आता चिंधी झालेला एक पांढरा धडुता भरदिशी डोक्याला गुंडाळतो व कमरेचे धोतर नेसू लागतो.

अशा व्यक्तीच्या मुलाखती घेण्याची एक पांढरपेशी टूम अलीकडेच निघालीय. कोण गावचं ? कुठलं ? हा पेशा का पत्करला ? जमलेल्या पैशाने तुमचं भागतं का ? वगैरे वगैरे .. पण असे प्रश्न त्या पुरुषसिंहाला विचारणे मला उचित वाटले नाही... सहानुभूतीचा चतकोर तुकडा पुढे फेकून त्याने गाढून टाकलेला भूतकाळ उचकटून काढून त्याला व्यथित करणे, त्याच्या जखमांवर टंवकारा काढून त्याला बंबाळ करण्याचा अधिकार मला नव्हता. त्याचं जे आयुष्य असेल ते असो. (त्याच्या पूर्वायुष्याची थोडीबहुत कल्पना मी करू शकत होतो, कारण माझ्याही आयुष्याचे काही तुकडे तालमीतल्या नादापायी गहाण पडलेले ! पण सध्या तरी तो स्वतःच्या मस्तीत मस्त होऊन जगत होता ना ! मग झाले तर ! आणि पन्नास साव्या वर्षी अशी दृष्ट लागण्यासारखी बाँडी राखणे ... ! मी मनोमन सलाम केला त्याला ! पुरेसा खुराक गरिबीअभावी अशक्य म्हणून आम्ही तालमी सोडून पोटाच्या पाठी लागलो होतो. आणि हा तेही इतक्या वयात व

निश्चित मिळकतीची काहीच शाश्वती नाही असे असताना असे देखणे शरीर ...! मी मनोमन सलाम केला त्याला.

पुढे काही वर्षांनी कोल्हापूरला पार्वतीला, 'एंटर दी ड्रॅगन 'पाहायला गेलो. तिकिटाचा ब्लॅक. ५।१० च्या नोटा कागदागत सरकलेल्या... मीही ब्लॅकचंच तिकीट काढून ब्रुसलीची कमाल पाहिली. नि थिएटरात ओरडून सांगावंसं वाटलं, 'लोक हो, मी ब्रुसलीचा बाप पाहिलाय ! पण लोक त्याला ५।१० रुपये नव्हे तर ५।१० पैसे देत होते ! '



पुस्तकांनी भेटवलेली गावं

प्रवासाचं आणि प्रदेश पाहण्याचं आकर्षण तसं प्रत्येकालाच असतं. आणि वाचनाची आवड असणाऱ्या माझ्यासारख्या वाचकांच्या मनात तर हे आकर्षण आणखीन वाढलेलं असतं !

मधु मंगेश कर्णिकांच्या कथा खूप पूर्वीपासून वाचत होतो. त्यामुळे कणकवली परिसराचं आकर्षण मनात होतंच. नंतर खानोलकरांचं वाङ्मय पैलूदार हिऱ्यागत लखलखणे समोर आलं आणि मला कुडाळची ओढ

लागली. गल्लीतल्या शेजाऱ्यांचा विवाहसमारंभ कट्ट्याला होता. ट्रकमधून निघालो. राधानगरी मागे गेली आणि दाजीपूर आलं .. दाजीपूर ते फोंडा यामधील डोंगराळ प्रदेश ... कै. बाळकृष्ण प्रभुदेसाईंची 'आदिवास' ही धनगरांच्या जीवनावरील अप्रतिम कादंबरी... ती याच प्रदेशावर आधारलेली आहे. 'बनगरवाडी' नंतर नाव घेण्याजोगी धनगरांच्या जीवनावरील 'आदिवास'च ! फोंड्यानंतर कणिकांचं कसूळ गाव लागतं, न् मग लागतं कणकवली. 'गावाकडल्या गजाली' ऐकायला चाकरमाने कणिक सुट्टीत (वा सुट्टी काढून !) येथेच येतात अन् कणकवलीला जाऊनही आपल्या घस्टनीतल्या किराणी दुकानात वा शिप्याच्या दुकानात बसतात, हे ऐकून होतो ... ! कणकवलीच्या पुढेच कसाल लागतं. येथूनच बाँबे-गोवा रोडला एक फांदी फुटून कट्टा–मालवणच्या दिशेने निघून गेलोय !

कट्ट्याचं वैशिष्ट्य म्हणजे गावात शिरताना उजव्या हाताला लागणारं टुमदार चर्च चर्चलगतच डाव्या हाताला ३-४ बंगल्यांची रांग त्यातीलच एक बंगला 'जानवस घर' 'हणून दिलेला. बंगल्याच्या पुढं केवळ कोकणातच दिसावीत अशी स्वच्छ सारवलेली अंगणं. अंगणात थंडगार सावलीची बिछायत पसरून आतिथ्यशीलपणे उभे असलेले आम्रवृक्ष नुकतेच जेवून त्या बिछायतीवर पसरलोय तोवर पलीकडील बंगल्यात गोवानीज् कोकणी गाण्यांची टेप लागली ... असे ताल धरायला लावून नृत्यास उद्युक्त करायला लावणारे संगीत क्वचित कुठे ऐकले असेल !

ज्यांच्याकडे लग्नास गेलो होतो, त्यांचे पाहुणे पावशी, कुडाळ व नेरूरला होते. त्यांना आणायला रिकामी ट्रक चालली, तेव्हा मीही तीत बसलो. परत मग कसालला येऊन उजव्या हाताला वळायचे. सभोवतालचा हिरवाजर्द निसर्ग न्याहाळत आपण राहतो, तोवर डाव्या हातास पावशी येतं. तेथून थोडं पुढं गेल्यावर लागते भंगसाळी नदी. नदीवरचा पूल ओलांडून पल्याड जाताच उजव्या काठावरील हिरव्या गालीच्यातून एक लालजर्द पाऊलवाट समोरच्या गर्द झाडीत लुप्त झालीय. जवळच बोर्ड आहे– 'सिद्ध पुरुषाच्या समाधीकडे.' खानोलकरांच्या कादंबरी-कथांतील गूढरम्य वातावरणात शिरल्याचा भास आपणास होऊ लागतो. सिद्धी प्राप्त झालेला

कोण हा पुरुष ? त्याने जिवंत समाधी घेतलीय का ?... मनात तरंग उठू लागतात.

कुडाळ-बाँबे-गोवा रोड आता गावाबाहेरून काढलेला आहे. गावातून गेलेला पूर्वीचा रोडही आहेच ... याच रोडवर खानोलकरांची खानावळ. रातराण्या तेथे थांबत असतील ! खानावळीच्या माडीवरील खोलीत खानोलकर कविता करीत बसत. कवितांच्या वेडापायी धंद्याकडे दुर्लक्ष होऊन तो डबघाईस येणे संभवनीयच, त्यामुळे या गावंढ्या गावात आपल आयुष्य कुजून चाललंय, असं त्यांना वाटू लागलं, अन् त्यांनी 'सत्यकथे' च्या भागवतांना आर्त हाक घातली, 'मला येथून सोडवा, एखादी शिपायाची नोकरी मिळाली तरी चालेल, पण मला मुंबईला न्या !'

'चिताक' कथासंग्रहाचा राज्य पुरस्कार स्वीकारण्यास मुंबईला गेलो होतो. समारंभाच्या स्थानी माझ्याशेजारी सुभाष भेंडे सपत्नीक बसले होते आणि त्यांच्या पलीकडेच खानोलकरांना मिळालेला पुरस्कार स्वीकारण्यास त्यांचा कोवळेलासा मुलगा आलेला होता. प्रतिभेचे उपजत देणे लाभलेले खानोलकर आपल्यात नाहीत या विचाराने तेव्हा मनात कालवाकालव माजली होती.

कुडाळला असलेल्या खानोलकरांच्या खानावळीच्या ठिकाणी आता लोखंडी सामानाचे दुकान आहे, म्हणतात ! 'रात्र काळी- घागर काळी' तील अत्यंत देखणी नायिका इथलीच. (आता ती असेल का ? असेलही कदाचित !) 'गणुराया' इथलाच, नी 'चानी' ही या भागातील व 'कोंडुरा' तील लोकविलक्षण माणसेही याच परिसरातील ! किती समृद्ध अनुभवविश्व हे !

कुडाळच्या उजव्या अंगाने पश्चिमेस दीड-दोन मैल गेलं की नेरूर लागतं. प्र. श्री. नेरूरकरांचे हे गाव. एवढ्या जवळचे गाववाले असल्यामुळे खानोलकरांचे ते लंगोटीयारही ! नेरूरकडे गेलेली पाणंद लालभडक मातीने भरलेली. तीवरून, अंगावरील हाडांना सुरकुतलेली कातडी चिकटलीय, अशी एक वृद्धा डोईवर चार काटक्या घेऊन काठी टेकत टेकत येत होती. तिच्या अंगात चोळी तर नव्हतीच, पण अंगावर लुगड्याचा

टाचका धडपा होता, तोही चार-सहा ठिकाणी फाटलेला. दलित समाजातील ती असावी आणि कोकणच्या या दारिद्र्याचे थोडेबहुत दर्शन पुढे माधव कोंडविलकरांच्या 'मु. पो. देवाचे गोठणे' मध्ये झाले !

बेळगावला जाताना सुतकट्टीची बारी लागते. या 'बारी' तील बेरडांचे चित्रण रणजित देसाईंनी आपल्या 'बारी' कादंबरीत केलं आहे त्यासाठी शिदोरी बांधून घेऊन महिनाभर ते त्या जंगलातून फिरत होते आदी गोष्टी मी ऐकून होतो. बेळगावला जाता-येता विलक्षण औत्सुक्य या 'बारी' बद्दल निर्माण होई. पुढे ५-६ वर्षांनी ही कादंबरी वाचावयास मिळाली !

बेळगावला गेल्यावर प्रकाशक मित्र जवळकर बंधूंना भेटतोच ! त्यांच्या बुक स्टॉलच्या उजव्या बाजूने गोंधळी गल्ली उत्तरेकडील रेक्स टॉकीजच्या दिशेने गेलीय. या गोंधळी गल्लीत पूर्वी जी. ए. राहात होते, ही माहिती एके दिवशी जवळकरांनी पुरविली ! अर्थात 'जी. ए.' म्हणजे मराठीतील सर्वश्रेष्ठ कथालेखक प्रा. जी. ए. कुलकर्णी हे वाङ्मयवेडच्या वाचकाला तर सांगायला नकोच ! बेळगावचा परिसर ज्यांनी पाहिलाय त्यांना जी. ए. च्या कथेतील अनेक खाणाखुणा आढळून येतात. बोगार वेशीतून छत्रपती संभाजी चौक) राणी कित्तूर चन्नम्माच्या पुतळ्याकडे गेलेल्या कॉलेज रोडवरून जात असताना डाव्या हातास एके ठिकाणी आंबराई लागते. तिच्या गर्द सावलीत अनेक आत्मे चिरनिद्रा घेताहेत. त्यांच्या थंड-ग्यांनी ती आंबराई भरून गेलीय. ही आंबराई 'जी. ए.' च्या 'राक्षस' कथेत आलीय व तीतील पात्रेही कदाचित त्या गोंधळी गल्लीतील असावीत! काकती व अल्युमिनियम फॅक्टरी यांच्या पूर्वेस डोंगर आहे. या दोहोमध्ये रस्त्यालगतच एक छोटेसे तळे आहे. त्यास 'कमळाचे तळे' हे नाव मी मनोमन देऊन टाकले आहे ! केव्हा जावे तेव्हा तेथे हमेशा कमळे उमललेली असत ! या तळ्यापुढेच त्या डोंगरावर असलेल्या पडक्या किल्ल्याचे अवशेष यस्टीतूनही दिसतात. 'जी. एं.'च्या 'तळपट' कथेत याच भागाचे वर्णन येते. 'जी. ए.' किती श्रेष्ठ ग्रामीण कथा लिहू शकतात, याचं उदाहरण म्हणजे ही कथा. एका गारुड्याच्या जीवनाचा भव्य पट या कथेत विणलाय.

चारुता सागरांची 'पुंगी' ही गारुड्यांच्या जीवनावरचीच कथा त्यापूर्वी मी वाचली होती, पण 'तळपट' मध्ये जी. ए. नी मानवी मनाचा तळ चाचपडण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्याला तोड नाही. बेळगावच्या गोंधळी गल्लीत राहून तेथीलच एका हायस्कूलमध्ये शिक्षक असलेले 'जी. ए.' पुढे एम. ए. झाले आणि धारवाड्च्या जनता कॉलेजमध्ये इंग्लिशचे प्राध्यापक झाले. एका मित्राला कार घेऊन द्यायच्या संबधात धारवाड-हुबळी व हवेरीचा प्रदेश पाहण्याचा योग आला, अन् परत जी. एं.च्या काही कथा आठवू लागल्या ...परवाच एका कॉलेजातील कन्नड भाषेचे प्रोफेसर आले· 'मी जी. एं. च्या हाताखाली धारवाडला शिकलोय, आपल्या काही कथांची कानडीत अनुवाद करण्याची परवानगी हवीय,' म्हणू लागले. मी त्वरित परवानगी देऊन टाकली ! 'जी. एं.' च्या शिष्याला नकार कसा देणार ?

काही महिन्यांपूर्वी कवठेपिरानच्या हायस्कूलमध्ये व्याख्यानासाठी गेलो होतो. तेथून आष्टा, इस्लामपूर, कामेरी हा रंगराव पाटलांच्या ग्रामीण कथांतील प्रदेश जवळच. तसा कोल्हापूर-पुणे मार्गे मुंबईला ३–४ वेळा तरी गेलो असेन, पण कामेरी पाहण्याची उत्सुकता काही शमली नव्हती. कारण रात्रीच्या वेळीच सारा प्रवास घडलेला आणि कामेरी इथे असेल, आता येईल, की मागे गेली ? असे करीतच मी बसलेला... पण यावेळी चांगली संधी मिळाली होती. पाटलांच्या कथा मी बऱ्याच दिवसापासून वाचलेल्या, अन् म्हणून त्या प्रदेशाबद्दल अपार औत्सुक्य मनात साकळून राहिलेले ! मी सांगली-जयसिंगपूरमार्गे कोल्हापूरला जाण्याची कल्पना सोडून दिली व हेडमास्तरांना इस्लामपूरकडे जाण्याच्या मार्गाची चौकशी सुरू केली. ते म्हणाले,

'आता थोड्याच वेळात सांगलीहून आष्ट्याकडे जाणारी गाडी येईल त्या गाडीने जावा. आष्ट्याला उतरलात की तेथे इस्लामपूरला जाणारी गाडी मिळेलच !"

मी यस्टीची प्रतीक्षा करीत थांब्यावर उभा होतो. झकास दाढी वाढविलेले पै. मारुती माने आपल्यासारख्याच बलदड मैतरासह फटफटीवरुन सांगलीच्या दिशेने गेले. त्या दिवशी सांगलीचा बाजार होता. सांयकाळचा

पाचचा सुमार होत आला होता. सांगलीकडून आलेल्या बाजाराने भरलेल्या बैलगाड्या गावात शिरत होत्या. एका बैलगाडीवर, मारुती मानेसुद्धा ज्याच्यापुढे लहानखुरा वाटावा, असा एक पुरुषसिंह बसला होता. मानेंच्या वयाच्या दुप्पट त्याचं वय होतं ! डोईवरच्या पिकलेल्या केसाशिवाय म्हातारपणाची कुठलीच कळा न्या वृद्ध पैलवानाच्या अंगावर दिसत नव्हती ! मी कौतुकाने पाहतोय, तोवर सांगलीकडून यस्टी आलीच ...

मी यस्टीत पाय ठेवला. दोन-चार सीटा आणखीही चढल्या. कंडक्टरने घंटा दिली आणि यस्टी पळू लागली.

मी खिडकीतून बाहेर पाहू लागलो. पाटलांच्या कथेतील प्रदेश ...

शंकर पाटलांच्या कथांत पट्टणकोडोलीचा प्रदेश येतो. माझ्या गावच्या इतक्या जवळ, केवळ तासाभराच्या अंतरावर, हा प्रदेश येत असूनही अजून मी पाहिलेला नव्हता. त्यामुळे रेंदाळच्या वाचनालयाचे आमंत्रण येताच निघालो. कोल्हापूर-कारदगा गाडीत बसलो आणि अर्ध्या तासाच्या आतच पट्टणकोडोली आली. नागिणीगत आडवा-तिडवा होत गावातून रस्ता गेलेला होता. चावडी कुठे असेल, त्यातील पाटील, दवाखान्यातील त्या नर्सा आणि तो प्रसिद्ध झेले अण्णा ? 'फडा', 'भार,' 'वेणा' एकाहून एक सरस कथांतील पार्श्वभूमी मी पाहत होतो. त्यातील माणसे भेटतील का ? ती 'टारफुला' तील एकाहून एक इरसाल माणसे याच प्रदेशातील ! आणि गाडी 'कुठं तरी डाळ, न्हाय तर हुपरी-रेंदाळ' या माझ्या प्रदेशात पातळफळक असलेल्या डाळीच्या आमटीबद्दल म्हटल्या जाणाऱ्या वाक्प्रचारातील हुपरी-रेंदाळकडे चालली होती !

माझ्या गावाहून केवळ बाराच मैलांवर कागल लागतं. आणि हे आनंद यादवांचं गाव. कोल्हापूरच्या गोखले कॉलेजात मी होतो तेव्हा यादव बी. ए. ला होते. तेव्हा त्यांना हिरव्या रंगाचे वेड होते, अन् ते नवकाव्ये करीत. त्या किंजाळातून ते लवकरच बाहेर आले व प्रकाशक चंद्रकांत शेटचे यांनी प्रकाशित केलेल्या पहिल्या-वहिल्या 'हिरव्या जगा'तील खऱ्याखुऱ्या ग्रामीण 'कवितां'मुळे सर्वत्र गाजू लागले. यादवांच्या गोतावळ्यातील खेडं कागलच नि 'मोट'सारख्या अप्रतिम कथेचा परिसरही कागलचाच ! पण कागलच्या

पायथ्यापासून गेलेला पुणे-बेंगलोर हायवे त्यांच्या साहित्यातून कायम झालेला असतो व तालुक्याचं ठिकाण असलेल्या व कोल्हापूरचं सान्निध्य लाभलेल्या शहरवजा कागलचं रुपांतरही अनोख्यांनाही कळू नये, अशा प्रकारे गावंढ्या गावात केलेलं असतं !

तर, वाचनाच्या नादानं असे हे प्रदेश पाहण्याचं वेड लागतंही ! त्यामुळे आपणास वाचूनही मिळत नाही, त्याहून किती तरी अधिक ज्ञान संबंधित लेखकांचे व त्यांनी रंगविलेल्या व्यक्तींचे होते !

आता बाबा कदमांची 'प्रतीक्षा' वाचल्यापासून रत्नागिरीजवळचा समुद्रकिनारी प्रदेश पाहण्याचे वेध मला लागलेत !

मोटारी

माणसाचे सात जन्म आहेत, असे म्हणतात. पण हे चुकीचे आहे, असे आमचे नम्र मत आहे. (' माझं, मी केलं ' यासारखा अहंकारभाव आमच्या नम्र स्वभावाला रुचत नाही. कर्ताकरविता तो सर्वेश्वर आहे, ही आमची श्रद्धा आहे.) कारण चिकाटीने अनेक वर्षे संशोधन केल्यावर आम्हाला असं आढळून आलं की, माणसाचे आठ जन्म आहेत आणि आठवा जन्म म्हणजेच मोटारी ! ह्या आमच्या शोधामुळे ' साता जन्माची

सोबत ' ही पुरातन म्हण पूर्णपणे नादुरुस्त होऊन त्यात ' आठा जन्माचा सोबत ' अशी दुरुस्ती केल्यावरच ती व्यवहाराच्या रोडवरून धावू शकेल, हे अपरिहार्यपणे आलेच ! (ह्या शोधामुळे आमचे कुणी सत्कारसमारंभ वगैरे करू नयेत. कारण सभा, सत्कार समारंभ वगैरे सर्व काही आम्हाला वर्ज्य आहेत, हे आम्ही नम्रपणे जाहीर करीत आहोत. उटसूट वरील प्रकार करणाऱ्या जनताजनार्दनांतील अतिउत्साही कार्यकर्त्यांनी याची नोंद घ्यावी.)

माणसं मोटारीसारखी वागतात की नाही, हे आमच्या अल्प मतीस माहीत नाही, पण मोटारी मात्र माणसासारख्या वागतात, हे आम्ही ठामपणे सांगू शकू ! ' सार्वजनिक कार्ये कोणाची बा (' बा 'ची नव्हे !) भीति ' असे आमचे थोर मित्र संत भोलानाथ महाराज, मौजे खत्रुडवाडी यांनी म्हटलेच आहे !

एखादी मोटार एखाद्या माणसाला अगदी अक्षरशः माणसातून उठविल्याचे आम्हास ठाऊक आहे. तसेच एखादी मोटार एखाद्याचा कसा उत्कर्ष घडवून आणते, हेही आम्ही पाहिलं आहे. (काही अति भाषाभिमानी संकुचित लोक मोटारीला स्वयंप्रेरिका व ड्रायव्हरला ' प्रेरक ' असे म्हणतात हे आमच्या निदर्शनास आले आहे. झुणक्याला ' पिठले ' म्हणून त्याची चव घालविण्यासारखा हा प्रकार आहे ! तेव्हा या गहन-गभीर लेखात 'मोटारी ' ड्रायव्हर ' हेच रूढ शब्द योजण्याचे आम्ही ठरविले आहे. तसेच ' मोटारी' या व्यापक शब्दामध्ये कार, स्टेशन वॅगन्स, जीप्स व ट्रक्स यांचा समावेश आहे, हे आमच्या प्रिय वाचकांनी स्मरणात ठेवावे...

१९५६ मॉडेलची लँड मास्टर एका मालकाने घेतली . आकाशी रंग होता, व्हाईट व्हॉल्ट टायरी होत्या, साध्याशा प्रकाशानेही बंपर्स व जाळीचे निकल चमकू लागायचे ... दृष्ट लागण्यासारखी मोटार होती .. पण बया पांढऱ्या पायाची निपजली ! आपल्या टायरींचा व्हाईट व्हॉल्ट तिनं खरा करून दाखविला ! मोटार घेतल्यापासून एका वर्षांत त्या मालकाचे दिवाळे वाजले आणि त्याला मोटार विकावी लागली शेवटी ! एका खेडच्या वरच्या पाटलाने ती खरेदी केली... त्याच वर्षी त्याच्या मळ्यातली कडबा-

पिंजराची बडीम व ऊस पेटला .. आंब्याखालच्या दावणीची बैल कासर तोडून पळाली म्हणून वाचली .. मग पाटलानेही ती अपशकुनी मोटार विकून टाकली ... एका सस्थानिकाने ती विकत घेतली आणि तो जानजवान, घणगंभीर गडी सहा महिन्यांच्या आत छातीत कळ मारायचं निमित्त होऊन आटपला, अशी ही मोटार! पुढे तिचे काय झाले ते आम्हास ठाऊक नाही. पण ह्या गोष्टीवरून असे अनुमान निघते की एखादी मोटार माणसाचा असा क्रूर सूड घेण्यासाठीच निर्माण होते. सायलेन्सरमधून बाहेर पडणाऱ्या इंजिनच्या प्रत्येक स्ट्रोकबरोबर तिचा आत्मा सुडाच्या भावनेचा जप करीत असतो. रेडियटरचे तिचे मस्तक सुडाच्या भावनेनेच नेहमी तापलेले असते गेल्या जन्मीचा कुणी हा अतृप्त आत्मा आहेसं वाटतं आणि आता मोटारीचा आठवा जन्म घेऊन हा आपली तृप्ती करून घेतो आहे !

तालुक्याचा गणा शिपी हा कुणा आध्यामध्यातला नव्हता. पण कुणी मोटार धंद्यातल्या माणसाने त्याला गटवून ठेवलं की, 'टॅक्सी धंदा हा अगदी सोन्यासारखा धंदा आहे. मर्दा, तू एक मोटार घे विकत. खोऱ्यानं पैसा वढशील ! ' वगैरे वगैरे... शर्ट, ब्लाऊज शिवून (अन् त्यात उरल्यालं कापड मारून) आजपर्यंत जमा केलेली पुंजी त्यानं बाहेर काढली आणि सांगणाऱ्या माणसालाच सोबत घेऊन पंधराशे रुपयांचं १९३७ मॉडेल व्ही-एट् फोर्डचं एक डबडं खरेदी करून आला त्या मोटारीचा सायलेन्सर फुटला होता अन् रस्त्यानं गाडी जाताना असा जंक्शन आवाज निघायचा की, हॉर्नशिवाय लोकं रस्त्यातून बाजूला पळायची. दोन दिवस कामधंदा सोडून एखाद्या राजावानी तो त्या मोटारीतून फिरला. नरसोबाचीवाडी केली, जोतिबा केला, काळभैरीला जायला निघाला आणि जाताना रस्त्यातच ॲक्सल तुटला नवा ॲक्सल, मेस्त्री, मजुरी इत्यादी धरून शे-दीडशेच्या फंद्यात पडलं. गाडी तयार होऊन जरा कुठे फिरू लागली तोवर गिअर जाम झाला ! खोलूनबिलून बघितलं तर कॉंट्रल व्हील व फस्ट व्हील बोंबललेलं. गेअरच्या मडग्यावर आणखी दीडदोनशे घातलं, मोटार रिपेअरी करून घेतली अन् ती लायनीवर लागून चार पैसे मिळवू लागते आहे अस

वाटू लागलं, तोवर प्लग बंद पडून सिलेंडरं चालेनाशी झाली. मशीन बदबदू लागलं. एक कनेक्टन बेअरिंगदेखील आवाज देऊ लागलं. इंजन ओव्हर-आईलिंग करून गाडी तयार करण्यासाठी गणूला आपलं शिलाई मशीन गहाण ठेवावं लागलं. तेवढंही पुरेसं नव्हतं म्हणून बायकोच्या गळचातील काही दागिनेही फुकावे लागले. त्या मोटारीनं त्याचा चांगलाच ' बाक ' काढला. सध्या तो अंथरुण धरून आहे. ' मोटार मोटार ' म्हणून तापाच्या भरात जाबडतो !

अशा एक एक मोटारी मालकालाच ' डबऱ्यात ' घालणाऱ्या असतात. तर याउलट अशाही पुष्कळ मोटारी असतात की, त्या मालकाला डबऱ्यातून वर काढून ' माणसात ' आणणाऱ्या असतात... एका कॉन्ट्रॅक्टरची १९३१ मॉडेलची ओपनटप शोव्हरलेट मोटार आहे. ती घेतल्यापासून त्याची भर-भराट झाली. नवीन कॉन्ट्रॅक्टस् ठरवायची असल्यास तो त्या मोटारीतून जाई आणि सहसा हात हलवीत परत येत नसे. लाखो मिळविले त्याने रुपये यानंतर फियाट, जीप व ॲम्बेसडर या गाडयादेखील त्याच्या दिमतीस राहू लागल्या. पण नवीन काही कॉन्ट्रॅक्टस ठरवायची असल्यास तो त्या ओपनटप शोव्हरलेटमधूनच जातो. तसेच उस्मान वस्तादची शोव्हरलेट १९४८ मॉडेल स्टेशन वॅगन आहे. तो तीतून ' सीटा ' वडायचा धंदा करतो. ही मोटार घेतल्यापासून त्याचीही भरभराट झाली. अन् तीही इतकी सद्‌गुणी की, ' आर. टी. ओ.'चं किंवा पोलिसांचं एकदाही काही गंडांतर तिच्यावर आलं नाही. तिनं भरपूर पैसा वस्तादला मिळवून दिला, इतका की, दीड-दोन वर्षांत त्यान १९५१ मॉडेल शोव्हरलेट कार टॅक्सी-धंद्यासाठी म्हणून खरेदी केली. त्या स्टेशन वॅगनच्या काढलेल्या, गुळगुळीत झालेल्या पहिल्यावहिल्या पाच टायरी वस्तादच्या घरात आहेत. प्रत्येक अमावशेला तो मोठया भक्ति-भावाने त्या टायरींची पूजा अर्चा करतो, त्यांच्यापुढे भक्तिभावाने लोटांगण घालतो अन् आपल्या ' बिबी'लादेखील आयुष्यात त्यानं जेवढं जपलं नसेल इतकं त्या स्टेशन वॅगनला जपतो.

अशा प्रकारे पुष्कळ गुणी नि भाग्यलक्ष्मी मोटारी असतात त्यांना पाहिलं की, सुखासमाधानाने गजबजलेल्या एखाद्या भरल्या घरांतील गुणवंत

गृहिणीची आठवण येते. पण पण अशा गृहिणी थोड्याच असतात, पण असतात, हे खरे !

काही मोटारी चेष्टेखोर स्वभावाच्या आढळतील तुम्हाला ! रस्त्यावरून जाता जाता त्या एखादेवेळी दोन-तीन गोलांट्या मारतील. धावता धावता मध्येच एखाद्या खड्ड्यातही मजेने उडी घालतील ! अशा वेळी आतल्या माणूस नावाच्या प्राण्यांचे हात मोडणे, पाय तुटणे, डोके फुटणे, प्राण गमावण इ.इ. काही चिल्लर बाबी होतात. पण याची काही मोटारीला क्षिती नसते! बायकांचा स्वभाव कधी बदलला आहे का ? तसाच मोटारीचाही ! अखेर स्वभाव म्हणजे स्वभाव. त्याला मात्र कुठलेही औषध चालत नाही !

१९४१ मॉडेलची एक परफेक्ट फोर्ड कार एकाच मालकाजवळ चार वेळा गोलांट्या खाल्लेली आम्ही पाहिली आहे प्रत्येक वेळी त्याने चेपलेल्या बॉडीचे लोहार मेस्त्रीकडून काम वगैरे करून घेऊन, नवा रंग देऊन एक हजार रुपयांचा बुक्का केला. पण चौथ्या वेळा जेव्हा बयेनं पुन्हा गोलांटी मारून मजा केली तेव्हा सरळ त्याने तिला जुना बाजारवाला दाखविला अन् सस्त्या भावाने विकून टाकली.

खड्ड्यांत उडी मारणाऱ्या एका मर्सिडीस ट्रकचंहि काहीसं असंच झालं. खड्ड्यात म्हणून बेसावधपणे रात्रीची तिनं जी उडी मारली ती सरळ नदीत पडली, अन् मालकाबरोबर स्वतःलाही तिनं पाण्यात गाडून घेतलं !

काही मोटारी रुसव्या असतात. कोणत्याही मुक्कामाला त्या तुम्हाला सरळ नेऊन सोडणार नाहीत ! वाटेतच काही तरी तक्रार काढून बसतील. केव्हा आर्मिचर फाईल होऊन डायनामा निकामी झाला म्हणतील, केव्हा चाकांतील बेअरिंग गेलं म्हणून वांदा काढतील, केव्हा मास्टर सिलेंडरमधील ब्रेक वायसरनी बोंबडी मारली म्हणून सांगतील ! अशा प्रकारे रुसव्या बयांच्या अनेक तऱ्हा असतात !

काही मोटारी अशा देखण्या असतात की, 'वय सत्रांत, मदन गात्रांत अशा फाकडीवर फिदा झाल्यागत तुम्ही त्यांच्यावर खूश व्हाल. शोव्हरलेट लेटेस्ट मॉडेल (इम्पाला) पाहिलंय् तुम्ही ? चालू मॉडेल कॉन्सल कारमध्ये

कधी बसलाय् तुम्ही ? बरे, निदान १९५६ मॉडेल प्लायमाऊथमधून हवेतून उडत गेल्यागत कधी गेलाय् तुम्ही ? काय, नाही ! मग, यारो तुमने पीही नही !

स्टॅण्डर्ड, फियाट, कॉन्सल, हिलमन या गुटगुटीत मोटारी म्हणता येतील. वाटतं, काखोटीत मारून बाळसेदार बाळासारखं त्यांना हिंडवावं ! परफेक्ट फोर्ड, ओपेल, झेपर किंवा बेबी मॉरीस पाहिली की आम्हाला उंदराच्या पिल्लांची आठवण होते. आस्टीन, वॉक्झल, नॅश, डॅमलर, ल्हासा, लँडमास्टर किंवा अँम्बेसडर पाहिल्या की, बाळसेदार कुत्री नजरेसमोर राहतात. रोल्सराइस, रोव्हरलँड, व्ही. एट फोर्ड, शोव्हरलेट, डॉज, ओल्डस्मोबॉईल, स्टुडबेकर, कैसरक्रॅसलर, ब्यूक, हडसन, पॅकार्ड इ. मोटारी पाहिल्या की वाघ-सिंहाची आठवण होते, तर मर्सिडीज, बेडफोर्ड चायना डॉज (फार्गो) लेलँड पाहिल्या की, जबरदस्त जंगली हत्ती दिसू लागतात.

पूर्वीच्या जमान्यात एखादा हत्ती पाळणं नि हल्लीच्या काळात एखादी कार पाळणं सारखंच ! एखादी कस्टम फोर्ड किंवा शोव्हरलेट एखाद्या वकिलाला किंवा डॉक्टराला पुरून उरते ! या गाड्या, त्यांचे स्पेअरपार्टस्, त्यांची रिपेअरी, त्यांची मजुरी शिवाय सामाजिक दर्जा टिकविण्यासाठी एखादा ड्रायव्हर व त्याचा पगार हरे राम ! हा सर्व खर्चाचा डोंगर पाहून त्या वकिलाला किंवा डॉक्टराला आपल्या नजरेसमोर खरोखरच हत्ती दिसू लागतो ! म्हणून या वर्गातील किंवा या इतकी मिळकत असलेले लोक बेबी फोर्ड, मॉरीस, ऑस्टीन या मोटारी, नव्हे मोटारींची पिल्लं पाळत असलेले तुम्हाला आढळून येतील. मोठ मोठे शेठसावकार किंवा एखाद्या बड्या फर्मचे मालक यांना चार-चार मोटारीसुद्धा पुरेशा होत नाहीत, पण त्यांची गोष्ट अलग ! म्हणून 'घर पाहावे बांधून', 'लग्न पाहावे करून' या लोकप्रिय म्हणीत 'मोटार पाहावी वापरून !' ही नवीन म्हण मिसळण्यास काहीच हरकत नसावी !

रेडिओचा स्वीच फिरविला असता जसं तो बोलू लागतो तसं मोटारीचा स्वीच फिरविल्याबरोबर ती बोलू लागली असती तर काय बहार झाली असती, हा विचार आमच्या नामांकित मेंदूत वरचेवर येतो

आणि आम्ही अस्वस्थ होऊन जातो. या दिशेनेही हल्ली आमचे संशोधन चालू आहे. लवकरच आम्ही आमचा शोध जनताजनार्दनापुढे सादर करून त्यांच्या सेवेचा 'मधुमधुरा' असा आनंद मिळवू अशी बळकट उमेद आहे. याचा एक नमुना पेश करायचा झाला तर – समजा मोटारी बोलू लागल्या तर काय होईल ? मालक-मालकिणींची लफडी-कुलंगडी समजतील, (हा 'चैत्र' फायदा चैत्र हा मराठी मासांतला प्रथम क्रमांकाचा महिना आहे, हे ध्यानी घ्या !) कमी पगाराने एखाद्या मोटारीवर राबणारा ड्रायव्हर वेळप्रसंगी मोटारीचे नवे जुने स्पेअरपार्टस्, पेट्रोल-डिझेल, मोबाईल अन् चांगल्या 'बटनवान्या' टायरी विकून पगाराची 'लेव्हल' कशी पाडतो, याचा फार्सिकल नमुना तुम्हास ऐकावयास मिळेल आणि...पण तूर्त इतकेच पुरे ! आणखी लिहीत बसलो तर आमचे प्रिय वाचक ऑर्डरींचा व चिकित्सक प्रश्नांचा अक्षरशः आमच्यावर पाऊस पाडून आमच्या कार्य-बाहुल्यामध्ये व्यत्यय आणतील, अशी साधार भीती वाटते !

मोटारी बाळगणाराही जातीचा 'हौशा' असावा लागतो... याचा नमुना पाहायचा असल्यास एखाद्या जातिवंत टॅक्सी ड्रायव्हरचे निरीक्षण करावे. तो रोज सकाळी गाडी धुऊन, पॉलिस वगैरे झळझळीत करून स्टँडला लावील, दिवसातून सत्रा वेळा तिला पुसेल. कुठे एखादे भाडे मारून आला की लगेच तिच्यावरून फडके मारील. इंजिनमधे किंवा बॉडीमधे जराही खाट किंवा खुट होऊ देणार नाही. लगेच रिपेरी करून घेईल. तिला वरचेवर मोबाईल, पाणी तपासेल. तिच्या सर्व निपल्सना, आठवड्यातून एकदा तरी शॅईलपपने शॅईल करील. इतकी निगा राखल्यावर ती मोटार अर्थात प्रामाणिक बनते अन् मग प्रवासामधील वाटेवर त्याला दगा द्यावयाची तिची काय बिशाद आहे ? पण या उलट एक-एक 'नग' अशा मोटारी बाळगतात की, त्यातून बसून जाण्यापूर्वी स्वतःचा विमा उतरून मगच आत पाऊल टाकावं असं तुम्हास वाटेल ! आणि मग शेवटी आमचे परम मित्र संत भोलानाथ महाराज, मौजे खत्रुडवाडी, यांचे 'अशा मोटारीत जो गा बैसला, त्याचा कार्यभाग बुडाला' हे प्रसिद्ध वचन तुम्हास आठवेल !

ट्रक ड्रायव्हरने आपल्या ट्रकची केबिन एखाद्या खोलीसारखी सजविलेली तुम्हाला आढळून येईल ... कारण त्याचा रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र मुंबई ते बेंगलोर किंवा मुंबई ते दिल्ली असे टर्नस् करीत जात असते. त्या केबिनमध्ये आरसा लावलेला असेल, जवळच कंगवाही आढळेल. तसेच लक्ष्मी-साईबाबांपासून मक्कामदिनाच्या 'देवालयापर्यंत'च्या तसबिरी लावलेल्या अन् त्यावर कागदी वा प्लॅस्टीकच्या फुलांचे, द्राक्षांचे, पानांचे हार तोरणासारखे लटकविलेले दिसून येतील अन् ह्या मोटारीमुळे कावून गेलेल्या एखाद्या ड्रायव्हरने ट्रकच्या पिछाडीच्या 'फाळक्या'वर लिहून घेतलेले वाचावयास मिळेल–

'खुदा सलामत रखे इस मोटार बनाने वालोंको
घरसे बेघर कर दिया मोटार चलाने वालोंको।'

'मोटारी' हा आजच्या गंभीर लेखांत आम्ही निवडलेला विषय इतका विस्तृत नि प्रचंड आहे, की, त्या बाबतीतले आमचे ज्ञान अजूनही अत्यल्प आहे, हे आम्ही जाहीरपणे कबूल करतो. तरी पण एखादी सिम्का (फ्रान्स मेड), व्होल्टन (ऑस्ट्रेलियन मेड , व्होक्सवॅगन (जर्मन मेड) मोटार पाहण्यासाठी आम्ही पुष्कळ वेळा गोव्याला धावून गेलो आहोत. तसेच रेओ, इंटरनॅशनल, रिनॉल्ट, डी. के. डब्लू , मॅन, सिट्रॉन, जॉगर ही मोटारींची नावे ऐकल्यावर आमचे चित्त चलबिचल होते. कित्येक दिवस आम्ही अस्वस्थ राहतो. आणि प्रिय वाचक, खरे सांगायचे तर हिनो, युसुजो निस्सन इ. जपानी मोटारी पाहण्यासाठी एकदा तिकडे फेरी मारावी आणि तसाच थोडा लांबचा पल्ला मारून रशियांतील 'गार्की,' 'बैका'सारख्या मोटारी डोळे भरून पहाव्यात ही इच्छा आहे. पण जपान किंवा रशियाला जाणे म्हणजे सदाशिव पेठेतून उठून रेल्वे स्टेशनवर किंवा पर्वतीवर जाण्याइतके सोपे नाही, या वस्तुस्थितीमुळे आमचा नाईलाज होतो. जपान किंवा रशियाच काय पण युरोप, अमेरिका व मंगळावरदेखील (मोटारी असल्यास) आम्ही मोटारी पाहण्यास जावे म्हणतो, मात्र सत्य हे आहे की, (होय, ते तरी लपवा कशाला ?) आता हा जो गंभीर लेख आम्ही लिहीत आहोत तो (तुमचे) आमचे थोर मित्र संत भोलानाथ

महाराज, मौजे खत्रुडवाडी, यांच्या पवित्र खोलीतून अपवित्रपणे चोरून आणलेल्या कलमाने अन् आमच्या गल्लीच्या कोपऱ्यावरील श्री. बाबू दुकानदार (आज रोख, उद्या उधार) यांच्या दुकानातून उधारीवर आणलेल्या शाईनेच होय !

आता शाई संपत आल्याने नाईलाजाने (व नालाजेनेही !)आम्ही हा लेख आटोपता घेत आहोत, तरी पण आम्हास असे वाटते की, खत्रुडवाडी-सारख्या एखाद्या पवित्र गावी ' तीन नागीण ', ' फोर सिलेंडर फोर्ड, ' ' टमटम ' इ. जुन्या मोटारीपासून ' इम्पाला ' (शोव्हरलेट) 'स्टारलायनर' ' फॅलकन ' ' थंडरवर्ड ' (फोर्ड), ' डी सोटा, ' ' प्लायमाऊथ ' ' अँबे-सडर ' (ओ. एम. व्ही.) ' टोयाटो, ' ' काँटेन्सा, ' ' मारुती-सुझुकी ' इ. इ. नवीन व चालू मॉडेल्सच्या मोटारीचे प्रदर्शन का भरवू नये ? तेव्हा या दृष्टीने विचार करून कुणी प्रयत्न केल्यास आमच्यासारख्या लाखो मोटारींच्या भक्तांचा दुवा मिळवतील. ही संधी कुणी दवडू नये. पण असे प्रदर्शन भरविण्यापूर्वी आम्हास थोडे कळवावे, म्हणजे प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी (तुमचे) आमचे थोर मित्र श्री संत भोलानाथ महाराजांचे मन वळवून त्यांना तयार करण्याचे कामी आम्ही आमचे वजन (आहे तेवढे) खर्च करून आपल्या प्रयत्नात सक्रीय भाग जरूर, जरूर जरूर घेऊ. असे जाहीर आश्वासन (अर्थात हे आश्वासन एखाद्या मंत्र्यासारखे फुसके नाही. कृपया गैरसमज नसावा !) देऊन आमचे कलम खाली ठेवतो !

मी, वाचक, बक्षीस, वगैरे....

वाचकांची लेखकांना पत्रं येणं, हे आता काही नवीन राहिलं नसलं तरी पत्रातील नावीन्य मात्र वेगळं असतं. वाचकाचे कुठून, कसे व केव्हा पत्र येऊन टपकेल, ह्याचा काही नेम नसतो. लेखकाचे लेखन थोडेफार आवडल्याशिवाय अशी पत्रं येत नसतात, हेही तितकेच खरे आहे. पत्रात लेखकाच्या लेखनाची स्तुती तर असतेच, शिवाय त्याच्या खासगी जीवनाबद्दलही उत्सुकता दाखविलेली असते. 'तुम्ही काय करता ?' असे प्रश्न

वाचून बरेच लेखक मनात म्हणत असतीलच–'लिहितो ते झक मारतो !' 'तुम्ही कथा एकाच बैठकीत पूर्ण करता की अनेक ?' असे बैठकांचेही मोजमाप केले जाते. तसेच लिहिण्याचे कागद कोरे वापरता की आखीव ? पेनने लिहिता, की बॉलपेनने की शिसपेन्सिलने ? प्रथम कच्चे लिहून मग पक्के लिहिता, की एकदम फेअरच करून टाकता ? हाताखाली लेखनिक असतो की स्वतःच लिहिता ? टेबलावर लिहिता, की खाली बसून ? प्रसिद्धीपूर्वी लिखाण मित्रमंडळीत वाचून दाखविता की तसेच पाठविता ? लिखाणापूर्वी उदकाडी लावता की सुवासिक फुले जवळ बाळगणे श्रेयस्कर समजता ?'

औत्सुक्यापोटी अशा अनेक वैयक्तिक प्रश्नांचा मारा लेखकावर होतो तर कुणी एकदम गळ्यातच पडायला बघतात, 'मी तुम्हाला गुरु मानलंय. गेली अनेक वर्षं मी तुमचं लिखाण आवडीनं वाचतो. मलाही लिखाणाचा खूप नाद आहे. मी लिहिलेली कथा सोबत पाठवीत आहे, तरी मार्गदर्शन व्हावे.'

एका वाचकाने तर मला गुरु मानून नाट्यलिखाणाविषयी मार्गदर्शन करून कृपा करण्याची विनंती केली. मी कथा-कादंबऱ्या लिहीत असलो तरी नाट्यलेखनातलं मला 'ओ' की 'ठो' समजत नाही, ही गोष्ट अलाहिदा. उद्या कुणाचं काव्यलिखाणाबद्दल मार्गदर्शन करून कृपा करण्याची विनंती करणारं पत्र आलं नाही म्हणजे मिळविली.

एकदा, ओरिसामध्ये नोकरी करीत असलेल्या एका महाराष्ट्रीयनाचं माझी 'पनोती' कादंबरी वाचून पत्र आलं की आपली लेखनशैली त्या अमुक अमुक इंग्लिश लेखकाच्या शैलीसारखी आहे. वाचून मी फूटभर उडालोच, आयुष्यात कधी केव्हा कुठलीच इंग्लिश कथा कादंबरी वाचली नाही. (वाचलीही असती, पण इंग्लिश येतंय कुणाला ? इंटरमध्ये इंग्लिशमध्ये दांडी उडाली म्हणून तर आता पिठाच्या गिरणीत काम करून ब्याजात पिसत आहे.) अशाच महाराष्ट्राबाहेर नोकरी करणाऱ्या दुसऱ्या एका वाचकाने माझी 'रैत' ही संपूर्ण ग्रामीण निवेदनशैलीतील कादंबरी वाचून लिहिले, की 'काय हो मोरे, ह्या कादंबरीतील भाषा महाराष्ट्रातील कुठल्या भागात बोलली जाते ?' मुंबईच्या एका वाचकाने माझ्या काही

कादंबऱ्या वाचून पत्रातून विचारले, की ' तुम्ही गिरणीत पीठ दळता-दळता हे आणखी दळण केव्हापासून सुरू केलेत ? '

एके दिवशी एक आंतर्देशीय पत्र आले. आत मोजक्याच ८/१० ओळी ठळक बटबटीत अक्षरात लिहिलेल्या. खालची सही पाहून थरारून गेलो. म्हणजे हे एका स्त्री वाचकाने पाठविलेले पत्र होतं बर का ... त्यापूर्वी स्त्रीकडून कधी एकहि पत्र आलेले नव्हते. (प्रेमपत्राचं सोडा. मी म्हणतो आपले वाङ्मय वाचून पत्र लिहिणाऱ्या स्त्रीकडून ! आणि प्रेयसीबद्दल म्हणाल तर किती लेखकांच्या प्रेयसी वाङ्मय वाचत असतात ?) तर तेव्हा मी गोंधळूनच गेलो. खाली सही होती– ' चारुता सागर. ' नंतर ह्या नावाने ' स्वराज्य ' मध्ये काही विनोदही प्रसिद्ध झालेले वाचले. नंतर मग अचानक एके दिवशी मी काम करीत असलेल्या मोटार गॅरेजमध्ये (मी तेव्हा मोटार रिपेअरिंगचं काम करीत असे.) एक चाळिशीच्या उमेदीचे गृहस्थ येऊन उभे राहिले. म्हणाले, ' मी चारुता सागर. ' नंतर हेच नाव मराठी वाङ्मयात किती गाजल ते सर्वश्रुतच आहे. ह्या नावामुळे लेखक राजा राजवाडेही फसले होते आणि ' ललित'च्या एका दिवाळी अंकातील एका विनोदी लेखात त्यांनी हे नाव चक्क स्त्री–लेखकांत (किंवा नुसतंच लेखिकांत म्हणा) समाविष्ट केलं होतं ' नागीण'ला लिमये पारितोषिक मिळाल्यावर ज्यांच्या अध्यक्षतेखाली मळणगावला त्यांचा सत्कार झाला ते लेखक मित्र श्री. शंकर खंडू पाटील परवा परवा म्हणाले की, चारुता सागरांचं खर नाव ' डी. एन. भोसले ' आहे म्हणून.

श्री. राजा राजवाडेंनी माझी 'एकोणिसावी जात' कादंबरी वाचून एक दीर्घ पत्र लिहिलं होतं, कादंबरी स्पर्धेत पाठविली असती तर तर निश्चित पारितोषिक मिळविले असते, असं आपलं स्पष्ट मत कळविलं. प्रसिद्ध विनोदी ग्रामीण लेखक श्री. बा. भ. पाटील यांनी 'एकोणिसावी जात' वाचून प्रभावित होऊन या कादंबरीने सन्मान मिळविला, असं म्हटलं होतं. प्रकाशकांनी म्हटलं, की 'आमची 'मेनका प्रकाशन' ही संस्था सरकारमान्य (म्हणजे काय कोणास ठाऊक) नाही, म्हणून आम्ही कादंबरी स्पर्धेस पाठविली नव्हती. ' आणि अस्मादिकांना तर तेव्हा कुठे, केव्हा नि कधी कादंबरी

पाठवावयाची असते, हेही माहीत नव्हते. (आणि माझ्या ' चिताक'ला १९७५-७६ चे राज्य पारितोषिक मिळाले तेव्हा माझ्यापेक्षाही राजा राजवाडे, चारुता सागर, आनंद यादव, बा. भ. पाटील, रंगराव पाटील आदी माझ्या पत्रलेखक लेखक-मित्रांनाच जास्त आनंद झाला.)

' चिताक ' आवडल्याचे श्री. पु. भा. भावेंनी कळविले तेव्हा तर मो गारच झालो नि त्याचबरोबर थोडा अभिमानही वाटला. भावेंच्या कथा-कादंबऱ्यांनी आमची तरुण पिढी तेव्हा पोसलेली. (भावेंच्या शैलीने नंतर अच्युत बर्वे व वसुंधरा पटवर्धनांनीही काही कथा लिहिण्याचा प्रयत्न केला.) त्यामुळे गुरुवर्य भावेंचे पत्र म्हणजे परमेश्वरी कृपाच, जणू तो शुभशकूनच होता माझ्यासाठी ... कारण ३-४ आठवड्यांतच स्पर्धेचा निकाल जाहीर होऊन ' चिताक 'ला पारितोषिक मिळाल्याचे प्रसिद्ध झाले. भावेंचं अक्षर आधीच सुप्रसिद्ध. त्यामुळे पत्र आडवं धरलं तर आपण चिनी वा जपानी लिपी पाहतोय की काय, असं वाटतं. भावेनी जर उभं मराठी लिहिलं तर आमचं राहू द्या, पण ते चीन वा जपानमध्ये निश्चितपणे वाचलं जाईल !

माझी ' बत्ताशी ' ही डोंबारी, मांग-गारुड्यांच्या जीवनावरील कथा वाचून श्री. जयवंत दळवींचं असं पत्र आलं, तसंच ' गायगुली ' ही महा राष्ट्रात परवाचा मोठा दुष्काळ पडण्यापूर्वी ३-४ वर्षे आधी खरसुंडी-रुई, पळसवणी आदी सांगली जिल्ह्यातील भागात दुष्काळ पडला होता-तेथील लोकांवर लिहिलेली कथा वाचून प्रा. आनंद यादवांचं पत्र आलं 'किर्लोस्कर' कथा स्पर्धेत पारितोषिक मिळविलेल्या ' झुंज ' मुळे कथालेखक, श्री. ह. मो. मराठे व प्रा. स. शि. भावे यांच्याशी पत्रमैत्री जमली. (आणि अलीकडे ' चिताक ' च्या पारितोषिकामुळे ह्या संख्येत भरच पडलीय.)

काही वाचक आपणास प्रत्यक्ष भेटूनही जबर धक्का देतात. एक ' साहेब ' ही (ग्रामीण भागात लिप्टन वा ब्रुकबाँडच्या एजंटाना ' साहेब किंवा ' चहावाला साहेब ' असे म्हणतात.) असाच भेटला. त्याने माझ्या संपूर्ण ग्रामीण निवेदनशैलीतील काही कथा वाचल्या होत्या. तो म्हणाला,

' अहो मोरे, तुम्हाला चार ओळीहि धड, शुद्धपणे मराठी लिहिता

येत नाहीत. आधी व्याकरण शिका, म्हणजे तुमचं मराठी सुधारेल नि मग लिहा.' ह्यावर थक्क होऊन मी म्हणालो, 'अहो पण, खेड्यातील माणूस जसं बोलतो, तसं लिहायला पाहिजे.' तसा तो 'साहेब' मला येडचाप ठरवीत म्हणाला, 'म्हणून काय झालं ? आपण लिहिताना शुद्ध लिहायला पाहिजे. मग लिहिणं म्हटलंय कशाला ?' (ह्यावर माझा चेहरा कसा झाला असेल आणि मी मनातल्या मनात कपाळावर कसा हात मारून घेतला असेल, ह्याची कल्पना वाचक करू शकतील)

दोघे-तिघे वाचक असेही भेटले 'मोरे ही कथा छापून आणायला तुम्हाला किती खर्च आला हो ?' म्हणून त्यांनी विचारलं नि मग खुलासा केला, 'आम्हीही एक कथा लिहिली आहे, ती छापून आणायला किती खर्च येईल, त्याचा अंदाज यावा म्हणून आम्ही हे विचारतो आहोत.' वगैरे वगैरे...

'एक बहाद्दर असाही भेटला. म्हणाला, 'मी सहा रहस्यमय कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. समजा, त्या मी पुण्या-मुंबईच्या प्रकाशकांकडे पाठविल्या आणि प्रकाशकाने माझ्या नावाजागी आपले नाव घालून त्या प्रसिद्ध केल्या तर काय करायचे ?' प्रश्न विचारताना चिंताक्रांत बनलेला त्याचा चेहरा अजूनही माझ्या डोळ्यांपुढून हलत नाही.

एकदा एका खेड्यावरील एक मराठी शाळामास्तर आपल्या नाटकाचं चोपडं घेऊन आला नि उत्साहानं नाटकी आवाजात ते मला वाचून दाखवू लागला. खेड्यातील नायक-नायिका त्या नाटकात उर्दू शेर-शायरी म्हणत प्रेम करीत होते ! मास्तरला पान खाण्याची सवय असल्यामुळे त्याच्या तोंडातून फवारे उडत होते नि स्प्रे पेंटिंग चुकवीत ते दिव्य (?) नाटक ऐकताना माझी कशी त्रेधातिरपीट उडाली असेल, ह्याची कल्पना कोणीही करावी ! (पुढे हे चोपडे कुणीच प्रकाशक हाती धरीना म्हणून मास्तरने घरदुरुस्तीच्या सबबीखाली एका बँकेतून कर्ज काढले नि स्वतःच प्रकाशित केले !)

काही वाचक भेटून मला शहाणपणा शिकविण्याचेही मौलिक कार्य करतात. 'ही कथा ह्या अशा पद्धतीने लिहायला पाहिजे होती. तुमच

त्या अमूक कादंबरीचा शेवट ह्या अशा – अशा प्रकारे करायला हवा होता,' असं सांगून शेवटी काहीजण मला मूर्खातही काढतात. ' ' आम्हाला नुसतं सांगता येतंय, लिहिता आलं असतं तर तुमची चांगली जिरवली असती! ' असा भावार्थ त्यातून व्यक्त करायचा ! काही वाचक तर भेटून नुसत्या सूचनाच करतात – ' हे ह्याच्यावर लिहा, त्याच्यावर का बरं लिहीत नाही ? ' तर काही वाचकांची लेखक म्हणजे काही वेगळीच कल्पना झालेली असते– ' अहो, ह्या इथं मुतारी नाही, तिथं कचराकुंडी नाही, त्या चौकातला लाईट सहा महिने जळलेला आहे. ह्याच्यावर काही लिहा की वर्तमानपत्रात ! ' बँकेत क्लार्क असलेला एक बहादूर तर असा चिवट आहे की, गेली ३–४ वर्षे तो अशा प्रकारच्या लिखाणाबद्दलच्या मौलिक सूचना मला देण्याचेच कार्य करतो आहे !

एकदा मी काही कामानिमित्त बँकेत (जाण्याचा प्रसंग क्वचितच येतो म्हणा !) गेलो होतो, तेव्हा (माझ्या एकंदर अवतारावरूनही असेल !) तेथील क्लार्कनं विचारलं,

' काय हो, सही का अंगठा ? '

मराठीत माझी दीड-दोन डझन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत, असे म्हटले असते तर तो कदाचित बेशुद्धही पडला असता ऐकून !

मी विशेषतः समाजातील खालच्या थरातच वावरत असतो आणि आजवरची माझी दिव्य कामं म्हणजे शेतकी, मोटार रिपेअरी, मिरची पूड करायच्या मशीनवरचे काम, पिठाच्या गिरणीतील काम ! आणि ही सर्व समाजातील खालच्या थरातीलच. तसाच माझा नेहमी अवतारही असतो. (तो प्रत्यक्ष एकदा पाहिल्यावर कवी नारायण सुर्वे प्रा. सुभाष जोशींना म्हणाले होते की, ' मोरेंचा ' असा ' एक फोटो काढून प्रसिद्ध करायला हवा !') त्यामुळे काही ड्रायव्हरही माझे मित्र आहेत. पण मी ' लेखक ' वगैरे आहे, हे विशेष कुणाला माहीत नाही. मी मेस्त्री काम सोडून ५–६ वर्षे झाली असली तरी बहुतेकजण ' मेस्त्री ' म्हणूनच मला ओळखतात. मला बक्षीस मिळाल्याची हवा सर्वत्र होती, त्यावेळची गोष्ट. असाच एक ड्रायव्हर मित्र म्हणाला, ' दादा, बक्षीस मिळालं म्हणं तुम्हाला ? '

' व्हय ! ' मी म्हणालो. अशा लोकांत नेहमी वावरत असल्यामुळे मीही अशुद्धच बोलतो. कुणाशी नागरभाषेत बोलण्याचा प्रसंग आला तर मात्र अडखळल्यागत होतं म्हणा !

' मग च्यापानी तर द्या चला की ! ' तो म्हणाला.

मी त्याला जवळच्या हॉटेलात नेऊन आणलं. बाहेर आल्यावर त्यानं विचारलं,

' कितीचं बक्षीस ! '

' दीड हजाराचं ! ' मी अभिमानाने म्हणालो.

' एवढंच व्हय ! ' असा भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटला.

' पन लॉटरी तिकीट कुठनं काढलासा तुम्ही ? ' आणि खिशातन रुपया काढून माझ्या हातावर टिकवीत तो बोलला, ' तिथंनच मलाबी एक तिकीट काढून आणा. तुमच्या हातानं तरी माजं नशीब उघडतंय का बघू! '

माझ्या पुस्तकाला पारितोषिक मिळाल्याचं ऐकून मुलकी पास असलेल्या माझ्या पत्नीनं उत्सुकतेनं विचारलं, ' व्हय व्हो, ' पारितोषिक ' म्हंजे ' पदक ' न्हवं ? '

ह्यावर माझा चेहरा कसा ' फोटू ' काढून घेण्याच्या लायकीचा झाला असेल, ह्याची कल्पना वाचक सहज करू शकतील ! त्याचबरोबर माझं काहीही लिखाण माझी पत्नी वाचत नसावी ह्याचीही ! न पेक्षा हे सा इतकं स्पष्ट लिहायचं धाडस मला झालंच नसतं !

व्याख्यानं

'नमस्कार, माधवराव ! हॅः हॅः हॅः ऽ ! ' कुणी असं आपण होऊन नमस्कार करीत कारण नसता दात काढू लागलं तर आताशा मी सावध होतो.

' तुम्ही आता मोठे लेखक झालात... हॅः हॅः हॅः ! ' लेखक होण्यात असं हासण्यासारखंही काही असतं, हा नवा शोध मला लागतो. परत तो अभ्यागतच म्हणतो, ' मी कारवारच्या हायस्कूलला शिक्षक आहे. आमच्या

शाळेत उद्या एस. एस. सी. विद्यार्थ्यांना निरोप-समारंभ आहे. प्रमुख पाहुणे म्हणून तुम्हाला बोलावून आणतोच, अस सांगून मी आलो आहे, तुम्ही आलंच पाहिजे ! '

अशा गळेपडूपणाला कसं कटवायचं, ते मी आता अनुभवानं चांगलंच शिकलो आहे. शाळा-कॉलेजांचे असे निरोप-समारंभ, गॅदरिंग, भित्ती-पत्रकांची वा सांस्कृतिक मंडळाची उद्घाटनं अशा कार्यक्रमांना प्रमुख पाहुणे म्हणून कुणाला तरी गणपती करायचं असतं ! एखादा आजी-माजी पुढारी वा आमदार-खासदार किंवा दुसऱ्या कॉलेजातील प्राध्यापक वा प्राचार्य ह्यापेक्षा साहित्यिकाचं आकर्षण फार असतं...असा एखादा भिडू जर प्राध्यापक वा प्राचार्य असेल तर सोन्याहून पिवळं !

शिक्षण प्रसारामुळं समाजातील सर्वच थरांत सुशिक्षितांची संख्या वाढली व खेडे, तालुका व जिल्ह्याच्या गावातूनही लेखक निर्माण झाले. पूर्वी समारंभाला लेखक आणावयाचा झाल्यास पुण्या-मुंबईपर्यंत धाव घ्यावी लागे. आता जवळच्या वीस-तीस मैलांच्या परिसरात एक तरी लेखक (किमान पक्षी कवी तरी !) गावतोच गावतो !

आणि आता सरकारी अनुदान योजनेमुळे कुणाचीही एक-दोन पुस्तके तरी सहज निघालेली असतात. त्यामुळे सर्वच जण स्वतःला प्रथितयश वगैरे समजू लागलेले असतात. अशाना गाठलं की ते एका पायावर व्याख्यानाला यावयास तयार असतात. त्यांना मानधन देण्याचा तर प्रश्नच नसतो. अशात काही सुस्थितील लोक असले तर ते स्वतःच्या खर्चाने येऊनही व्याख्यान देऊन जातात.

पंचवीस-तीस वा पन्नास रुपये मिळाले तरी खूप झाले, असे समजणारेही अनेक असतात. व्याख्याता परतताना काही ठिकाणी हे मानधन बंद पाकिटातून दिले जाते. काही वेळा तर आमची संस्था गरीब आहे, तेव्हा फूल ना फुलाची पाकळी असे म्हणून पाकळीच हातावर दिली जाते.

काहींना शे-दीडशेही मिळतात. काही आमंत्रण द्यावयास येणाऱ्यांना आपला दरच आधी सांगतात. 'एकावन्न रुपये मी घेतो. प्रवास खर्च, जेवण वगैरे तुमच्याकडे !' असे स्पष्ट सांगून टाकतात. काही तर घुशी विळं पाडतात, तशा हव्या तेथे, हव्या तेथून ओळखी काढून आमंत्रण मिळवितात व गावगाव फिरून व्याख्यानं देत (व फर्माईश झाली म्हणजे कथाकथन करीत) पैका मिळवीत असतात. पुण्या-मुंबईकडील काही लेखकांचा तर तीनशे एकावन्नपासून सातशे एकावन्नपर्यंतही दर असतो. तालुका-जिल्हा पातळीवर हाच दर ५१ ते २५ पर्यंतही घसरतो !

व्याख्यानानंतर कथाकथनही व्हायला हवं. किंबहुना व्याख्यानापेक्षा तेच महत्त्वाचं. कथा विनोदी हव्यात, म्हणजे (त्याच पैशात, पक्षी व्याख्यात्याच्या मानधनात !) करमणुकही होते ! म्हणजेच व्याख्यात्यानं 'विदूषक' बनायला हवं व विद्यार्थ्यांना हसवायला हवं ! यासाठी ज्यांना अशी व्याख्यानं करून पैका कमवायचा आहे त्यांनी ३–४ विनोदी कथा पाठ करून ठेवायला हव्यातच

आयुष्यात पहिलं आमत्रण आलं होतं देश व कोकण यांच्या सीमेवरच्या एका हायस्कूलचं. परतीच्या वेळी स्टँडवर मास्तरनं तीन रुपये व वर काही पैसे हातावर ठेवून निरोप घेतला ! नदीकाठच्या अशाच एका दुसऱ्या हायस्कूलचं आमत्रण होतं. नदीच्या अलीकडील गावापर्यंतच यष्टी. तेथून नदीकडेने क्वचित कोरडचा पात्रातून दोन-एक मैल प्रवास केल्यावर पलीकडील गाव. मला आणावयास व पोहोचवायास शिक्षक असल्याने केवळ यष्टी पुरते पैसे सुटले. (हेही नशीबच !) एका बहाद्दराने तर जिल्ह्याच्या ठिकाणचे २–३ लेखक मिळू शकले नाहीत म्हणून (नाईलाजाने !) मला आमंत्रित केले ! एका कॉलेजाचे आमंत्रण स्वीकारून गेलो, तर तेथे प्राचार्य विरुद्ध प्राध्यापक हा छुपा सामना पाहावयास मिळाला. त्यात एक पार्टी जनताची तर दुसरी काँग्रेस (आय) ची. त्यात समारंभाच्या वेळी राष्ट्रध्वज उलटा कुणी लावला, ह्याबाबत एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, त्यामुळे सामना खूपच रंगला होता !

काही आमंत्रणं पत्रातूनही वाटचाल करीत आपणापर्यंत येतात. हे एक शँपल ' सुपरस्टार लायब्ररी बिरज ४२७४२०, महाराष्ट्र स्टेट-भारत Ref. No. 80 | 495, Date 7-12-82 स. न. वि. वि.–

आपण आमच्या ग्रंथालयात आपले सवडीने एक दिवस येऊन आपल्या व्याख्यानाचा लाभ आमचे वाचकांस द्यावा, अशी विनंती आहे. आमच्या ग्रंथालयाने आतापर्यंत अनेक साहित्यिकांना बोलावून त्यांच्या व्याख्यानाचा लाभ अनेक वाचकांना मिळवून दिला आहे. ग्रामीण भागातील साहित्यिकांचे विचार समाजाला द्यावेत, असा आमचा हेतू आहे. तरी आपण योग्य तो विषय निवडून आम्हास कळवावे व आमचे आमंत्रण स्वीकारावे. आमचे ग्रंथालय सार्वजनिक सरकारमान्य (म्हणजे ? इति. मी) आहे. ग्रंथालयात ४००० ग्रंथ असून रोज २००।२५० वाचक येत असतात. ग्रंथालय रविवारी बंद असलेने आपण अन्य दिवशी यावे.

आमचे संस्थेकडे मानधन देणेची प्रथा नाही. मात्र आपणास राहावे लागल्यास निवासाची व हवे असल्यास भोजनाची व्यवस्था आम्ही जरूर करू. (ही देखील फार मेहरबानी झाली ...)

तरी कृपया आपण आमचे आमंत्रणाचा स्वीकार करावा व तसे अगोदर १५ दिवस कळवावे, ही विनंती. येते वेळी आपण आपले प्रकाशित झालेले नवे पुस्तक ग्रंथालयास भेटीदाखल आणल्यास आम्ही आपले कृतघ्न होऊ (बापरे !) व आपली आठवणही मरेपर्यंत (कोण, आम्ही ?) आम्हाजवळ राहील ! (पत्रातील चुका असि. लायब्ररीयनच्या !)


आपली नम्र,

कु. सुनंदा हत्ती, असि. लायब्ररीयन, सुपरस्टार लायब्ररी,

बिरज ४२७४२०.

अशांसाठी पुढील मजकुराचे एक लेटर हेड छापून घ्यावे म्हणतो–

' मी कुठल्याही व कसल्याही समारभाची आमंत्रणे स्वीकारीत नाही. तरी संबंधितांनी व्याख्यानासाठी गळ घालू नये, वा गळी पडू नये ! '



कुस्ती

सात-आठ वर्षांचा असेन नसेन. गावाच्या पश्चिमेस कोठीवाल्यांची विहीर होती. तेथे अंघोळीस जायचो. त्या मळ्याचा रैत ज्यानुमा चव्हाण. त्याचा ल्योक इस्नू. असाच एके दिवशी अंघोळीस गेलो असता इस्नू म्हणाला,

'म्हादेव, यायाम साळेला येणार काय ?'

'येतो !' म्हणालो आणि दुसऱ्या दिवसापासून त्याच्यासह जाऊ लागलो.

तेथे जाण्यापूर्वी लंगुटा लागतो, व्यायाम करताना आलेला घाम पुसायला टॉवेल लागतो व व्यायामापूर्वी अंगाला खोबरेल तेल लावून घ्यावे लागते, त्यासाठी त्याची छोटी कुपीगत बाटलीही बरोबर घ्यावी लागते, हे सारं प्रथमच कळत होतं. तेथे निंबाळकर मास्तर होते. गोरेपान, कातीव शरीराचे मास्तर मल्लखांब, डम्बलबार, सिंगलबार, वेटलिफ्टिंग आदी व्यायाम प्रकार शिकवीत. पण व्यायामशाळेत तालीम नव्हती. ती होती घट्टे गल्लीला. तेव्हा कुस्तीचा सराव करायचा तर तिकडेच जायला हवे होते.

आमच्याबरोबर शिवाजी अंकोशेही तेव्हा व्यायामशाळेत येत होता. आम्ही तिघांनी पण तालमीत जायचे ठरविले. खरं तर तेव्हा व्यायाम शाळेत खूप मुलं येत होती आणि त्या साऱ्यांना निंबाळकर मास्तर गरम गरम दूध देत– हा, असा पेलाभर ! पण आम्हाला तर कुस्ती खेळायची रग, आणि त्यासाठी हौदा हवा व तो तालमीतल्याशिवाय कुठे असणार ?

ही घट्टे गल्लीतील तालीम खूप रुंद व अग्गळपग्गळ होती. कुस्तीच एखादं मैदान भरविता येईल एवढी मोठी जागा तालमीबाहेर होती. प्रवेशद्वाराशी फुलांची उंचच्या उंच झाडं होती. निलगिरीच्या झाडागत ही आभाळ चुंबायला सरळ वाढत गेली होती. त्यांना उद्‌गार चिन्हांगत लांबोडकी व पांढऱ्यारंगाची फुले लागत. सकाळ-संध्याकाळ त्या सुगंधी फुलांचा सडा तालमीच्या दारात पडलेला !

आतासारखा तेव्हा मुलांना सिनेमाचा जबर नाद नव्हता, की जो–तो डोईवर वीतभर जंगल वाढवून स्वत:ला हिरो समजून पोरीवर लाईन टाकण्यासाठीच आपला जन्म आहे, असं समजत नव्हता. त्यामुळे या तालमी-तही मुलांची खूप गर्दी होती. चिमाजी वस्ताद, समशेर वस्तादसारखे लोक आम्हाला कुस्तीचे डावपेच शिकवीत. या लोकांना कुणी पगार देत नव्हते की पेन्शन ! दिवसभर काबाडकष्ट करून दिस बुडाल्यावर हे लोक तालमीत येत व आम्हाला कुस्तीतील डावपेच शिकवीत राहात. पटात कसं घुसायचं, पुट्टी कशी मारायची, घिस्सा कसा ओढायचा, सलामी झाल्यावर खडाखडी

चालू असतानाच समोरच्या गडद्याला कसं जोखायचं, आकडी कशी लावायची आदी बरंच काही असे. हौद्यात उतरून कुस्ती खेळताना चिमाजी वस्ताद असे नवे नवे डाव शिकवीत राही. समोरच्या भिडूबरोबर ते करीत कुस्ती खेळावी लागे. एखादा डाव चुकताच हौद्याच्या कट्ट्यावर बसलेला चिमाजीराव वस्ताद खाल्ती मातीत उडी टाकी व बाक्कदिशी उघड्या पाठीत एक रपाटा घाली !

मारुती चव्हाण, बादशहा, वाळकीचा के. पी. पाटोल, अनंत करडे, मुरगुडे, शिवाजी अंकोशे अशा एकाहून एक बलदंड पोरांच्या मेहनतीने व शड्डूने तालीम घुमायची ! तेव्हा मुंबई राज्याच्या कुस्तीची दंगल मिरजेला झाली होती व वजनी गटातील कुस्तीत पहिले बक्षीस पटकावून मारुती चव्हाणने ढाल जिंकून आणली होती. गावातून त्याची तेव्हा मिरवणूकही काढली होती.

चिमाजी वस्ताद डोकीवर तिरकी टोपी ठेवून, हाती धोतराचा एक सोगा धरून उजवी टाच जमिनीवर न टेकता हवेतून उडत चालल्यागत चालायचा. वस्तादने यापूर्वीच्या दोन पिढ्यांना शिकविले होते, मारुती व बादशहाची ही तिसरी पिढी. वस्ताद तिला ' झोपडी ' म्हणे. ' ही मी तिसरी झोपडी उभारलीया ' म्हणे. समशेर वस्ताद मध्यम उंचीचा, आटूक बांध्याचा. चिमाजी वस्तादगत हा शीघ्रकोपी नव्हता, तर शांतपणे सारं काही समजावीत राही, स्वत: लंगोटा घालून हौद्यात उतरून शिकवीत राही. आम्हाला एखादा डाव आला नाही, की चिमाजी वस्ताद हौद्यात उडी टाकून आधी पाठीत रपाटा मारी व स्वत:च्या अंगावरील कपड्यांची पर्वा न करता ' हे असं ऱ्हवं, असं ! ' म्हणत स्वत: डाव करून आम्हाला पाठीवर आदळून नाक वर करी !

तेव्हा कुठलीही जत्रा वा उरूस कुस्तीची मैदानं झाल्याशिवाय पार पडत नसे. भुंड्या झालेल्या शिवारातील काळी माती हेच मैदान असे. तीनच्या पुढे मैदानं सुरू होत. माती खूप तापलेली असे. चराचरा अंग भाजून घेत कुस्ती करावी लागे. कुस्ती मारल्यावर खोब-याचं एक भकाल

मिळे, पण तेव्हा विजयाची नशा काही और असे एखाद मैदान जवळ आलं की, महिनाभर आधीच मेहनतीला जोर चढे ! सांज-सकाळ जोर-बैठका, करेली फिरविणे, हौदचात झोंबी खेळणे, हे सारं चालू होई. आठवड्यातून एकदा थंडाई घोटण्याचा कार्यक्रम होई ! खसखस, बडीशेप, बदाम, दूध, जायफळ, खारका आदीचं घोटून-घोटून बारीक झालेलं ते मिश्रण वस्त्रगाळ करून १-२ प्याले घशाखाली सोडताच डोळे गपागपा मिटून मस्तपैकी झोप येई. या थंडाईच्या कार्यक्रमागत आठवड्यातून एकदा मालीश करण्याचा कार्यक्रमही असे. आमचे आम्ही एकमेकांची मालीश करायचो. पावशेरभर तेल अंगात जिरवायचो. मालीश केल्यावर सारं अंग कसं सावरीच्या कापसागत हलकं हलकं होऊन जायचं ! तेव्हा स्वताईही होती, त्यामुळे दूध-दुभतं व मटण यथेच्छ खाता येई, शिवाय तुपात खारका घालून लोणच्याच्या बरणीगत ती बरणी आम्ही ठेवायचो, अन् मग रोज त्यातलं तूप व खारका थोड्या थोड्या खायचो !

कुस्तीला मैदानात शिरण्याचाही एक सकेत असे व तो वस्ताद सांगत असे– अमुक ह्या ह्या बाजूनं मैदानाला पाया पडत उजवा पाय आत टाकायचा व सलामी अमुक ह्या दिशेला तोंड करत द्यायची. अर्थात हे करण्या न करण्यावर कुस्तीतील जय-पराजय अवलंबून आहे, अशी तेव्हा श्रद्धा होती. समोरच्या भिडूला उत्ताणा करताच त्याच्या छाताडावरून उठायचं व दोन्ही हात वर करून एका पायावर नाचत हर्ष व्यक्त करायचा न् मग धावतच जाऊन मैदानाच्या कडेला बसलेल्या वस्तादाच्या पाया पडायचं, हे प्रत्येक पैलवानच करीत ...

कोल्हापूरच्या खासबाग मैदानात कुस्ती ठरणे व ती जिंकणे हा पैलवानकीच्या आयुष्यातला सर्वोच्च सन्मान असे. गावोगावच्या जत्रेतील कुस्त्यांच्या मैदानात चमकदार विजय मिळविलेल्या पैलवानांना खासबाग मैदानात चान्स मिळेच. घरची सुस्थिती असेल तर मग अशा मुलाला एखादा बाप कोल्हापूरला नेऊन तालमीत ठेवी, हायस्कूलचा पोरगा कॉलेजात जावा तसं काहीसं वाटे !

हायस्कूलची एस. एस. सी. पास होताच मी कोल्हापूरला कॉलेजात दाखल झालो न् माझे कुस्तीचे दिवस तेथेच संपले. मी तीन हजार जोर व बैठका मारीत होतो व हे रेकॉर्ड अजूनहीं गावात कुणी मोडलेलं नाही, हे कुणास खरेही वाटणार नाही !

एक पाणीदार गाव : निपाणी

निपाणीला पाणीदार गाव ह्यासाठी म्हणायचं की,' पाणी तेरा रंग कैसा ? ' अशी पृच्छा करण्यासारखी इथे परिस्थिती आहे !

सीमाप्रश्नाचं पेटतं पाणी इथ आहे. तसेच तंबाखूचा वास मारणारं, ठसका लावून डोळ्यांत अश्रू उभं करणारं पाणीही इथं आहे. त्याचप्रमाणे स्थानिक राजकारणाचं दुर्गंधी आणणारं कुजकं पाणीही इथं आहे आणि प्यायचं पाणी ? ते तर मुबलक ! अहो, इतका मोठा दुष्काळ पडला होता

ना मागे, तेव्हा महाराष्ट्रातील सर्व नद्या, विहिरी पार आटून गेल्या होत्या, पण निपाणकर सरकारांच्या वाडचातील विहिरीनं अख्ख्या शहराला पाणी पुरविलं. इंजिन लावून रोज पाणी उपसलं जात होतं, पण त्या विहिरीचा तळाचा ठाव कांही लागला नाही. दुष्काळ संपला तरी, उंचच्या उंच अख्खी मेसकाठी विहिरीत बुडत होती. असं हे पाणीदार गाव.

एक ज्वलंत प्रश्न

सीमाप्रश्न हा इथला ज्वलंत प्रश्न. एकोणतीस वर्षे होऊन गेली तरी अजून त्याचा दाह कमी झालेला नाही, हे कदाचित पुण्या-मुंबईकडील लोकांना खरेही वाटणार नाही ! बाळूमामाने हाक देताच अजूनही ह्या प्रश्नावर त्यांच्या पाठीशी अख्खा निपाणी भाग एकदिलाने उभा राहतो. बाळूमामा (श्री. बळवंत गोपाळराव चव्हाण) हे खऱ्या अर्थाने निपाणी भागाचे लोकनेते. सीमाप्रश्नाच्या राजकारणात जसे दिल्लीवर धडक मारतील, तसेच गल्लीतील एखादा गोरगरीब अडचणीत असेल तर हे मध्य रात्रीही त्याच्या मदतीला धावतील. त्यांच्यासोबत माळी गुरुजीही गोर-गरिबांसाठी धावाधाव करताना आढळतात.

येथील स्थानिक राजकारण म्हणजे कुजलेल्या पाण्याचे डबके. पंधरा वर्षे होऊन गेली तरी येथील नगरपालिकेच्या प्रशासकीय कारभाराचं उच्चाटन झालेलं नव्हतं. मध्ये दोन वेळा निवडणुका घ्यायचा प्रयत्न झाला, पण गावातीलच काही विघ्नसंतोषी लोकांनी ' स्टे ' आणून त्याला खो दिला ! निपाणीचं राजकारण असं हे तिडेबाजी. ह्या तिडचाला तंबाखूचा ठसका असतो. तंबाखूच्या व्यापारातील डावपेच अशा वेळी फार उपयोगी! त्यामुळे ' निपाणी तिडा ' हा लवकर दिसत, जाणवत नाही की ओळखू येत नाही. ज्याच्यावर त्याचा प्रयोग होतो, तो उताणा पडला की मात्र आश्चर्यचकित, अवाक् वगैरे होतो !

निपाणीचं दुसरं व्यवच्छेदक लक्षण म्हणजे तंबाखूचा व्यापार. कोटचावधी रुपयांची उलाढाल होणारी निपाणीसारखी तंबाखूची मोठी

बाजारपेठ अख्ख्या भारतात कोठेही नाही. ह्या भागातल्यासारखी कडक तंबाखू कुठेही पिकत नाही. येथून ४-५ मैलांवर असलेल्या अक्कोळची तर विडी फॅक्टरीवाले 'खास अक्कोळी कडक तंबाखूपासून बनविलेली' म्हणून जाहिरातही करताना आढळतात. विडी कारखान्यांना, तसेच जर्दा वगैरे करणाऱ्यांना नि किरकोळ व ठोक व्यापाऱ्यांना येथूनच तंबाखू जातो. बाहेरगावच्या अशा गिऱ्हाईकांना येथे 'बिचाईत' असे म्हणतात. पूर्वी बिचाईत लोक लाखो रुपयांची तंबाखू उधारीवर न्यायचे, त्यांनी उधारी बुडविली की मग, इकडे फर्मचा मालक भिकेलाही लागायचा. हल्ली ही उधारीची प्रथा पूर्वीएवढी राहिलेली नाही, असे म्हणतात.

ह्या वखारीतून निपाणीतील व आजूबाजूच्या पंचक्रोशीतील खेड्यांतील हजारो गोरगरीब स्त्रिया काम करतात त्यांना जी हजेरी मिळते त्यावर दोन वेळचे काय, पण एक वेळचेही पोटभर जेवण मिळत नाही.

विडी कारखाने

निपाणं चं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विडी कारखाने. येथे 'पिस्तूल विडी', 'विलास विडी', 'करीम विडी', 'दरबार विडी', 'टेनिस विडी' आदी विडी कारखाने आहेत. ह्या कारखान्यांतूनही हजारो बायका पान-तंबाखू आणून विड्या बांधीत असतात. निपाणी हे तसं श्रीमंत गाव म्हणून ओळखलं जात असलं तरी मूठभर श्रीमंत व हजारो गरीब मजूर लोक अशी येथील वस्तुस्थिती आहे. इचलकरंजी जसं मजुरांचं गाव म्हणून ओळखलं जातं, तसं निपाणीही मजुरांचं गाव म्हणून ओळखलं जायला हवं !

ह्या परिस्थितीमुळे, निपाणीत किंवा निपाणी भागात पोरींना लग्न करून देणं हे तितकं काही सुखाचं मानलं जात नाही. कारण अशा पोरींच्या नशिबी मग जन्मभर वखारीतलं तंबाखूचं काम किंवा एकजागी बसून विड्या बांधत कमरेत अधू होण्याचं काम ! पुष्कळ कुटुंबांत येथे असंही विपरित दृश्य दिसतं की, घरातील स्त्री वखारीतलं तंबाखूचं काम करून

किंवा विड्या बांधत घरप्रपंच चालवीत असते आणि घरातील कर्ता पुरुष कुठं तरी तंबाखूच्या फर्ममध्ये हमाली वा मोलमजुरी करून येणारे पैसे दारू, जुगार, आंकडा, पत्ते, वेश्या आदींवर उडवून जेवणासाठी आणखी घरात भारभूत होत असतो. उलट काही बहादूर तर काहीच न मिळविता उलट गुरुवारी बाजाराच्या दिवशी पगार झाल्यावर बायकोकडेच विडीला वा दारूला हात पसरीत असतात आणि त्या बायकाही अशा नवऱ्यांना कुरकुरत का असेना, पण पैसे देतात !

कर्नाटकचा आकस

बेळगाव जिल्ह्यातील निपाणी हेच बेळगावच्या खालोखाल सर्वांत मोठे गाव. वस्ती साठ हजारांहूनही अधिक झालीय. पण अजून हे साधा तालुकाही नाही. तालुक्याचे काही काम असेल तर येथून बारा मैलांवर असलेल्या चिकोडी ह्या खेडेगावी पळावे लागते. निपाणीच्या निम्मेही चिकोडी नाही, तरीही हे तालुक्याचे ठिकाण अर्थात् ह्यामागे तिड्याचे राजकारण आहे. त्यामुळे निपाणीत कुठलाही कारखाना वा मोठा उद्योगधंदा काढायचा झाल्यास कर्नाटक सरकारची परवानगी मिळत नाही.

महाराष्ट्र-कर्नाटकाच्या बॉर्डरवर निपाणी हे गाव येते. त्यामुळे येथे सरकारी अधिकारी बदली करून घेण्यास उत्सुक असतात. येथे बदली करून घेण्याचा दर वीस हजारांपर्यंतही गेल्याची वंदता आहे. निपाणी गावाबाहेरच 'बॉण्ड्री' आहे तेथील नाक्यावर मुंबई वा बेंगलोरकडे जाणाऱ्या-घेणाऱ्या प्रत्येक ट्रकवाल्याकडून दोन-तीन रुपये 'इंट्री' उकळली जाते. कुणाला हे खोटं वाटल्यास त्यानं कुठल्याही ट्रकमधून प्रवास करून हे प्रत्यक्षच पहावे. महिन्याला लाखो रुपये हे असे इंट्रीचे पाणी जमा होते आणि मग ते कुठं-कुठंपर्यंत पाझरत जाते, हा एक खास संशोधनाचा विषय. काही वर्षांपूर्वी तेरणीकर नावाचे एक अत्यंत कर्तव्यदक्ष फौजदार येथे बदली होऊन आले होते. त्यांनी गावाला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला. गल्ली-गल्लीत गस्त पथके स्थापन करून चोऱ्यांना पायबद घातला, गावातला 'आकडा' हा ग्रामोद्योग बंद केला, अन् असे बरेच. पण बेशिस्त वागणाऱ्या गावाला अशी

शिस्त कशी परवडावी ? खास निपाणीचेच डावपेच पार बेंगलोरपर्यंत लढवून तेरणीकरांची बदली केली गेली ! तर पाणीदार निपाणीकर अशा विपरित जागीही पाणी दाखवितात.

निपाणीतल्यासारख्या स्वस्त व मस्त नाष्टा बाहेर कुठेच मिळत नाही ! केवळ दोन-अडीच रुपयांत तुम्हाला येथे चपाती, बटाटेभाजी, पातळभाजी, भजी, चहा मिळेल ! आणि चपातीबरोबर पातळभाजी (येथे तिला ' तवंग ' वा ' कट् ' असेही खास नाव आहे !) हवी तेवढी मोफत! आणि हे सारे चमचमीत, चविष्ट !

जातीय ऐक्याचे वैशिष्ट्य

हिंदु-मुस्लीम ऐक्य (किंवा गोंडस शब्दात सांगायचे तर जातीय ऐक्य) हे निपाणीचे आणखी एक वैशिष्ट्य. सार्वत्रिक निवडणुकांच्या-वेळी द्वेत निर्माण करण्याचा प्रयत्न काही पुढारी लोक करतात, पण त्यांना अजूनही यश आलेले नाही ! प्रत्येक वर्षी येथे मोठ्या प्रमाणावर भरणाऱ्या उरुसाच्या वेळी ह्या ऐक्याची प्रखर जाणीव होते. येथील दर्ग्याला मुसलमाना-प्रमाणेच हिंदूंचेही नवस, बेडच्या वाढविणे वगैर असतात. नवसवाले अघोळ करून ओल्या अंगाने दंडवत घालीत दर्ग्याला जातात आणि ह्या उरुसाच्या-वेळी पहिला मान चव्हाणवाड्याचा असतो. दक्षिण महाराष्ट्रात मिरजे-खालोखाल मोठा ऊरुस भरतो तो निपाणीलाच ! शिवरात्रीत येथे महादेवाचा रथही ओढला जातो. शिलंगणाच्या वेळी येथे पूर्वी सर्व जातीपातीचे लोक गावाबाहेरील बिरोबाच्या माळावर एकत्र सोने लुटीत, पण अलीकडे जैन, लिंगायत बांधवांनी आपले वेगळे सुभे निर्माण करून बागेवाडी हायस्कूलसमोरील माळावर सोने लुटावयास सुरुवात केलीय ! पूर्वी रामलींगच्या डोंगरावर मोटारीतून जाऊनही सोने (आपट्याची पाने) आणली जात. पण आता शिप्पूर, शेंडूर आदी डोंगरा-वरील लोकच आपट्याच्या पानांचे भारेच्या भारे आणून नेहरू चौकात विकत बसतात. म्हणजे ही लगतच्या कोल्हापुरासारखी प्रथा पडली. तिथंही दसरा चौकात असंच ' सोनं ' विकत बसतात. पण डोंगरावरील झाडोऱ्यात

जाऊन स्वत: ते आणण्यात जे पौरुषी कर्तृत्व आहे, ते चौकात जाऊन दहा पैसे फेकून पेंडी विकत घेऊन घेण्यात नाही !

कर्मचाऱ्यांचा व्यवसाय

येथे इनमिन तीन चित्रपटगृहे असून बाहेरील गावी रौप्य वा सुवर्ण-महोत्सवी झालेले चित्रपट खच्चून महिनाभर चालतात ! पहिल्या २-३ दिवशीच केवळ गर्दी उसळते नि थिएटरमधील नोकरच तिकिटांचा काळा-बाजार करीत असतात. एक थिएटर तर तंबाखूच्या गोडाऊनमध्येच बाकडी टाकून बनविलंय की काय, असं वाटण्यासारख सुसज्ज (?) आहे. येथील मराठी शाळा नंबर एकजवळील तळे बुजवून म्युन्सिपालटीच्या पहिल्या प्रशासकाने सप्पय् करून टाकले नि त्या जागेचे काय करायचे ? मंडई का थिएटर ? तर करा ओपनएअर थिएटर ! जगातील नामवंत वास्तु-शास्त्रज्ञांनीही तोंडात बोट घालावे, असे हे ओपनएअर थिएटर आहे खरे! पुण्या-मुंबईकडील गाजलेले नाट्यप्रयोग येथे होतात. एका कट्ट्यावर स्टेज नि समोरच्या मैदानात खुर्च्या व त्यामागे जमिनीवरच प्रेक्षक, अशा परिस्थितीत नाटक दिसेल तेवढे दिसेल, न पेक्षा नाटक संपेपर्यंत मागे उभे राहायचे. नऊला सुरू होणारे नाटक साडेदहा-अकरा वाजले तरी सुरू होत नसते, ही इं. स्टँ. टाईम ! ह्या नाट्यप्रयोगामुळे ठेकेदाराची परिस्थिती सुधारलीय, पण ह्या 'दत्त खुले (का खुळे) नाट्यगृहा' ची परिस्थिती काही सुधारलेली नाही ! येथील म्युनिसिपाल्टीतील अधिकाऱ्यांच्या डोक्यात केव्हा काय कल्पना निपजेल, ते काही सांगता येत नाही! पाण्याची सोयही धड नसलेले सेप्टी संडास, मटण मार्केटजवळच भाजी मार्केट ठेवून जैन, लिंगायत, ब्राह्मण आदी बांधवांच्या भावना दुखावणे ही त्यातीलच उदाहरणे ! एका प्रशासकाने येथील निंबाळकरांच्या अड्ड्यात सांस्कृतिक-गृहाची कोनशिला बसविली, पण पुढचे काम बरीच वर्षे रेंगाळतच राहिले... नजीकच्या काळात ते होईल, असेही वाटत नाही ! येथील म्युनिसिपाल्टीच्या प्रशासकीय कारभारावर संशोधन करून डॉक्टरेट मिळविण्याची किती मोठी संधी उपलब्ध आहे ! कॉलेजातील कुणी प्राध्यापक इकडे लक्ष देतील काय ?

येथील लोकांना हौसेलाही मोल नाही. अजिक्य सत्पालला अस्मान दाखवून बेळगावहून कोल्हापूरला जाणाऱ्या बिराजदारच्या गळ्यात प्रथम नोटांचे हार पडले ते येथेच ! तुम्ही शिवाजी महाराजांचे अनेक पुतळे पाहिले असतील, पण इथल्यासारखा देखणा उभा पुतळा क्वचितच कोठे असेल ! तसेच निपाणीसारखा भुईकोट किल्लाही तुम्हाला कुठे आढळणार नाही. ह्या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे (पूर्वी) गावाभोवताली असलेल्या तटबंदीबाहेरून केवळ एक जागेचा अपवाद वगळता कोठूनही तोफ डागता येत नव्हती ! पण इंग्रजांचा वेढा पडल्यावर सूर्याजी पिसाळाच्या एका औलादीने पश्चिमेकडील बसवान माळावरील 'ती' जागा दाखविली व तेथून तोफ डागताच मावळतीकडील दरवाजाजवळची तटबंदी ढासळून खिंडार पडले व किल्ला पडला, असे म्हणतात.

१९४२ सालच्या स्वातंत्र्यलढ्यातही गाव अग्रणी होते. त्यावेळी येथे पोस्ट जाळण्यात आले आणि कचेरीवर हल्ला करायला जात असता मोर्चाच्या अग्रभागी तळपणारा तरणाबांड शंकर पांगीरे पोलिसांच्या गोळीने बरोबर टिपला गेला ! स्वातंत्र्य मिळाल्यावर कचेरीसमोर हुतात्मा शंकर पांगीरेंचे स्मारक निपाणीकरांनी हौसेने बांधलेय. पण १५ ऑगस्ट वा २६ जानेवारीला त्या स्मारकापुढे कुणी पणतीही पेटविलेली आढळत नाही ! पोलिस वा होमगार्डस्च्या खाकी वर्द्या अशा प्रसंगी खांद्यावर रायफली घेऊन होमगार्ड ऑफिससमोर झेंडावंदन करून सलामी ठोकतात ! 'अरे, रायफलींची सलामी द्यावी अशी पवित्र जागा, तिथं तुमच्या कचेरी-समोरच आहे ! पण 'परी तू जागा चुकलासी' अशी साऱ्यांची अवस्था !' महिन्याला दोनशे रुपये मानधन म्हणून सरकारकडून घेणारे स्वातंत्र्य-सैनिकही गावात बरेच आहेत, पण त्या दोनशेतील रुपयाभर खर्च करून वर्षातून एकदा, १५ ऑगस्टला तरी निदान, हुतात्मा पांगीरेंच्या स्मारका-पुढे पणती पेटविण्याचे स्मरण कुणाला होत नाही !

लढ्यात गाव आघाडीवर

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही व नंतरच्या सीमालढ्यातदेखील

हे गाव आघाडीवर होते. गावातील गांधी चौकातील सत्याग्रहापासून ते दिल्लीतील सत्याग्रहापर्यंतही गावातील लोकांनी भाग घेऊन लढा दिला आहे. येथे उसळलेल्या सीमाप्रश्नावरील दंगलीत साखरवाडीवर झालेल्या गोळीबारात कमळाबाई मोहिते ही महिला बळी पडून हुतात्मा झाली. त्यावेळी गावात दंगल उसळली की, जिवाच्या, मारहाणीच्या भीतीने पोलिस आधी कचेरीला पळायचे नि बेळगावहून कुमक येताच छाती फुगवून गावात यायचे ! तेरा वर्षांपूर्वी झालेल्या दंगलीत तर गावाबाहेरील कोल्हापूर व राधानगरीकडील बॉन्ड्रीवरील दोन्ही चेकपोस्टस् लोकांनी हल्ला करून मोडतोड करून जाळून टाकून पोलिसांना पिटाळून लावलं होतं. चार-आठ दिवस दोन्हीकडील बॉन्ड्रीज खुल्याच होत्या आणि त्यावेळी बिनपरमीटनं बॉन्ड्रीवरून इकडे-तिकडे काय काय आलं-गेलं त्याला हिशेबच नाही ! तर निपाणीचं असंही पाणी त्यावेळी पाहायला मिळालं.

येथे हजारो कामगार आहेत, पण त्यांची संघटना नाही. केवळ विडी कामगारांच्यांत पूर्वीच्या समाजवादी व आताच्या जनता पक्षातील प्रा. सुभाष जोशी, मा. रमेश शिप्पूरकर, रविकांत धुमाळ, निंबाळकर वगैरे लोक निरपेक्ष वृत्तीने व तळमळीने कार्य करतात. नं. ३० विडीची येथील शाखा बंद झाली तेव्हा त्या बेकार कामगारांना महिन्याभराचा पगार मिळवून देणे, विलास विडी फॅक्टरीतून काढलेल्या कामगारांना परत कामावर घ्यायला लावणे वगैरे यशस्वी कार्ये वरील लोकांनी केली आहेत. पण तंबाखूच्या वखारीतील स्त्री-मजुरांचे प्रश्नही विड्या बांधणाऱ्या स्त्री-मजुरांच्या प्रश्नाहूनही अधिक बिकट असून त्यांची सोडवणूक करायला कुणी समर्थ नेता हवा आहे. कामगारांत कार्य करण्याची मनस्वी आवड असणाऱ्यांना इथं किती मोठं क्षेत्र उपलब्ध आहे ! ह्या हजारो स्त्री मजुरांना एकत्र आणून त्यांचे प्रश्न धसास लावणे, हे कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वास एक मोठेच आव्हान आहे !

जिवाचे कोल्हापूर करा


निपाणीकरांच्या दृष्टीने जिवाजी मुंबई – चैन करायला जाणे - म्हणजे

कोल्हापूरला जाऊन येणे ! आपल्या आवडीनुसार व पाकिटाच्या फुगीरपणानुसार सिनेमा, तमाशा, नायकिणींच्या बैठकी, जुगार हे सारे नाद कमीअधिक प्रमाणात असणारे व्यापारी कारने जातील, तर ती नसणारे सामान्य लोक एस. टी. ने !

निपाणी भाग हा व्यापारी भाग म्हणून ओळखला जात असला तरी ही भूमी कलावंतांना जन्म देणारीही आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री सुलोचनाबाई ह्या येथून जवळच असलेल्या खडकलाटेच्या तर सिनेलेखक व दिग्दर्शक श्री. दिनकर द. पाटील बेनाडीचे. इंदिरा संत व सौ. कमला फडके या साहित्यिक भगिनी तवंदीच्या. पूर्वी आमचे सगरे गुरुजी कविता करीत. तेव्हा त्यांनी स्वतःच आपला एक संग्रह काढला होता.

प्रत्येक गाव देखणं कशामुळं दिसतं ? नाही ओळखता येत ? तर सांगतो, त्या गावाच्या पार्श्वभूमीवर आकाश कोरणारी एखादी निळीभोर डोंगरमाळ हवी, म्हणजे पाहा, गाव कसे चित्रातल्यागत दिसते ! अशी एक डोंगर रांग निपाणीच्या दक्षिणेस आहे. 'तवंदी-रामलिंगचा डोंगर' असे तिचे नाव !

माणूस ज्या गावी जन्मतो, वाढतो, बालपणीचा रम्य काळ घालवितो त्या जागी त्याचे एक प्रकारचे विचित्र ऋणानुबंध गुंतलेले असतात. पुढं वय वाढलं तरी हे नाजूक बिसतंतू तोडता येत नाहीत. पुनर्जन्माची कल्पना खरी असेल तर प्रत्येक निपाणीकराला असंच वाटत राहणार, की मृत्यूनंतर पुढे कधी तरी आपणास पुनर्जन्म मिळालाच तर तो अन्यत्र कुठे न मिळता ह्या पाणीदार गावातच मिळो !


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३१७७
दि. क. २.५.७५
नि. क्र. ३१७८८
शाखा (स्थळ प्रत)


REFBK-0025057



महादेव मोरे उवाच ....

" इथे फुलांना मरण जन्मता " हा वेळोवेळी लिहिलेल्या ललित लेखांचा पहिलाच संग्रह. १९५९ सालापासून मी कथा, कादंबरी, ललितलेख वगैरे लिहायला लागल्या नंतर माझी ओळख सर्व प्रथम ज्या प्रकाशकाशी झाली ते म्हणजे श्री. चंद्रकांत शेटचे ! मी आचार्य अत्रे यांच्या ' नवयुग ' व दै. 'मराठा' च्या रविवार पुरवणीचा लेखक आणि श्री. चंद्रकांत शेटचे हे अत्र्यांचे असीम भक्त असल्याने ही ओळख दृढ मैत्रीत परावर्तीत झाली! त्यानंतर श्री. चंद्रकांत शेटचे यांनी ' वैजयंती ' हे दर्जेदार मासिक काढले होते. त्यांतील अनेक लेखकांत मीही होतो. अशी ही मैत्री आजवर चालू आहे. बाहेरील प्रकाशक माझ्या कथा-कादंबऱ्या प्रकाशीत करीत होते, पण ' चंद्रकांत शेटचे प्रकाशन मंदिर ' मार्फत मात्र आजवर एकही पुस्तक प्रकाशित झाले नव्हते, तो योग आज येतो आहे ह्याचा (हे पुस्तक निघण्याहूनही) मला जास्त आनंद होत आहे.